# श्री साईलीला

दिवाळी अं
१९८०

श्रीसाईबाबा संस्थान शिर्डीचे अधिकृत मासिक



जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान,
शिरडीचे अधिकृत मासिक

: संपादक :

**श्री.क.हि.काकरे**

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

**डॉ.श्री.दि.परचुरे**
एम. ए. पी. एच. डी.
( इंग्रजी आवृत्ती )

**श्री.सदानंद चेंदवणकर**
( मराठी आवृत्ती )

**श्रीसाई वाक्सुधा**

वर्ष ५९ वे )   किंमत दोन रुपये   ( अंक ८ व ९

: कार्यालय :
"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४-बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई-४०० ०१४.
दूरध्वनी : ४४३२६१
वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख.सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥



## श्रीसाई वाक्सुधा

सचैतन्य जो मुसमुसला ।
भक्त हृदयीं जो अढळ ठसला ।
तो देह काय म्हणावा निमाला ।
बोल हा मनाला मानेना ॥६७॥

म्हणोनि हा अनद्यानंत साई ।
अभंग राहील विश्वप्रलयीं ।
जन्म-मरणांचिया अपायीं ।
न कदाही पडेल ॥६८॥

महाराज ज्ञानोबा काय गेले ।
तीन शतकांनीं दर्शन दिधले ।
नाथ महाराज भेटूनि आले ।
उपकार केले जगावर ॥६९॥

जैसे ते नाथ कृपावंत ।
पैठणींची जाहली ज्योत ।
तुकाराम महाराज देहूंत ।
आळंदीत नरसिंह सरस्वती ॥७०॥


समर्थ रामदास परळींत ।
अक्कलकोटभर अक्कलकोटांत ।
प्रभुमाणिक हुमणाबादेंत ।
साईं हे शिरडीत तैसेचि ॥७१॥

—श्रीसाईसच्चरित—अध्याय ४२ वा

# दिपावली शुभचिंतन

ही मंगल दिवाळी
आणि
नूतन वर्ष
आमच्या सर्व वाचकांना,
लेखकांना, कवींना
जाहिरातदारांना व
हिताचिंतकांना सुखाची
व भरभराटीची जावो.

# श्री सच्चिदानंद सद्गुरु साईनाथ महाराज की जय।



नमामि साई गुरु पाद पंकजम,
करोमि बाबा तव पूजनम् वरम्
वदामि साई शुभ नाम निर्मलम्,
स्मरामिं बाबा तव तत्वमन्ययम्,
सच्चिदानंद रुपाय, भक्तानुग्रहकारणें,
शिरडीन्यस्तैकदेहाय साईशाय नमो नमः

# श्रीसाईलीला–दिवाळी अंकाचे मानकरी--१९८०

१) संपादकीय – सदानंद चेंदवणकर, चेंबुर
२) श्रीसद्‌गुरु नानामहाराज तराणेकर —श्री. बापूसाहेब निरखे, इंदूर
३) श्री. महादेव भिडे, पुणे
४) श्री. अनिल रिसबूड, गिरगाव
५) श्री. चकोर आजगांवकर, बांद्रा
६) सौ. सुमन मिराशे, किनवट
७) श्री. डी. आर. खडके, चेंबुर
८) श्री. मु. ब. निंबाळकर, पुणे
९) कु. कलावती पाळके, वडगावशेरी
१०) श्री. अशोक कल्याणकर, बाणकोट
११) सौ. सरला गर्जे, पुणे
१२) श्री. शांतीलाल राठोड, पालनपूर
१३) डॉ. सुमती खानविलकर, लोनावळा
१४) श्री. नंदकुमार खेले, पुणे
१५) डॉ. इंदूताई नाईक, लोनावळा
१६) श्री. रमेश चव्हाण, नवापूर
१७) सौ. मालती आगाशे, दादर
१८) श्री. गणेश नाईक, मारदोळ
१९) सौ. सिंधु मुळीक, नागपूर
२०) श्री. डी. बी. पोतनीस, पिंप्री
२१) सौ. सुलभा ऋषी, रेणूकूट
२२) श्री. ग. रा. पालकर, कुर्ला
२३) श्री. नारायण मेथा, महाड
२४) श्री. गोविंद भडसावळे, कोळवण
२५) श्री. हेमंत हळवे, पुणे
२६) सुश्री. उमानंद सरस्वती, अंधेरी
२७) डॉ. श्री. दि. परचुरे, माहिम
२८) सौ. राही लिमये, सांगली
२९) कु. रेखा कुलकर्णी, बोकारो
३०) सौ. श. रेवणकर, अंबरनाथ
३१) श्री. सूर्यकांत गर्जे, पुणे
३२) सौ. सिंधु सणस, नागपूर
३३) श्री. वसंत देवभानकर, पुणे
३४) श्री. रा. ब. बारअी, काटोल
३५) श्री. अनिल रसाळ, वडाळा,
३६) श्री. विजय हजारे, बोरीवली
३७) श्री. जे. डी. दळवी, वडाळा
३८) सौ. अस्मिता देशपांडे, वाई
३९) श्री. प्र. ना. बेलसरे
४०) सौ. आर. व्ही. जाधव, अलिबाग
४१) श्री. प्रभाकर चेंदवणकर, कुर्ला
४२) प्रा. गुंडेराव पटवारी, बिदर
४३) श्री. प्रकाश कर्पे, इंदूर
४४) सौ. उज्ज्वला कुलकर्णी, धुळे
४५) सौ. प्रभाताई मुळये, इंदूर
४६) श्री. ग. दे. कुलकर्णी, उस्मानाबाद

४७) सौ. उषा अधिकारी, रत्नागिरी
४८) श्री. किशोर सूर्यवंशी, हंगे
४९) सौ. स्वाती जयकर, कांदीवली
५०) श्री. पां. बा. भुतकर
५१) श्री. दत्तात्रय दळवी, ठाणे
५२) लीलाताई गोलतकर, परळव्हिलेज
५३) सौ. सुशिला शिंदे, चेंबुर
५४) कु. उज्ज्वला नाईक, डोंबिवली
५५) श्री. माधव गोरे, कुर्ला
५६) सौ. सुनिता जोशी, डोंबिवली
५७) श्री. सुरेश ठाकूर, शिरडी
५८) श्री. प्रसन्न कु. खडकीकर, हैद्राबाद
५९) कु. शोभना मुळीक, गोरेगाव
६०) सिस्टर मुदलीयार, शिव
६१) श्री. सुहास देसाई, ऑटॉपहिल
६२) श्री. रा. वसंत वि. कातरणीकर, इंदूर
६३) श्री. सुधीर न. दोशी, कुलाबा
६४) श्री. फणींद्र सुमंत तळपदे, माहिम

★


## श्रीसाईलीला

### लेखक–कवी स्नेहसंमेलन–७ वे

शिरडी येथे थाटात साजरे होणार

विशेष माहिती श्रीसाईलीला जानेवारी १९८१

अंकात वाचा आणि सहभागी व्हा.

# साईभक्तांचे कर्तव्य




प्रिय साईभक्तांनो, स. न. वि. वि.

श्रीसाईलीला मासिकाचा हा सुंदर दिवाळी अंक ऐन दिवाळीत श्रीसाईप्रेमींच्या हाती देण्यात आम्हांस अतिशय आनंद होत आहे. दरवर्षाप्रमाणे श्रीसाईभक्तांना आलेल्या श्रीबाबांच्या विषयींच्या अनेक थक्क करणाऱ्या विविध अनुभवांनी असा भरलेला हा चित्ताकर्षक अंक आहे. वाचकांना तो खास आवडेल यात तिळमात्रही संदेह नाही. भक्तांना श्रीबाबांचे विविध अनुभव येतात. त्यांच्या संकटांना अडीअडचणींना तोंड देण्यासाठी, सोडवणूक करण्यासाठी बाबा आजही धाव घेतात ही गोष्ट जरी खरी असली तरी भक्त मंडळी स्वार्थी बुद्धीने आपले कार्य इप्सित साध्य करून घेतात असेच म्हणावयास हवे. आपला कार्यभाग उरकल्यावर आपण श्रीबाबांच्या कर्तव्यांचे पालन करतो काय याकडे प्रत्येक साईभक्ताने लक्ष देणे नितांत आवश्यक आहे असे म्हणण्याची वेळ आता येऊन ठेपली आहे.

द्वेष व कलह यांनी गांजलेल्या जगात सुखाने व शांततेने राहाता यावे यासाठी निःस्वार्थ प्रयत्न कोण करतात ?

व्यापक आणि उदास । जैसे का आकाश ॥
तैसे जयाचे मानस । सर्वत्र गा ॥

अशा प्रकारची माणसेच जगाचे कल्याण करतात. संस्कृत कवि सांगतात —

संतो तपसा भूमि धारयन्ति ।

याचा अर्थ असा की संतांच्या कार्यामुळे जगात सुख व शांतता नांदते. इथे 'संत' शब्दाचा संकुचित अर्थ घेऊ नये. पूर्वी होऊन गेलेल्या बुद्ध, महावीर, खिस्त इत्यादी महात्म्यांनी जे कार्य केले तशाच प्रकारचे कार्य अब्राहम लिंकन, लेनिन, गांधीजी इत्यादी राजकारणी पुरुषांनी केले आहे. हे राजकारणी पुरुष रूढ अर्थाने संत नव्हते,

परंतु वृत्तीने ते पूर्ण संत होते. शंभर-सवाशे वर्षांपूर्वी शिरडीस अवतरलेल्या साईबाबांचे जीवन याच दृष्टीने लोकांना उपकारक ठरले. धर्माच्या व जातीच्या नावाखाली लोकांत बखेडे माजवून त्यांना एकमेकांपासून दूर ठेवायचे व अशा रीतीने आपले राज्य बळकट करायचे हे धूर्त ब्रिटिशांचे स्वार्थप्रेरित असे धोरण होते. बाबांची शिकवण नेमकी या विरुद्ध होती. त्यांच्या दरबारात अमुक धर्माला वा जातीला असे स्थान नव्हते. तिथे सर्वांना समान वागणूक होती. बाबांचा धर्म सांगायचाच तर 'माणूसकी' हा होय. सर्वजण परमेश्वराची लेकरे आहेत या दृष्टीने बाबा पाहात व वागत. समता व बंधुभाव आचरणात आणण्याविषयी त्यांचा उपदेश असे. याच गोष्टी अधिक व्यापक होत गेल्या की त्यातूनच विश्वबंधुत्व निर्माण होते. वरील पहिल्या स्फुटातील विषयावरूनच आम्हाला बाबांच्या शिकवणींची विशेषत्वाने आठवण झाली. बाबा आज शरीराने जगात नाहीत. परंतु त्यांच्या असंख्य भक्तांच्या रूपाने त्यांची शिकवण जगात वावरत आहे. साईभक्तांचे कर्तव्य म्हणजे नुसता बाबांच्या नावाचा जप करणे नव्हे, तर साईबाबांनी जी समानता आचरून दाखविली ती आपल्या स्वतःच्या आचरणात आणणे होय. यासाठी आपसातील भेदभाव प्रथम टाकला पाहिजे. दैनंदिन जीवनात अनेक प्रसंगी जे खटके उडतात ते उच्चनीच भाव मनात बाळगून वागल्यामुळेच होत. साईभक्तांनी ही गोष्ट मुद्दाम ध्यानात ठेवावी व कसास लावून पहावी. भगवान् सांगतात – " सर्वत्र समबुद्धयः " आणि


ईक्षते योगयुक्तात्मा सर्वत्र समदर्शनः

भगवान साईनाथांचे सांगणे व वागणे बरोबर असेच होते. साईबाबांप्रमाणे आपण होणे हेच साईभक्तांचे कर्तव्य होय.

## श्रीसाईलीला डिसेंबर अंक बंद

श्रीसाईलीलेचा हा दिवाळी अंक नोव्हेंबर–डिसेंबर जोड अंक असल्याने डिसेंबर १९८० चा वेगळा अंक प्रसिद्ध होणार नाही याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. आता पुढील अंक जानेवारी १९८१ ला.

卐
卐 संत श्री नानामहाराज तराणेकर 卐
卐



श्रीसमर्थ सद्गुरु-

# संत श्री नानामहाराज तराणेकर

—श्री. बापूसाहेब निरखे
२० नंदलाल पुरा, इंदूर, म. प्रदेश

● संत म्हणजे काय ? ज्यांच्या दर्शनाला जाताना मन प्रसन्न होते, भगवद् भजनाची गोडी वाटते आणि सत्यम्-शिवम्-सुंदरम्चा साक्षात्कार होतच जातो, त्याच पुरुषोत्तमाला संत ही उपाधी ज्ञानवृद्धांनी व तपोवृद्धांनी दिलेली आहे.

असेच एक संत नानामहाराज तराणेकर मध्यप्रदेशातील "तराणा" गावी वेदमूर्ति शंकर शास्त्री यांच्या घरी दिनांक शके १८१८ श्रावण शुक्ल पंचमी (नागपंचमी)ला जन्माला आले. प्रत्यक्ष दत्तस्वरुप परब्रह्म परिव्राजकाचार्य श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराज दंडग्रहणाकरिता उज्जयिनीस जात असता वाटेत तराणा गावी श्री नानामहाराजांचे घरी उतरले होते. ह्यांचे वय त्यावेळी फक्त ५-६ वर्षांचे असावे. त्यांना लहानपणीच श्री महाराजांचा सहवास व कृपाप्रसाद मिळालेला होता. श्री स्वामींनी दत्ताच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करून सुचित केले होते की या कुळीचे आचरण दत्तरायाला आवडले आहे आणि तो करुणायन चैतन्याचा चिरंतन अलंकार चढवून कुळाला कायमचे विभूषित करणार आहे.

श्री गुरु नानांचे अर्धे आयुष्य तराणा गावीच गेले. नंतर ते इंदूरला येऊन राहू लागले. माझ्या प्रथम भेटीतच प. पू. नाना महाराज म्हणजे ईश्वराची कृपा असलेले अधिकारी पुरुष आहेत या विषयी खात्री पटली. त्यांची हंसतमुख ठेंगणीशी मूर्ती, सात्त्विक आनंदाने प्रफुल्ल असलेले चेहऱ्यावरील भाव, चिंतनाच्या वेळी निमग्न असलेली शांत व गंभीर मुद्रा बघितली तर जणु काय श्री एकनाथ महाराज त्यांच्या रुपाने प्रत्यक्ष भूलोकावर अवतीर्ण झाले आहे असे वाटू लागले. शुभ्र उपरणे शुभ्र धोतर, भाळावरुन रेखलेली कुंकवाची गंधरेखा कुणाही पहाणाऱ्याचे मन वेधून टाकत होती.

प. पू. नाना महाराज हे श्रीमंत श्री वासुदेवानंद सरस्वती महाराजांचे एकनिष्ठ शिष्य होते. श्री गुरूंच्या तपस्यामय जीवनाचा आदर्श समोर ठेवून त्यांनी सारे आयुष्य परमार्थिक कल्याणास्तव वेचले. सतत परिभ्रमण करून भक्तिचा मळा

फुलविला. भगवंताच्या लीला व आयुष्यातले भक्ति अनुभव सांगताना त्यांच्या आत्मविश्वासाचा प्रत्यय येतो. लोकांना धर्माचरणाकडे प्रवृत्त करुन पारमार्थिक सुखाचा वाटा मिळवून देण्याच्या उदात्त हेतूने त्यांचा हा सारा खटाटोप चाललेला असतो. एवढे सारे करूनहि मी करणारा कोणीच नाही हे वाक्य त्यांच्या तोंडून ऐकले म्हणजे त्यांच्या निरंहकारी स्वभावाची साक्ष आपोआप पटते. आज इंदूरमधील स्नेह-लता गंजातल्या नानांच्या घरी कुणीही जाऊ शकतात. सर्व जातीच्या भक्तांसाठी त्यांचे द्वार नेहमी खुले असते. घरात प्रवेश करताच एका अध्यात्मिक वातावरणात शिरल्याचा अनुभव त्याला होतो. दत्तनामाचा जयजयकार नेहमी चालू असतो. त्यांच्या भक्तांमध्ये सुशिक्षित, अशिक्षित, जिज्ञासू सर्वांचा समावेश असतो. ८५ वर्षांच्या या उतार वयात सुद्धा नाना पहाटे तीनपासून जागे होतात. नित्यकर्म आटोपून आसनावर येऊन बसतात. भक्तांची प्रेमाने चौकशी करून हातावर विभूती आणि प्रसाद ठेवतात. ही विभूति म्हणजे नानांचे कृपामय सान्निध्यच होय. नाना म्हणजे पूर्ण शांतिब्रम्हच ! समोरचा मनुष्य कसाही वागला, तरी नानांची शांति कायम असते. कसाही प्रश्न कोणीही विचारला तरी शांतपणे उत्तर देऊन त्याचे समाधान करतात. कोणीही नानामहाराजांना रागावताना बघितले नाही. दर गुरुवारी त्यांच्या दरबारात भजनाचा थाट असतो.

ईशावास्यं उपनिषद् हे नानांचे लाडके तत्वज्ञान आहे. पूर्ण विश्व ईशप्रीतीने झाकलेले असून स्वकर्तव्यात निरंतर शुद्ध मनाने निमग्न राहून सर्व कर्मे अलिप्त भावाने आचरावी, अशी त्यांची विचारसरणी त्यांच्या कृतीतून ते दाखवित असतात. चुकलेल्या पांथस्थांना ते मार्ग दाखवतात. इतक्या उतार वयात देखील त्यांना सर्व ग्रंथ, ओव्या, अभंग, उतारे वगैरे मुखोद्गत आहेत.

नानांनी अनेक ठिकाणच्या यात्रा केल्या. काशी विश्वेश्वर, मथुरा अशा ठिकाणी तर श्रीगोपाळाच्या हातून तीर्थजल त्यांच्या हातावर पडले. बद्रीनारायण दर्शनानंतर तर वाट चुकून मानसरोवराकडील भयानक भुयारातील दिव्यशक्तीने त्यांना सतचित् आणि आनंद यांचे स्वरूप समजावून दिले. अनेक संकटाना तोंड देऊन नानांनी गिरनारचे पहाडाशेजारी नवनाथांचे दर्शन घेतले. अवतार मेहेरबाबा, वज्रेश्वरीचे नित्यानंद स्वामी, सुरेन्द्रनगरचे मौनी बाबा, नाटेश्वरचे रंग अवधूतजी वगैरे महा-पुरुषांच्या दर्शनाचा आनंदही नानांनी लुटला आहे. गाणगापूरला तर प्रत्यक्ष श्री दत्त महाराजांनी त्यांना दर्शन दिले. गरुडेश्वर, शिरडी वगैरे ठिकाणीही नाना नेहमी जात असतात. शिरडीयात्रेचा एक अनुभव प्रत्यक्ष त्यांच्या तोंडी मी ऐकला तो असा—

आजपासून जवळजवळ २० वर्षांपूर्वी आम्ही एकूण तीन जण शिरडीला प्रथम वेळेस गेलो. साई मंदिरात दर्शनासाठी फार मोठी रांग लागली होती. अचानक तेथले पुजारी माझ्याजवळ आले आणि विचारू लागले—आपण इन्दौरकर आहात ना? मला आश्चर्य वाटले की पुजाऱ्यांना कसे काय माहीत पडले की मी इन्दौरकर आहे. पुजाऱ्यांनी मला बाबांचे दर्शन करून दिले. त्यावेळेस दहा आण्याला जेवण मिळत असे. एक व्यक्ती पाच-सहा दिवसापासुन उपाशी होती. तिला मी माझे जेवणाचे कूपन दिले. तिकीट विक्री बंद झाल्याने मला दुसरे तिकीट मिळाले नाही. तेवढ्यात एक गुजराथी माणूस माझ्याजवळ आला आणि त्याने माझ्या हातावर एक तिकीट ठेवले. सर्व स्वयंपाकात कांदे घातले होते. मी कांदे खात नव्हतो पण प्रसाद म्हणून जेवण केले. संध्याकाळी एक अवलीया आला आणि मला म्हणू लागला—तुम्ही चिंता न करता निष्काळजीपूर्वक झोपा. मी सकाळी साडेतीनला तुम्हाला कांकडआरतीसाठी घेऊन जाईन. खरोखर सांगितलेल्या वेळी तो मला काकडआरतीला घेऊन गेला. आरती झाल्यावर मात्र तो अवलीया माझ्या दृष्टीस पडला नाही. वापस येताना बसमध्ये चिक्कार गर्दी होती. पाय ठेवायलाही जागा नव्हती. इतक्यात बसकण्डक्टर ओरडला—तीन सीट्स रिकाम्या आहेत. तुम्ही आत बसा. अशाप्रकारे मला कुठल्याच प्रकारचा त्रास यात्रेत झाला नाही. सर्व कामे पटापट होत गेली. बाबांच्या कृपेने यात्रा निर्विघ्न पार पडली. मी साकोरीलासुद्धा गेलो होतो. तेथेही स्वतः गोदावरीमाताजींनी आपल्या हाताने मला जेवण वाढले. पूजेला सोय लावून दिली. तेथेही कसलाच त्रास झाला नाही.

आज उदयपूर ( राजस्थान )पासून पुण्यापर्यंत, नागपूरपासून बडोद्यापर्यंत नानांचे भक्तगण वसलेले आहेत. प्रत्यक्ष येणाऱ्या त्यांच्या भक्तगणात दिवसेंदिवस वाढ होत चालली आहे. आपणही इंदूरला आला तर अशा ईश्वराची अपूर्व कृपा असलेल्या अधिकारी पुरुषांचे दर्शन घ्यायला विसरू नकात. श्रीनानामहाराजांचे आपणा सर्वांना शुभाशिष.

## साईभक्तांचे विविध अनुभव

# प्रेतवत् नात जिवंत

—श्री. महादेव दत्तात्रय भिडे
११९५ सदाशिव पेठ पुणे ३०

( श्री साईलीला इंग्रजी आवृत्ती जुलै १९८० चे अंकात श्री. के. एम. भिडे वायरलेस ऑपरेटर, ६ अ गुडस् शेडरोड, रेल्वे कॉलनी, हुबळी यांनी लिहिलेल्या लेखाचा अनुवाद )

● हल्ली माझ्या कुटुंबात मी, माझी बायको व नुकतीच बाळंतपणासाठी आलेली माझी मुलगी एवढेच आहोत.

माझी मुलगी दि. २९ डिसेंबर १९७९ रोजी सुखरुपपणे बाळंत होऊन तिने एका चुणचुणीत गोंडस मुलीला जन्म दिला. आम्हालाही आमचे घरी एकुलती एक नात झाल्याने आम्ही सर्व आनंदात होतो. पण या आनंदात राहण्याचे भाग्य फार काळ आम्हाला लाभले नाही. पंधरा दिवसानी माझे मुलीचे अंगावरील दुध येणे बंद झाले. आम्ही चिंतेत पडलो. माझ्या नूतन नातीला बाहेरचे दुध चालू केले पण ते तिला मानवेना. दिवसे दिवस तिची प्रकृती खालावत चालली डॉक्टरांचे औषध उपचार नातीला व मुलीला चालू होतेच.

दि. ३० जानेवारी १९८० पर्यंत माझ्या मुलीचे अंगावर दुध न आलेने आम्ही घाबरलो. कोणच्यावेळी काय होईल हे कळेना. माझी श्रीसद्‌गुरु साईबाबांचे वर पूर्ण श्रद्धा होती. घरी नित्य बाबांची उपासना होती. प्रार्थना रोज करताना मी बाबांना विनंती करत होतो की " बाबा आम्ही तुमची श्रद्धापूर्वक मनोभावे, प्रेमाने रोज सेवा करतो हे जर खरे असेल तर माझी मुलगी तिच्या सासरी ती या नूतन मुलीसह आनंदाने गेली पाहिजे. तिला एकटीलाच जावे लागले तर तुमच्या नावाला कालीमा लागणार आहे. मला त्याची पर्वा नाही. "

दि. ३० जानेवारी १९८० रोजी माझ्या नातीचे दुखणे विकोपाला गेले. आम्ही तिची आशाच सोडली. रात्री बारा वाजता रात्रीच्या ड्यूटीवर मला जावे लागले. घरी माझी मुलगी व माझी बायको या होत्या.

रात्री सव्वादोनचे सुमारास दुखणे असह्य झालेने माझ्या नातीने ( नूतन बालकाने ) हात पाय झाडले ( पसरले ), व ती प्रेतवत् तिच्या आईच्या मांडीवर पडली. माझ्या बायकोने हताश होऊन मोठ्याने ओरडून शेजारच्या मंडळींना

बोलावून घेतले. सात आठ मंडळी शेजारची धावून आली. त्यांनी नातीला पाहिले तो तिचा श्वासोच्छ्वास बंद झाला होता. पूर्ण खात्री करून घेऊन मूल गेल्याचे त्यांनी सांगितले.

माझ्या बायकोची साईबाबांचेवर पूर्ण श्रद्धा असल्याने तिला आत्मविश्वास होता. जोपर्यंत बाबा येथे घरी आहेत व त्यांचे संरक्षण आहे तोपर्यंत असे वाईट घडणारच नाही. तिने आपल्या नातीला या प्रेतवत् अवस्थेतच आपल्या दोन्ही हातांनी उचलून बाबांचे फोटो पुढे धरले, व ती बाबांना म्हणाली "बाबा तुम्ही सर्वेश्वर आहांत. तुम्ही हे काय केलेत ? आम्ही तुमची नित्य मनोभावे सेवा करतो याची ही परत फेड काय ? सांगा ! बाबा बोला !"

"जर हे लहान बालक तुम्ही वाचविले नाही तर मी सर्वांना ठामपणे सांगत सुटेन की बाबांचे अंगी सामर्थ्य नाही. तुमचा फोटो येथे आहे तो बाहेर फेकून देईन. तुमचे नावही आम्ही यापुढे घेणार नाही. हे निर्वाणीचे शब्द उच्चारून तिने बाबांचे फोटोकडे टक लावली दृष्टी स्थीर केली. या गंभीर प्रसंगी सभोवार असलेल्या मंडळींचे डोळे बाबांचे फोटोकडे लागले. एक अघटीत घटना घडली. माझ्या पुढच्या दारास बोल्ट लावलेला नव्हता. ते दार कोणीतरी खाडकन् उघडावे तसे खाडकन् उघडले गेले. तो दाराचा आवाज ऐकताच बाबांचे फोटोकडे लागलेले सर्वांचे डोळे दाराकडे वळले. तो काय चमत्कार ! दारात तर कोणीही नव्हते. हे पाहून पुन्हा सर्वांनी आपली दृष्टी त्या लहान मुलीकडे वळविली. ते प्रेतवत् पडलेले मूल रडू लागले होते त्याने डोळेही उघडले व ते हातपाय जवळ घेऊन हातपाय हालवित होते. हे पाहून सर्वजण आश्चर्यचकित झाले. आपण काय पाहतो यावर विश्वासच बसेना.

आपली नात जिवंत झालेली पाहून माझ्या बायकोस व मुलीस अत्यानंद झाला. त्यांनी बाबांचे फोटो पुढे अक्षरशः लोटांगण घातले व अज्ञानाने आपण अपशब्द बाबांना बोललो त्याबद्दल बाबांची क्षमा मागितली.

सभोवती जमलेल्या मंडळींकडे पाहून माझी बायको त्यांना म्हणाली "माझे यजमान घरी व मंदिरात म्हणत असत की बाबांचेवर अविश्वास दाखवू नका !" हजारो मैलावर जरी माझा भक्त असलातरी त्याच्या हाकेला मी धावून जाईन व त्याला मृत्यूच्या पंजातून खेचून आणून सोडवीन" बाबांनी हा दिलेला शब्द दि. ३०-१-८० रोजी अक्षरशः खरा केला. समाधी घेतल्यानंतरही बाबा भक्तांच्या हाकेला धावून येतात हे दिसून येईल.

माझ्या मुलीचे व माझ्या बायकोचे भाग्य मोठे. त्यांना बाबांच्या सामर्थ्याची प्रचिती आली त्यांना आपल्या डोळ्यादेखत समक्ष बाबांची ही अघटीत घटना (चमत्कार) पाहण्याचे भाग्य त्यांना लाभले.

# "कृपेची सावली–साईमाऊली"

–श्री. अनिल नारायण रिसबूड
द्वारा कै. वि. ना. भागवत
२२३, नवी अमृतवाडी,
वि. प. रोड, गिरगाव, मुं. ४

● प्रत्येक घराघरातून कुठल्याना कुठल्यातरी दैवताची पूजा-अर्चा मोठ्या भक्तीभावाने केली जाते. कुणी श्रीगजाननावर, कुणी श्रीशंकरावर तर कुणी अन्य दैवतांवर दृढ विश्वास ठेवून भक्ती करीत असतो. आमचे घरी मात्र १९१६ पासून आजतागायत श्रीसाईबाबांची पूजा-अर्चा मोठ्या भक्तीभावाने केली जाते. त्याचे कारण श्रीसाईबाबांनी स्वतः आमचे घरात श्रीपादच्या (माझे वडिलांचा धाकटा भाऊ) रूपाने जन्म घेऊन आमचे घर पावन तर केलेच शिवाय माझे वडिलांना पुनर्जन्म देऊन आमचे कुटुंबावरचे संकट कसे दूर केले ते खाली देत आहे.

माझे आजोबा कै. भिकाजी हरी रिसबूड (वडिलांचे वडील) हे पेण येथे वैद्यकीय व्यवसाय करीत असत. घरची अत्यंत गरिबी असल्या कारणाने महिन्यातून दोनदा ३।४ दिवस मुंबईला वैद्यकीय व्यवसायासाठी जात असत. त्यांना मुंबईला श्रीबाबांविषयी माहिती मिळाली. तेव्हा त्यानी शिर्डीला जाऊन श्रीबाबांची कृपा संपादून घेण्याचे ठरविले, व ते शिर्डीला जाण्यासाठी निघाले. शिर्डीला गेल्यावर श्रीबाबांचे दर्शन घेण्यासाठी गेले. त्यावेळी श्रीबाबा फार रागावलेले होते. ते पाहून त्यांचा राग शांत झाल्यावर त्यांचे पाया पडू असा विचार करून ते श्रीबाबांना न भेटताच जेवण करून धर्मशाळेत जाऊन झोपले. तेव्हा श्रीबाबा त्यांच्या स्वप्नात येऊन विचारू लागले, "तू इकडे झोपायला आला आहेस का मला भेटायला आला आहेस ?" त्यावर माझे आजोबा म्हणाले, "मी आलो तेव्हा तुम्ही फार रागावलेले होतात त्यामुळे मी घाबरून आलो नाही." तेव्हा श्रीबाबा त्यांना म्हणाले, "की मी तुला काही बोललो का ?" तेव्हा आजोबा जागे झाले व श्रीबाबांच्या दर्शनाला गेले. श्रीबाबांच्या पाया पडून ते हात जोडून उभे राहिले. तेव्हा श्रीबाबांनी त्यांना सांगितले, "अरे अण्णा, मी तुझ्या घरी येणार आहे. माझे नाव श्रीपाद ठेव." (त्यावेळी माझी आजी–वडिलांची आई–६।७ महिन्याची गरोदर होती.) नंतर दुसऱ्या दिवशी आजोबा गावी आले. पुढे माझी आजी दिवस पूर्ण भरल्यावर प्रसूत होऊन

तिला मुलगा झाला. तो दिवस गुरुवार होता. सकाळची ७ ची वेळ होती. आजी प्रसूत होण्याच्या वेळेला माझे आजोबा दारात उभे होते. त्यावेळेस एक फकीर आमचे घराकडे बघत बघत जात असलेला त्यांनी बघितला परंतु आजोबांनी तिकडे दुर्लक्ष केले. पुढे त्या मुलाचे नाव "श्रीपाद" असे ठेवण्यात आले. त्याच्या गळ्यावर कंठीसारखे एकाखालोखाल एक असे तीन पदर होते व त्यामध्ये तुळशीच्या पाना-एवढा एक काळा डाग होता.

श्रीपाद ४।५ वर्षांचा झाला असताना त्याच्या मुंजीसंबंधी घरात चर्चा सुरू झाली होती. त्यावेळेस श्रीबाबा आजोबांच्या स्वप्नात येऊन पुन्हा पुन्हा सांगू लागले, "मी आता जातो, मला तुझ्याकडून काही नको." तेव्हा आजोबा त्यांना म्हणाले, "मी तुम्हांला काय बोलावणे पाठविले होते कां ? मग तुम्ही आता का जाता ?" (श्रीसाईबाबा श्रीदत्तात्रयांचा अवतार असल्याकारणाने व श्रीपादच्या रुपाने श्रीबाबांनी जन्म घेतल्यामुळे त्यांना मुंज करणे पसंत नव्हते.) पुढे श्रीपाद आठ वर्षांचा झाला असताना त्याची मुंज करावयाचे ठरले.

एके दिवशी तो रानात गेला असताना काटा बोचण्याचे निमित्त होऊन त्याला धनुर्वात झाला. डॉक्टर आपल्या परीने शर्थीचे प्रयत्न करीत होते. परंतु श्रीबाबांच्या मनात काही दुसरेच होते. ती गुरुवारच्या पहाटेची वेळ होती. माझ्या आजोबांना गाढ झोप लागली होती. तेव्हा श्रीबाबा त्यांच्या स्वप्नात येऊन म्हणाले. "मी आता चाललो, मी थांबणार नाही, अल्ला तेरा भला करेगा." आणि माझे आजोबा दचकून जागे झाले, व दारात येऊन उभे राहिले. तेव्हा त्यांना एक फकीर आमच्या घराकडे बघत बघत जाताना दिसला. आणि त्यांना एकदम आठवले की, ज्यावेळी श्रीपादचा जन्म झाला त्यावेळी हाच फकीर आपल्या घराकडे बघत गेला होता.

नंतर आजोबा श्रीपाद जवळ गेले आणि पहातात तो श्रीपादची प्राणज्योत मालवली होती. शेवटी श्रीबाबांनीच आपला शब्द खरा केला होता. पण आश्च-र्याची आणि योगायोगाची गोष्ट अशी की, श्रीपादच्या जन्माची व मृत्यूची वेळ आणि दिवस एकच होती आणि ती म्हणजे गुरुवार सकाळी सात वाजता. तसेच त्याच्या जन्माच्या व मृत्यूच्या वेळी 'तो' फकीर आमचे घराकडे बघत बघत गेला होता. तो फकीर पुन्हा कुणालाच कुठेही दिसला नाही.

अशा रितीने श्रीसाईबाबांनी आमच्या घरात श्रीपादच्या रूपाने जन्म घेऊन आमचे घर पावन तर केलेच पण अजुनही त्यांनी आपली कृपा आमचेवर कायम ठेवली असून ते आपल्या कृपेचा प्रसाद आम्हाला आजही देत आहेत.

# कलीकाळाचे भय नाही!

*** *** ***

—श्री. चकोर आजगांवकर एम्. ए.
वाय ११।१७० सरकारी कॉलनी
वांद्रे (पूर्व) मुंबई ४०००५१

---

● १९८० च्या मे महिन्यात सुटी घेऊन सौ. कौमुदी व मी कारवार येथे गेलो होतो. कारवार येथील निसर्गसौंदर्याने मन शांत झाले. मी मुंबईस एकटाच परत फिरण्याचे वेळेस मला व सौ. ला दोन वेगवेगळी पण सूचक दुःस्वप्ने पडली. मला असे दिसले की मी रस्त्यावरून अंधुक प्रकाशात जात असताता दोन काळेकुट्ट रेडे रस्ता अडवून बसले आहेत. मी म्हटले, "आता याच्यापासुन सुटका नाही. तोंड दिले पाहिजे." इतक्यात त्या पशूपैकी एक मनुष्यवाणीने म्हणाला 'आज येऊ की उद्या?' मन चरकले ही गोष्ट ७ जूनची. त्यानंतर १७ जूनच्या सुमारास सौ. कौमुदीस स्वप्न पडले की रात्रौ बाराच्या सुमारास आम्ही शिवमंदिरात शिवासमोर बसलो आहोत. शिवाच्या मूर्तीत काही हालचाल दिसल्याने ती स्तिमित झाली आहे. इतक्यात मागून एक हात तिचे मंगळसूत्र खेचण्याचा प्रयत्न करतो आहे. ती किंचाळत जागी झाली. यानंतर दुसऱ्याच दिवशी मला पुन्हा स्वप्न पडले की मंत्रालयाच्या-दारात मी उभा आहे. कुठेतरी जावयास निघालो आहोत. इतक्यात इतर मंडळी, डावीकडून येत आहेत. माझ्या उजवीकडे एक सिंह उभा आहे. मी शांत स्तब्ध आहे. इतक्यात हा सिंह माझ्या उजव्या पायास चाटून माझ्या मागून पुढे येऊन उभा रहातो. हे स्वप्न पाहून मी म्हटले, "बाबा तुमची लीला अगाध आहे."

नंतर मी कारवारहून मुंबईस निघालो. पत्नी गावीच राहिली. मुंबईस कामावर जून अखेर रुजू झालो. मी सचिवालयात साधनसंपत्ती विभागाचे (अर्थखाते) काम करतो. या विभागाला अंदाजपत्रकीय अधिवेशनात अंदाजपत्रक व अंदाजपत्रकीय भाषण इत्यादी महत्त्वपूर्ण कार्ये पूर्ण करावी लागतात. त्यामुळे लगेच उशीरापर्यंत कामासाठी बसणे व इतर धावपळ सुरू झाली. दि. २४ जूनला शनिमंगळयुती होऊन गेली होती. त्यामुळे मला हायसे वाटत होते. २ जुलै रोजी अंदाजपत्रकीय भाषणाच्या व अंदाजपत्रकाच्या संबंधात मंत्रिमंडळाची बैठक भरली होती. रात्रौ

८ नंतर बैठक संपल्यावर आम्ही दुरुस्त्या करीत रात्रौ ११ पर्यंत बसलो. मी त्या दिवशी पगार घेतल्यामुळे रात्रौ सरकारी अँबॅसॅडर गाडीने घरी जायचे निश्चित केले. रात्रौ ११ नंतर आम्ही घराकडे निघालो. बरोबर इतर अधिकारीहि होते. मी ड्रायव्हरच्या शेजारच्या बैठकीवर बसलो. ड्रायव्हरचा गाडी चालवताना वाहनावर ताबा नीट आहे, असे वाटत नव्हते. एक दोनदा मोठे गचके मिळाले. त्यानंतर मरीन-ड्राइव्हरवरून गाडी पुढे गेली व पेडररोडच्या दिशेने जाऊ लागली एका गाडीने पुढे जाण्याचा प्रयत्न केला. त्या गाडीस वाट देताना पूर्ण वेगाने जाणारी आमची गाडी जवळच थांबलेल्या एका मोटारीवर जोरात आदळली. दोन्ही गाड्यांच्या एक-मेकावर आपटलेल्या भागांचा चक्काचूर झाला. इंजनातून धूर येऊ लागला. टायर-चाहि स्फोट झाला आम्ही किरकोळ जखमावर बचावलो. माझ्या डाव्या गुडघ्याला मुकामार लागला. परंतु दोनचार दिवसात ठीक वाटले. बरोबरीची मंडळी मला म्हणाली "साहेब, तुम्ही पुढे होता म्हणून आम्ही बचावलो." मी म्हटले "ही बाबांची कृपा आहे."

गुरुचरित्राच्या १४ व्या अध्यायात म्हटले आहे:—

"का एकादे सिंहासी। ऐरावत केवी ग्रासी ?

किंवा

ज्याचे हृदयी गुरुस्मरण। कळिकाळाचे भय नाही"

श्रीबाबांची कृपा अशी भक्तांच्या जीवनात पदोपदी अनुभवास येत असते.

# भाजीच्या घासात मेलेली पाल

—सौ. सूमन पांडुरंग मिराशे
किनवट जि. नांदेड

● दि. २९ मे १९८० या रोजी घडलेली ही एक सत्य घटना आहे.

मी माझे बरोबर १५ जणी गावाकडील बायका सोबत घेऊन माहूर येथील श्री दत्तात्रयांचे दर्शन घ्यावयासाठी माहूर येथे गेली. दिवसभर अनुसया, दत्तात्रय, रेणूका देवी, देवदेवसरी येथील सर्व देवांचे दर्शन संपल्यावर सायंकाळी किनवट मुक्कामी परत आले. बरेच फिरल्यामुळे सर्वांना फारच भुका लागल्या होत्या. तेव्हा स्टोव्हवर सर्वांसाठी बटाट्याची भाजी व पोळया तयार केल्या. एका बाईने सर्वांना वाढण केले, सर्वांचे यथासांग जेवण झाले. शेवटी वाढणारी बाई जेवावयास बसली व तिचे अर्धे जेवण सुद्धा संपत आलेले होते, तोच तिच्या ताटातील भाजीच्या घासात तिला एक मेलेली पाल आढळली. ती पाल भाजी बरोबर शिजलेली होती. याचाच अर्थ त्या पालीचे विष जेवणातून सर्वांच्या पोटात गेलेले होते. त्या पालीस पहाताच सर्व बायका घाबरल्या व रडायला लागल्या. तोच मला माझ्या संग्रही असलेल्या श्री साईबाबांच्या उदीची आठवण झाली. मी त्या सर्वांना धीर दिला व सर्वांना साईंचे नामस्मरण करावयास सांगीतले. एक लोटाभर पाण्यात बरीचशी उदी मिसळून ते उदीयुक्त पाणी सर्वांना घ्यावयास दिले. साधारण तासभर सर्वांनी साईंचे नामस्मरण केले. पण कुणासही कुठल्याही प्रकारचा त्रास झाला नाही. केवढे हे बाबांच्या उदीचे सामर्थ्य जिच्या सेवनाने आम्हा १५ व्यक्तीस मृत्यूच्या दाढेतून ओढून काढले. धन्य ते साईबाबा व त्यांची ती उदी.

# बाबांच्या जागृतीची प्रचिती

—श्री. डी. आर. खडके
केंद्रीय गुप्तचर अधिकारी (निवृत्त)
१४ सहवास, आर. सी. मार्ग, चेंबुर, ८९

※ संकटात अगर अडचणीत सापडल्यावर माणसाला परमेश्वराची आठवण होते. साईभक्त श्रीसाईबाबांचा संकटकाळी धावा करतात आणि बाबा त्यांना त्यांच्या संकटातून मुक्त करतात हा झाला बाबांच्या अनुभवाचा एक प्रकार. याखेरीज बाबा आपल्या अस्तित्वाची केव्हातरी अचानकपणे जाणीव करून देतात आणि भक्तांना थक्क करतात. हा दुसरा प्रकार आकस्मिक घडल्याने मोठा अचंबा वाटतो. त्यातला एक अनुभव असा—

माझ्या शयनगृहामध्ये भिंतीवर एका बाजूला श्रीसाईबाबांची मध्यम आकाराची सुंदर क्रोमियमची फ्रेम असलेली तसबीर लावलेली आहे, व त्याच भिंतीवर दुसऱ्या बाजूस माझ्या बाबांच्या सान्निध्यात अनेकवेळा राहिलेल्या दिवंगत मातोश्रींची त्याच आकाराची व फ्रेमची तसबीर आहे.

दादर शिवाजीपार्कचे डॉ. एन. के. बोकील हे माझे लांबचे नातेवाईक असले तरी जवळचे स्नेही आहेत. ते मूळचे लोकप्रिय दंतवैद्य, गेल्या ५।६ वर्षांपासून त्यांनी ती उत्तम चाललेली प्रॅक्टीस बंद केली. अंगावरच्या कोडावर संशोधन करून ते आता कोडाच्या असंख्य पीडितांवर इलाज करण्यात मग्न असतात. हा व्यवसाय अल्पावधीत फार वाढल्याने ३।४ महिन्यातून केव्हातरी आठवण काढून चर्चेसाठी व किरकोळ सल्ल्यासाठी माझ्याकडे ते येत असतात.

सुमारे दोन वर्षांपूर्वी एके दिवशी सकाळी मला डॉ. बोकिलांचा टेलिफोन आला की, "मला तुमच्याशी खूप बोलायचे आहे त्याकरिता आज संध्याकाळी ७ चे सुमाराला दवाखाना बंद केल्यावर मी तुमच्याकडे येत आहे." मी पण डॉक्टरांना अवश्य येण्यास सांगितले व रात्री माझ्याकडेच जेवणाचे आमंत्रण दिले. ठरल्याप्रमाणे डॉक्टर संध्याकाळी माझ्या घरी पोहोचले आणि खूप बोलायचे असल्यामुळे ज्या

ठिकाणी येणाऱ्या जाणाऱ्यांचा व्यत्यय येणार नाही अशा ठिकाणी बसू या असे ते मला म्हणाले. बैठकीच्या हॉलमध्ये बसल्यास भेटीसाठी अचानक येणाऱ्या लोकांचा उपसर्ग होईल म्हणून हॉलमध्ये बसायचे नाही असे आम्ही दोघानी ठरविले. आतल्या खोलीत टि. व्ही. असल्यामुळे घरातल्या लोकांनी टि. व्ही. लावला तर बोलण्यात अडथळा येईल म्हणून त्याही खोलीत बसायचे नाही असे ठरले. शेवटी माझ्या बेडरूममध्ये बसण्याचा निर्णय आम्ही दोघानी घेतला. रात्रीच्या जेवणास अजून बराच अवकाश होता. कारण माझेकडे रात्रीचे जेवण १० वाजण्याच्या आसपास असते. बेडरूममध्ये बसल्यानंतर बोलण्यास सुरवात करण्यापूर्वी मी डॉक्टरांना " थोडी व्हिस्की चालेल का ? " म्हणून विचारले व त्यांनी पण त्याला अनुमती दिली. बेडरूममध्ये बसण्याची व्यवस्था केली व मध्यभागी टिपॉय मांडून त्यावर ग्लासेस सोडा बर्फाची प्लॅस्टीकची बकेट व्हिस्कीची बाटली व किरकोळ खाद्यपदार्थांचे साहित्य हळूहळू जमू लागले. सोड्याच्या बाटलीतला सोडा व्हिस्कीच्या ग्लासमध्ये ओतला पण बाटलीमध्ये बराच सोडा शिल्लक होता. म्हणून त्याला माझ्या संग्रही असलेले एक स्पेशल लिव्हरचे बूच बसवून सोडा बाटली बंद केली आणि व्हिस्कीचा आस्वाद घेतघेत बोलण्यास सुरवात केली. मध्यंतरी घरातून आणखी काही किरकोळ खाद्य-पदार्थांच्या प्लेटस् आल्या तेव्हा टिपॉयवरील जागा अपुरी पडल्यामुळे बंद केलेली सोड्याची बाटली, बर्फाची बकेट, व्हिस्कीची बाटली व इतर नको असलेले साहित्य जवळच पलिकडे साईबाबांच्या तसबिरीखाली भिंतीलगत असलेल्या स्टुलावर ठेवले आणि नवीन आलेल्या प्लेटस्ना जागा केली. आता आम्ही दोघेच तेथे होतो आणि बोलण्यामध्ये दंग झालो होतो.

एवढ्यात बेडरूममध्ये फटाका उडाल्यासारखा आवाज झाला आणि काहीतरी वस्तू वरती छताला आपटून पलंगाच्या पलिकडे उडून पडली. आम्ही दोघेही दचकलो आणि कसला आवाज झाला व काय वस्तू उडाली त्याचा अंदाज घेऊ लागलो तेव्हा असे आढळून आले की, सोड्याच्या बाटलीला लावलेले बूच जोराने आपोआप उडून छताला आपटून पलंगाच्या पलिकडे जाऊन पडलेले होते. बूच लावतेवेळी बरोबर लावले नसावे. अशी मनाची समजूत करून घेऊन पुन्हा ते सोड्याच्या बाटलीला व्यवस्थित बसवले आणि यावेळी ते नीट बसले आहे याची खात्री करून घेऊन आम्ही दोघे पुन्हा बोलण्यात गुरफटून गेलो. ४।५ मिनिटानंतर पुन्हा तोच चमत्कार झाला. बाटलीचे बूच मोठा आवाज करून उडले व छताला आपटून खाली पडले. माझ्या मते हा मोठाच चमत्कार होता. कारण ते बूच माझ्या संग्रही अनेक वर्षापासून होते व पुष्कळ वेळा सोड्याच्या बाटलीला ते लावण्याचे प्रसंग आले होते. पण ते अशा रीतीने कधीच निघाले नव्हते.

ते स्पेशल प्रकारचे बुच सोड्याच्या बाटलीला बसवून त्याची लिव्हर खाली दाबली म्हणजे ते इतके घट्ट बसायचे की सोड्यातील गॅस यत्किंचितही बाहेर येत नसे. बूच आजपर्यंत कधीही आपोआप उडाले नव्हते, आणि आज १५ मिनिटांच्या अवधीमध्ये दोनवेळा उडाले याचा आम्ही दोघेही विचार करू लागलो, तेव्हा डोक्यात कल्पना आली की बाबांच्या तसबिरी खाली असलेल्या स्टुलावर व्हिस्कीची बाटली, बर्फाची बकेट, सोड्याची बाटली वगैरे वस्तू ठेवल्या ही अनवधाने चूक झाली, ही गोष्ट बाबांना रूचली नसावी, असा विचार करून सर्व वस्तू तेथून हलवून दुसरीकडे ठेवल्या, त्यानंतर ते बूच उडण्याचा प्रकार पुन्हा घडला नाही.

सारांश काय तर श्रीसाईबाबांची शयनगृहातील भिंतीवर टांगलेली तसबीर निर्जिव नसून एक जागृत स्थान आहे व त्याची प्रचीती बाबांनी अशा रीतिने करून दिली. हा प्रसंग डॉ. बोकील व मी कधीच विसरणार नाही.

☆ ☆ ☆

# कुडी आणि साईकृपा

—सौ. सुमन प्रभाकर शानभाग
' लक्ष्मी निवास ' महागिरी, रेतीबंदर ठाणे (प.)

● सन १९७२ सालची गोष्ट. मी, माझे पती, आणि माझी दोन मुले मिळून दरवर्षीप्रमाणे शिर्डीला गेलो होतो. तिथून परत येताना मी बाबांचे शेवटचे दर्शन समाधी-मंदिरात जाऊन घेतले, आणि एस. टी. स्टँडवर गेलो. बस वेळेवर आली. त्याप्रमाणे वेळेवर सुटली. मी मनात साईनामाचा जप करीत होते.

जेव्हा नासिक आले तेव्हा आम्हाला थोडावेळ मिळाला होता कारण बस डेपोत जाऊन अर्धा ते एक तासानंतर परत स्टँडवर येणार होती. म्हणून आम्ही चौघेजण एस. टी. स्टँडच्या उपहारगृहात काही खाऊन घेऊ, या विचाराने गेलो. तेथे जाऊन बसल्यावर माझे पती मला म्हणाले, " अग, तुझ्या एका कानातली कुडी कुठे गेली ?" तेव्हा मी पटकन कानाला हात लावला आणि मनातून अगदी घाबरून

गेले आणि साईनामाचा जप सुरू केला. बरं बसमध्ये कुडे कुठे पडले ते जाऊन शोधू म्हटले तर ते देखील शक्य नव्हते, कारण बस डेपोत गेलेली होती. आणि एव्हाना ते कोणाच्या पायदळी येऊन कधीच खाली पडले असेल, त्यात जर ते कोणाला मिळाले असेल तर कोण परत करणार या विचाराने मी ते परत मिळण्याची आशाच सोडून दिली. ही कानातली कुडी सोन्याची असून त्यात आणि खड्याचे असल्याने ते मिळणारच नाही अशी मी मनाची समजुत घातली.

आणि नंतर आम्ही उपहार गृहापासून ते इकडे तिकडे शोधत बसजवळ आलो. आता बसमध्ये मी चढणार इतक्यात मला काहीतरी बसच्या पायरीवर चकाकताना दिसले म्हणून अधिक जवळ जाऊन पाहिले तर ती माझ्या कानातल्या कुडीची ' फिरकी ' होती. तेव्हा मला खूप आनंद झाला. पण मनात आले फिरकी मिळाली तसेच कुडी इथेच कुठेतरी मिळेल. साईबाबा मला नक्की पावेल. म्हणून मी व माझे पती आम्ही दोघेजण बसच्या सर्व सीटखाली शोधू लागलो आणि आमच्या सीटच्या पुढच्या सीटखाली ती कुंडी मला मिळाली; आणि मी मनातच साईंचे आभार मानले.

आभार तर मानले आणि वाटले खरंच आज जर ती कुडी मिळाली नसती तर काय झाले असते, परंतु बाबांच्या मनात तसे करायचे नव्हते. कारण ती कुडी माझ्या लग्नाच्यावेळी केली होती. ती हरवल्यामुळे मला सतत याची आठवण शिर्डीला आल्यावर झाली असती. पण बाबांच्या कृपेमुळे माझा त्यांच्यावरील विश्वास आणखीनच दृढ झाला.

ह्यावरून, साईबाबांचे हे वचन मनोमन पटते,

जो जो मज भजे जैसा जैसा भावे ।
तैसा तैसा पावे मीही त्यासी ॥

# एक अध्यात्मिक अनुभव

—ले. कर्नल मु. ब. निंबाळकर ( निवृत्त )
११।१४ फाइव्ह स्टार अपार्टमेंटस, बंडगार्डन रोड, पुणे १

जया परमार्थी खरी गोडी । तयांची साईस मोठी आवडी ।
वारूनि सर्व तयांची सांकडी । स्वानंद जोडी दे तयां ।। अ. ४१ आ. ७५

* श्री साईबाबा भक्तांच्या संकटाच्या वेळी धावून येतात व भक्तांचे दुर्धर रोगही बरे करतात याबद्दलचे अनुभव अनेक भक्तांना आलेले आहेत. मलाही त्याची प्रचिती आहे. परंतु मला वाटते बाबांना खरा आनंद भक्तांच्या अध्यात्मिक साधनेत त्याला मदत करणे, मार्गदर्शन करणे व वेळोवेळी त्याबद्दलच्या त्यांच्या इच्छा पूर्ण करून त्याला उत्तेजित करणे यातच वाटत असावा. संकटाचे वेळी धावून येऊन किंवा रोग बरा करून देखील बाबा शेवटी त्याला याच सन्मार्गावर आणतात.

असाच अध्यात्मिक साधनेबद्दल अलिकडे मला अनुभव आला तो खाली देत आहे.

ता. १९ फेब्रुवारी रोजी मी सौभाग्यवतीसह बडोद्याहून एस. टी. बसने खेडा जिल्ह्यातील आत्तरसुंबा गावी प्रथमच माझ्या मित्राकडे जात होतो. वाटेत कल्पना नसताना डाकोर नावाचे गुजराथेतील प्रसिद्ध क्षेत्र लागले. मी लहानपणी हे पाहिले होते व अलिकडेच मला इच्छा झाली होती की दरवर्षी आपण आपल्या गावी बडोद्यास जातो तेव्हा एकदा डाकोरला जाऊन श्री रणछोडरायाचे (श्रीकृष्णाचे) दर्शन घ्यावे. अर्थात अशाप्रकारे अचानकच ते गाव दिसल्याने खूप आनंद झाला. त्यावेळेस नुसते मंदिराच्या कळसाचे दर्शन घेतले व मनात विचार सुरू झाला की परतताना येथे थांबायला जमेल का ?

परंतु आश्चर्याची गोष्ट अशी की आत्तरसुंब्यास पोहोचल्यावर माझ्या मित्रानेच मला सांगितले की डाकोर येथे त्यांची मोठी मुलगी असते व त्याने तिला पत्र टाकलेय की गुरुवार ता. २१ रोजी आपण सर्व तिच्याकडे जाऊ व तिने आपल्या दर्शनाची सकाळी तिच्याकडे जेवण्याची व संध्याकाळी मंदिरातील प्रसादाच्या जेवणाची व्यवस्था करावी. आम्हा दोघाना अर्थात खूप आनंद झाला. परंतु प्रश्न पडला आमच्या

गुरुवारच्या उपोषणाचा–एकदाच जेवणाचा. सकाळी मुलीकडची मंडळी जेवण तयार करणार व आम्ही पाहुणेच न जेवलो तर त्याना दुःख होणार. बरे सकाळी जेवलो तर संध्याकाळी मंदिरातील ५६ वस्तूंच्या भोगाचा ( नैवेद्याचा ) जेवणाचा प्रसाद कसा नाकारायचा ? शेवटी बाबाच सुचवतील तसे करायचे ठरविले. दोन्ही वेळा जेवल्याने उपवास मोडलाच तर तो काही आपल्या जीभेच्या सुखासाठी मोडणार नाही परंतु सकाळी घरातील मंडळींच्या समाधानासाठी व संध्याकाळी ईश्वराच्या प्रसादाचा ( जो तिथल्या मंडळीनी बरीच किंमत देऊन मंदिरात सांगून ठेवला होता ) अव्हेर करायचा नाही, म्हणून मोडेल—अशी आमच्या सौभाग्यवतीची मी समजूत घातली. असो.

परंतु बाबांनीच आमची लाज राखावयाचे ठरविले. बुधवारी ता.२०ला माझी प्रकृतिच बिघडली. योगायोगाने त्या गावाचीच ट्रक संध्याकाळी आमच्या मित्राकडे आली व सकाळी परत जात होती. त्यातून आमच्या मित्राने मुलीला निरोप धाडला की आमचे येणे नक्की नाही तरी जेवण आम्ही आल्या शिवाय करू नका. दुसऱ्या दिवशी गुरुवारी सकाळी मात्र मला बरे वाटले व डाकोरला जाण्याची माझी तीव्र इच्छाही असल्याने आम्ही निघालो. डाकोरला पोहोचल्यावर आमच्या उपवासाबद्दल सांगितले. जावईदेखील समजूतदार असल्याने त्याने जेवणाचा आग्रह धरला नाही. नंतर लगेच आम्ही मंदीरात दर्शनाला गेलो. मित्राची मुलगी या गावचीच असल्याने तिने तिकिटांची वगैरे सोय करून आमचे व्यवस्थितपणे चरण स्पर्शासह श्री रणछोड रायजीचे दर्शन घडविले. तीर्थ प्रसादही मिळवून दिला. नंतर आम्ही शांतपणे श्री रणछोडरायांच्या स्नान, अभिषेक व आरति यानांही हजर राहिलो. मंदीर भव्य आहे, मूर्ति मोहक आहे आणि शृंगार केल्यावर तर फारच सुंदर दिसते.

श्री रणछोडरायची ही मूर्ति मूळची द्वारकेच्या मंदीरातली. ती डाकोरला कशी आली ही कथा खरोखरच मनोरंजक आहे. थोडासा विषयांतर व विस्तृतपणा सोसूनही वाचकाना ती सांगावीशी वाटते.

डाकोर येथे बोडाणा नावाचा भक्त होऊन गेला. त्याच्या बायकोचे नाव गंगाबाई जी देखील कृष्णाची भक्ति करीत असे. एकदा एक भक्तांचा मेळा द्वारकेला जायला निघाला त्यांचे बरोबर बोडाणा पण गेला. तिथे त्याला इतका आनंद झाला की त्याने दर सहा महिन्यानी डाकोरहून द्वारकेला तुळस हातात घेऊन पायी चालत जायचा व ती श्री रणछोडरायाना अर्पण करायचा पण केला. पुढे तो ७० वर्षांचा वृद्ध झाला तरी त्याने पण कायम ठेवलेला पाहून श्री रणछोडरायानांच दया आली व ते त्याला

म्हणाले, "पुढच्या खेपेस तू बैलगाडी घेऊन ये. मी तुझ्या बरोबर डाकोरला येईन." त्याप्रमाणे बोडाणा बैलगाडी घेऊन आला. ते पाहून द्वारकेच्या गुगळी (पंडे) लोकाना शंका आली व त्यानी मंदीर रात्री कुलूपे लावून बंद केले. तरीही मध्यरात्री श्री रणछोडराय बाहेर आले व बोडाणाला गाडीत बसवून स्वतः गाडी हाकायला घेतली. सकाळी डाकोरला पोहोचले. तिकडे द्वारकेत सकाळी मूर्ति नाहीशी झालेली पाहून हाहाःकार झाला. गुगळी लोक डाकोरकडे धावले व बोडाणाजवळ मूर्ति मागू लागले. तेव्हा श्री रणछोडरायांच्याच प्रेरणेने बोडाणाने त्याना विचारले की मूर्तिइतके सोने दिले तर चालेल का? अर्थात् लोभाने गुगळी कबूल झाले. तराजू आणला. एका बाजूस श्री रणछोडरायाना ठेवले. दुसऱ्या बाजूस आता सोने कोठून आणावयाचे? बोडाणा घाबरला. परंतु त्याची बायको गंगाबाई पुढे सरसावली. तिने आपल्या नाकातील वेढणी टाकली आणि काय आश्चर्य! ती बाजू खाली गेली. गुगळी लोकानी लाजेने माना खाली घातल्या व द्वारकेस तसेच परत गेले. तेव्हा पासून श्री रणछोडरायानी डाकोरलाच मुक्काम केला.

संध्याकाळी आम्ही गोमती तलाव व इतर मंदीरे पहावयास निघालो. पुण्यास असताना दर गुरुवारी माझा दत्ताच्या दर्शनाला जायचा नेम आहे त्याची आठवण झाली. परंतु आता येथे डाकोरला ते कसे शक्य? असो. गोमती तलाव आम्ही मोटर लॉंचने ओलांडला व तिकडे मारुतिची भव्य मूर्ती असलेले स्थान आहे तेथे बसलो तो काय आश्चर्य! कुणी तरी इसम आला व आम्हा सर्वांना पेढ्यांचा प्रसाद वाटू लागला. चौकशी केल्यावर कळले की तो नुकताच दत्त मंदीराकडून आला होता व श्रीसाईबाबांचा भक्तही होता. मी आमच्या मित्राना दत्त मंदीर कुठे आहे वगैरे विचारले. तेव्हा ते बरेच दूर आहे व आपल्याला उशीर होईल असे म्हणाले तेव्हा मी तो विचार सोडला. नंतर फिरत फिरत बऱ्याच मंदीरात दर्शने घेत आम्ही श्री शंकराचार्यांनी बांधलेल्या कामाक्षी देवीच्या मंदीरात आलो देऊळ नवीन प्रकाराने बांधलेले व प्रेक्षणीय आहे.

मी देवीच्या दर्शनात गुंगलो होतो, तो सौभाग्यवती मला कोपराने हालवून सांगू लागली की तिकडे शेजारी पहा काय आहे ते ! आणि खरोखरीच देवीच्या शेजारीच सुंदर व मोठी दत्ताची मूर्ति. किती आनंद झाला म्हणून सांगू! येथे देवीच्या मंदिरात आणि तेही देवीच्या शेजारीच श्री दत्तात्रय असतील हे स्वप्नातही शक्य वाटले नसते. परंतु श्री साईबाबांनी अशक्य गोष्ट शक्य करून या बालकाचा नेम पुर्ण केला.

खरा आनंद तर पुढेच होता. सकाळी डाकोरला पोहोचल्यावर आम्ही जेव्हा प्रथम माझ्या मित्राच्या जावयाच्या दुकानावर गेलो तेव्हा एक केस वाढविलेले व पांढरे शुभ्र कपडे घातलेले सद्गृहस्थ तिथे मांडी घालून बसलेले होते. माझ्या मित्राने त्यांच्या पायावर डोके ठेऊन नमस्कार केला. मला काहीच कळेना. मग माझा मित्र म्हणाला की ते त्याच्या जावयाचे गुरु आहेत तेव्हा मीही व्यवहार म्हणून त्यांना नमस्कार केला. पुन्हा बसलेले दिसले. तोपर्यंत माझ्या मित्राच्या जावयाने त्यांना माझ्या परमार्थाच्या आवडी बद्दल कल्पना दिली होती. ते माझ्याशी बोलू लागले व मला त्यांचे घरी येण्यास आग्रह करू लागले. त्यावर मी मंदीरे पाहून झाल्यावर त्यांचेकडे येऊ असे सांगितले.

संध्याकाळी आम्ही सर्व त्यांच्याकडे गेलो. त्यांना सर्व बापजी म्हणत. ते एकटेच असतात. घर अगदी स्वच्छ, सर्व ठिकाणी पांढरा रंग दिलेला व गादी तकी-यावर देखील पांढरे शुभ्र अभ्रे होते. एकंदरीत वातावरण फार प्रसन्न होते. त्यांचे समोर बसल्यावर हळूहळू त्यांनी माझ्याशी बोलायला सुरवात केली आणि न कळत माझ्या हल्लीच्या साधनेच्या टप्पेचे वर्णन करून आता पुढे काय हा प्रश्न केला. माझी गोंधळलेली स्थिती पाहून त्यांनी मी यापुढे काय करावे हेही सांगितले-जणू काय श्रीसाईबाबांनीच हा योग घडवून आणून बापजी महाराजांच्या मुखाने मला अध्यात्मात पुढील मार्गदर्शन केले.

अशा प्रकारे यावर्षी १९ फेब्रुवारी गुरुवार रोजी बाबांनी माझ्या इच्छेप्रमाणे डाकोर येथील श्री रणछोडरायांचे दर्शन घडविले, आम्हा उभयतांचा गुरुवारचा उपवास साध्य करून दिला, श्री दत्ताच्या दर्शनाचा नियम पाळवून घेतला आणि अखेर एका महान् संताची भेट घडवून पुढील मार्गदर्शनही करून दिले. माझ्या-सारख्या उपासनेच्या मार्गातील अजाण बालकाला याहून अधिक काय पाहिजे ! हा दिवस म्हणजे माझ्या आयुष्यात सुवर्ण अक्षराने कोरून ठेवण्यासारखा वाटतो व श्री साईबाबांचे उपकार आठवून हृदय प्रेमाने व भक्तिने उचंबळून येते.

या उपकारा साईनाथा । केवीं उतराई व्हावें आतां ।
आम्हा काहीच कळेना सर्वथा । ठेवितो माथा चरणांवर ॥
हीन दीन आम्ही पामर । कृपा असावी अनाथांवर ।
आता येथूनि पुढे निरंतर । चरणी तव थार असावा ॥

(अ. ४८ ओ. १६९-१७०)

# भक्त कैवारी साईमाऊली!

—कु. कलावती दामोदर पालके
श्रीसाईबाबा मंदिर, ' वडगाव शेरी '
पुणे पीन कोड नं. ४११०१४

● साईबाबा! एक महान विभूती; ज्यांच्या नाममात्र स्मरणाने अंगप्रत्यंग एका अविस्मरणीय आनंदाने फुलून जाते. क्षणाक्षणाला आपण सुखसागरात डुंबत असल्याची जाणीव होते. खरोखरच ज्याने एकदा पुण्यपावन शिरडीत येऊन श्रींचे व समाधीचे दर्शन घेतले, त्याने आपल्या क्षणभंगूर जीवनातले एक सफल ध्येय गाठले. असे म्हणण्यात काहीच वावगे ठरणार नाही. असंख्य साईभक्तांचा हा एक गोड अनुभव आहे आणि साईमाऊलीने वेळोवेळी या अनुभवांना चमत्कारांची जोड देऊन एक मोठी पर्वणीच गाठली आहे.

श्रींच्या केवळ क्षणमात्र चिंतनाने मनाला जे सुख मिळते ते इतरत्र कुठेही मिळू शकणार नाही अशी माझी दृढ खात्री आहे. बाबांच्या असंख्य भक्तात बाल भक्तांपासून वयोवृद्ध भक्तांपर्यंत अनेक धर्मीय, जातीय भक्त आहेत. त्यांच्यातीलच मी पण एक सामान्य भक्त आहे. वयाच्या पाचव्या वर्षापासून वात्सल्याच्या सावलीत मी भक्तीचे धडे घेत आहे.

साईबाबांवरील माझ्या विश्वासाला पूर्णाकार एका अविस्मरणीय चमत्काराने आला. घटना ८–९ महिन्यापूर्वीची आहे. मला रक्तक्षेमाचे जुलाब होऊ लागले त्या प्रसंगाच्या स्मरणाने अजूनही माझ्या अंगावर रोमांच उठतात. जवळ-जवळ पूर्ण आठ दिवस अन्नपाण्याविरहीत गेले. प्रत्येक दिवसाला ८ ते १० वेळा जुलाब होत असत. क्षणाक्षणाला शक्ती क्षीण होत असे. चहा-कॉफी तर सोडाच; पण साधे ग्लुकोजवॉटर सुद्धा पचत नसे. कुठलेही औषध अथवा घरगुती उपचार घशाखाली उतरले की लगेच जीवघेणी उलटी व्हायची. माझी स्थिती अगदी अगतिक झाली. कोणत्याही क्षणाला माझी जीवनलीला या बालवयातच संपणार अशी पक्की ठरत असलेली खात्री आणि माझ्या असहाय अवस्थेकडे पाहून सगळयांनी धीर सोडला.

अत्यंत विचित्र मनोदशेत असताना सुद्धा आम्ही बाबांवर पूर्ण विश्वास टाकून, त्यांचा धावा करू लागलो. आमच्या कळकळीच्या प्रार्थनेला माझ्या साईमाऊलीने त्वरीत प्रतिसाद दिला. माझ्या आईला एक अदृश्य शक्ति सुचवू लागली. "माझ्यावर पूर्ण विश्वास आहे ना ! मग कां घाबरता ? बाटलीभर पाणी माझ्या फोटो-वरून उतरा आणि तेच ! तीर्थ म्हणून मुलीला पाजा."

क्षणार्धात हरवलेली शक्ति एकवटून आली आणि बाबांच्या आदेशावर अमल बजावणी झाली ते परमपवित्र तीर्थ मी मोठ्या आनंदाने घेतले. तात्काळ माझ्या मनावरील फार मोठे दडपण ओसरत असल्याचे मला जाणवले. दिवसाला ३–४ बाटल्या फक्त तीर्थ पिऊन मी श्रींचे नामस्मरण करीत असे. मला झोप देखील स्वस्थ येऊ लागली.

त्यानंतर जुलाबाला विपरीत असे पदार्थ खाण्याची मला तीव्र इच्छा होऊ लागली बाबांचीच आज्ञा समजून मी तसले पदार्थ खाऊ लागले आणि घोर आश्चर्य ! म्हणजे त्याच क्षणापासून रक्त श्लेमाचे जुलाब अगदी बंदच ! माझी तब्येत सुधारली त्या दिवसापासून मला नवजीवन मिळाले.

माझ्या अंतर्मनातून न कळतच खालील ओळी ओठावर आल्या.

" कोन छुएगा उसकी परछाई रे.
जिसको बचाने वाला साई रे ,"

धन्य ती शिरडी आणि शिरडी निवासी ज्यांना बाबांच्या नित्य सान्निध्याचा लाभ घडतो. अशा या सर्वांतर्यामी आणि दयाळू साई माऊलीला माझे कोटी कोटी प्रणाम !

# साईबाबा आले नसते तर....?

—श्री. अशोक शंकर कल्याणकर
सब. पोस्टमास्तर मु. पो बाणकोट
ता. मंडणगड जि. रत्नागिरी

● तसा मी पहिल्यापासूनच नास्तिक. देव अगर दैवी शक्ति म्हणून काही असेल असे माझ्या स्वप्नातसुद्धा नव्हते. सर्व काही आपल्याहातून घडते ते आपल्याच कर्तृत्वाने अशी मनोभावना. पण देवाच्या मनात काही वेगळेच होते, त्याला एका नास्तिकाला आस्तिक बनवायचे होते. आज माझे वय जवळजवळ पस्तीशीच्या अलिकडे आहे. ४/५ वर्षापूर्वी अगदी पहेलवानासारखा तगडा दिसणारा माणूस की अचानक हातापायाचे सांधे धरून अतिशय आजारी पडलो. सर्व डॉक्टरी इलाज हरले. शेवटी कुणाच्यातरी सांगण्यावरून घरी गुरुचरित्राचे सप्ताहपारायण करण्याचे ठरले व त्याच सप्ताहात परमेश्वराने आपल्या अस्तित्वाची मला जाणीव करून दिली. त्यावेळेपासून जगात देव म्हणून कोणी तरी आहे, याची खात्री पटली. प्रत्यक्ष दैवी चमत्कार पाहिल्यानेच व त्या दैवी चमत्काराचा माझ्या स्वतःवर प्रयोग झाल्या-नेच मला देव आहे हे मान्य करावे लागल. देवाला अद्वातद्वा बोलणारा मी प्रथम तुळशीपत्र तोंडात घेऊन देवाची क्षमा मागितली व त्यावेळपासून मी नित्यनियमाने आपले दैनंदिन काम सांभाळून देवाची पूजाअर्चा करू लागलो. या माझ्या अल्पशा सेवेनेसुद्धा देवांनी मला वेळोवेळी बारीकमोठ्या सर्व कामात मदत केली आहे.

आता "साईबाबा" माझ्या जीवनात कसे आले ते मी सांगणार आहे. आमच्या पोस्ट ऑफिसच्या शेजारी एक गुर्जरांचे घर आहे. त्यांचे मामा श्री. नारा-यण उर्फ काशिदास पुरुशोत्तम मेथा हे व्यापारानिमित्त नेहमी बाणकोट गावी येतात. त्यांची माझी ओळख झाल्यावर त्यांनी मला एक श्री साईबाबांचा फोटो फ्रेम करून आणून दिला. मी तो माझ्या देवघरात ठेवून इतर देवांबरोबर त्यांची पूजा करू लागलो. या गोष्टीला केवळ ४/५ महिने झाले असतील.

ता. १–७–१९८० मंगळवार व अंगारकी संकष्टचतुर्थी याच दिवशी श्री साईबाबांनी मला मरणाच्या मगरमिठीतून कसे सोडविले ते मी सांगणार आहे. बाणकोट पोस्टऑफिसच्या मागील बाजूस समुद्र किनारा असून येथे सावित्री नदी

समुद्रास मिळते. पोस्टाचे मागील बाजूस माडांची झाडे आहेत. मी दररोज रात्रौ नित्यनियमाने या माडांच्याखाली संडासास जातो. आज संकष्ट चतुर्थीचा माझा उपवास होता व काल रात्रौ जागरण झाल्यामुळे आज मला लवकर झोपेची नितांत गरज होती. परंतु काळाच्या मनात मला चीरनिद्रा द्यावयाची होती. पण साईबाबांच्या...त्यांना एका पामरास आपल्या पायाशी ठेवायची इच्छा होती. त्याचे असे झाले...कालच्या जागरणामुळे त्रासून चंद्रोदयापर्यंत न थांबता मी देवपूजा लवकर आटोपली व नित्याप्रमाणे त्या जागी संडासाला जाण्यासाठी बाहेर पडत होतो. इतक्यात पावसाच्या मोठ्या सरी आल्याने आपणास छत्री असताही हा पाऊस भिजवल्याशिवाय सोडणार नाही या विचाराने मी संडासला जायचा विचार रद्द करून मागे फिरलो व लाईट बंद करून अंथरुणावर पडलो. १/२ मिनिटे व्हायच्या आत मागच्या बाजूला मोठा कडाड्-धप्प असा आवाज झाला. व काहीतरी पडले. दरम्यान शेजारचे लोक तेथे जमले. मी दरवाजा उघडून बाहेर येऊन पहातो तर... एकदम चाट पडलो...कारण मी रोज रात्रौ याचवेळी त्या जागी जाऊन संडासला बसतो, व आताही दोन मिनिटांपूर्वी तिथेच गेलो असतो. हा सर्व प्रकार पाहून मी क्षणभर दिडमूढ झालो, व माझ्या सर्व देवांचे व साईबाबांचे आभार मानले. यात मीं आज साईबाबांनाच या माझ्या निवारण्याचे श्रेय का दिले त्यालाही कारण तसेच आहे. कारण आजच सकाळी ( ता. १–७-१९८० रोजी ) आमचे शेजारी येणारे व मला साईबाबांचा फोटो आणून दिलेले श्री. नारायण उर्फ काशिदास पुरुषोत्तम मेथा ( रा. महाड ) यांनी मला त्यांनी शिरडीहून आणलेला साईबाबांचा प्रसाद व उदी दिली होती. मी पूजा आटोपल्यावर प्रसाद व उदी खाल्ली होती. माझी खात्री आहे. याच प्रसाद व उदी रुपाने साईबाबांनी मला संडासाला जाण्यापासून परावृत्त केले व माझे रक्षण केले. आज जर साईबाबा माझ्यासाठी धाऊन आले नसते तर...तर मी केव्हाच अनंतात विलीन झालो असतो, व हा प्रसंग प्रकट करण्याचे भाग्य मला मिळाले नसते. साईबाबांनी उत्तरोत्तर आपल्याजवळ येऊन त्यांची सेवा करायची बुद्धी देवो अशी प्रार्थना करून मी माझा हा पहिला वहिला स्वानुभवाचा प्रसंग त्यांनाच अर्पण करतो.

# सूर्य नारायण महाराज साईनाथ

—सौ. सरला सूर्यकांत गर्जे
आखाडे बिल्डींग, ८० शिवाजी नगर, पुणे

▲

● बाबा म्हणजे साक्षात सूर्यनारायण. सर्वांना जीवन देणारे, जीवनात प्रकाश पाडणारे. जीवनात पदोपदी बाबांचे अस्तीत्व जाणवत असते. बाबांच्या अस्तीत्वाने जीवन फुलते.

छोट्या छोट्या गोष्टीतही चमत्कार दाखवून बाबा भक्तांना सात्विक आनंदाने दिव्यानंदाने भाराऊन टाकतात.

असाच एक प्रसंग. पावसाळ्याचे दिवस होते. पावसाळी हवेने जीव जड झाला होता, आणि त्यात रविवार, म्हणून सकाळी उशीरा साताच्या सुमारास उठले. चहा केला. पाणी भरले, व चहा पीत देवघरात बाबांच्या फोटो समोर बसले. यजमान पूजा करीत होते. त्यांनी बाबांचा फोटो स्वच्छ पुसला होता. बाबा जणू काही आंघोळ करूनच आलेत की काय असे भासत होते. बाहेर वऱ्हांड्यात सूर्यप्रकाश पडला होता. सतत तो सूर्यप्रकाश मनास आल्हाददायक वाटत होता. अंगातील जडपणा नाहीसा होत आहे असे त्या सूर्य प्रकाशाकडे पाहून वाटत होते. उत्साह वाटू लागला. फोटोकडे पाहून मनोमन बाबांना म्हणाले बाबा ! हा जीवनाला उत्साहीत करणारा सूर्य प्रकाश तुमचाच आहे. बाबा तुम्ही म्हणजेच सूर्यनारायण आहांत असा विचार करून उठले व स्वयंपाक घरात जाऊन कांदा-पोह्यांची तयारी करू लागले.

इकडे यजमानांनी त्या फोटोस गंध लावला. पूजा केली व ते मला मुलांना प्रसाद घेण्यास हाका मारू लागले, म्हणून मी पटकन् देवघरात गेले. नमस्कार करून पाहू लागले तर काय आश्चर्य ! त्यांनी बाबांच्या फोटोला कपाळावर उभा रेखीव अष्टगंध सुंदर उभा रेखीव कोरला होता. गळयात गंधानेच सुंदर माळ काढली होती व शिवाय बाबांच्या डोक्याभोंवती सूर्यकिरण पाहून मला आश्चर्याचा व आनंदाचा धक्काच बसला व आनंदाश्रू वाहू लागले.

किती आश्चर्याची गोष्ट ! आज किती दिवसांनी पाऊस थांबून थोडेसे ऊन पडावे व त्या उत्साहीत करणाऱ्या उन्हास पाहून मी बाबांना सूर्याची उपमा द्यावी अन् बाबा म्हणजे साक्षात् 'सूर्यनारायण' म्हणून मनोमन प्रार्थना करावी, आणि

बाबांनी त्यांना सूर्यकिरण काढण्याची प्रेरणा देऊन माझे मनोगत पूर्ण करावे, व या दिव्य सात्त्विक आनंदाने मन भाराऊन टाकावे. म्हणजे बाबा भक्तांची इच्छा कशी पूर्ण करतात याचे हे दिव्य उदाहरण होय.

या सात्त्विक आनंदाने माझे मन बाबांविषयी अगदी तन्मय होऊन गेले. खरोखर बाबा म्हणजे ब्रह्मांडनायक देवाधीदेव भगवान सूर्यनारायणच होत. हे त्रिवार सत्य !!

# –० साईबाबांचा अद्‌भुत अनुभव ०–

–श्री. शांतीलाल डी. राठोड
सरकारी वसाहत ब्लॉक नं. इ/६,
मु. पो. पालनपूर, जि. बनासकाठा
उत्तर गुजराथ पिन ३८५००२

* पूज्य साईबाबांच्या असीम कृपेने माझ्या एका मित्राच्या नोकरीवर येणारे भयंकर संकट दूर करून कल्पनातीत फायदा करून देऊन आम्हास त्यांनी कायमचे ऋणी केले आहे.

माझे मित्र केशवलाल आणि मी एकाच ऑफिसात बरोबर नोकरी करीत होतो. ते महेसाणा जिल्ह्यातील विजापूर तालुक्यातील कुकरवाडा गावाचे राहणारे. ते येथे गावापासून बरेच लांब नोकरी निमित्ताने राहात असल्याने नेहमीच उदास असत. या कारणाने ते ऑफिसात नियमित हजर राहू शकत नव्हते आणि जेव्हा हजर रहात तेव्हासुद्धा ऑफिसचे काम लक्षपूर्वक करू शकत नव्हते. तसेच वारंवार विना परवानगीने लांब मुदतीचे रजेवर रहात. परिणाम म्हणून अधिकाऱ्याकडून त्यांना कडक स्वरूपाच्या सूचना मिळत. बिनपगारी रजेमुळे त्यांना आर्थिक समस्या सतत रहायची. असेच जर यापुढे झाल्यास त्यांच्या नोकरीवर गंडांतर आले असते यावर एकच उपाय होता तो म्हणजे बदली.

मागील दोन-चार वर्षापूर्वीच त्यांनी महेसाणा येथील उपकार्यालयात स्वतःच्या खर्चाने बदलीचा अर्ज वरिष्ठ कार्यालयाकडे आणि त्या बाबतीतली सर्व पूर्तता करूनही काहीच प्रगती नव्हती.

अशातच एके दिवशी दुपारच्या सुट्टीत मी 'श्री साईलीला' चा 'उदीविशेषांक मार्च १९७९' वाचत असतानाच माझे मित्र केशवलाल माझ्या शेजारी येऊन बसले. त्यांनी अंक पाहिला परंतु अंक मराठी भाषेत असल्याने त्यांना काही समजले नाही. त्यांची आतुरता लक्षात घेऊन मी समाधानासाठी पुस्तकातील दोन-तीन प्रेरक प्रसंग ऐकविले. ते ऐकून त्यांनी विशेष उत्सुकता दाखविली. दुसऱ्या दिवशी म्हणजे दिनांक १३-३-७९ रोजी मी त्यांना लेखक प्रभाकर सुंदरराव आगासकर यांनी लिहिलेल्या "श्री साईलीलामृत" या ग्रंथाचे गुजराती भाषेतील अनुवादाचे पुस्तक दिले. या पुस्तकाच्या वाचनाने ते फारच प्रभावित झाले. दिनांक १६-३-७९ रोजी रात्री दहाच्या सुमारास पुष्प एकविसावे हे प्रकरण वाचले. या वाचनाने त्यांना वर्णू न शकणारी अशी अनुभूती व्हावयास लागली नि एकदम भाववेगात येऊन बाबांना त्यांनी हाक दिली. "हे बाबा, आपण परमकृपाळू आहांत. आपण सर्व शक्तीमान आहांत. त्यासाठी मजवर कृपा करा आणि माझ्या बदलीचा हुकूम महेसाणा, विजापूर, पिलवाई या तिघांपैकी कुठल्याही गावास झाल्यास शनिवार दिनांक १७-३-७९ ते २१-३-७९ बुधवारपर्यंत झाल्यास मी आपल्या नावाने तीन गुरुवार उपवास करीन. शक्य तो पिलवाई येथे बदली झाल्यास योग्य.

आणि खरोखरच चमत्कार झाला. मंगळवार दिनांक २०-३-७९ रोजी दुपारच्या टपालने त्यांची पिलवाई येथे बदली झाल्याचा हुकूम आला. हा हुकूम सुद्धा १३-३-७९ रोजीच खात्याकडून रवाना झालेला होता. ही बातमी सर्वप्रथम सुपरिटेंडेंट साहेबांकडून मला मिळाली आणि मी ही शुभवार्ता मित्रांना बोलवून सांगितली. प्रथम तर यांचा विश्वासच बसला नाही. नंतर लेखी ऑर्डर दाखविताच ते अत्यंत आनंदीत झाले. ऑफिसातील सर्व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन स्वीकारून नंतर मला एकांतात घेऊन सांगितले. पुस्तक वाचण्यापासून तर संकल्पासंबंधीची माहिती दिली. हे सर्व सांगत असताना त्यांच्या डोळयात आनंदाश्रू उभे राहिले. मी सुद्धा भावनाविवश झालो. शब्द फुटेनासे झाले. आमच्या दोघांचे मन आणि हृदय पूज्य बाबांच्या पायाशी लीन झाले. यावेळी आमची स्थिती एक अद्‌भूत भावसमाधी सारखीच जणू झाली होती.

असा ज्वलंत व त्वरीत अनुभव देणाऱ्या शिरडीच्या साईबाबांना माझा शतशः प्रणाम!

# आळ

—डॉ. सौ. सुमती खानविलकर
सीताकुंज, लोणावळा,

● चार पाच महिन्यापूर्वीची गोष्ट आहे. आमच्या रुग्णालयात काम करणाऱ्या बाईने मजजवळ तिच्या रिंगा ठेवण्यास दिल्या.

त्या दिवशी मी घाईतच होते पण ठेवून त्या घेतल्या. दोन महिने झाले तेव्हा मीच तिला म्हटले अग त्या रिंगा घेऊन जा बरं. ती हो म्हणाली पण आली नाही. माझ्या मनात एकदम विचार आला आपण त्या रिंगा ठेवल्या तरी कोठे ?

कपाट, बॅगा, ड्रेसिंग टेबल, पर्सेस सारे काही शोधले. सूनेला विचारले, तिलाही काही सांगता येईना मग मात्र काही सुचेना. परत परत तपासले सारे पण रिंगा कोठे ठेवल्या ते आठवेना.

मोठी मुलगी शैला व लहान मैथ्या दोघी पण मधल्या अवकाशात येऊन गेल्या होत्या, दोघींना पण बोलावून घेतले पण काही शोध लागला नाही.

आता मात्र मनस्ताप सुरू झाला कारण आपण जरी पैसे दिले तरी घेणाऱ्या व्यक्तीचे समाधान होणार नाही. उलट अविश्वास उत्पन्न होईल अशी भिती. काय करावे काही सुचेना.

एके दिवशी ती रिंगा मागायला आली. मी घरात नव्हते. सूनेने सांगितले, उद्या या, ती गेली आहे. मी बाहेरून आले. तिने सांगितले मात्र-मन एकदम निराश झाले. आपला अपराध नसताना आपण अविश्वासाला कारणीभूत होतो आहोत.

तिला बाहेरगावी जायचे होते. रिंगाचे फासे सैल झाले होते म्हणून ठेवून गेली. सोन्याच्या रिंगा होत्या. त्या बिचारीने जीव मारून पैसा साठवून केलेल्या. सारे डोळ्यासमोर दिसू लागले. काय करावे काही सुचेना. त्या दिवशीच माझा भाऊ मुंबईहून आला होता. त्याला कळले तो म्हणाला. थांब अशी गांगरतेस काय तू बस, शांत, मी शोधतो पण छे रिंगा सापडायला तयार नाहीत. मैत्रीण डॉ. इंदू नाईक यांनी कपाट तपासले. साधारण ठेवण्याची ठिकाणे तपासली पण छे अगदी हटवाद्यासारख्या लपून बसल्या.

शेवटी बाबांच्या समोर निराश होऊन बसले. गुरुवार होता. बाबांना कळवळून हाक मारली. मनोमन प्रार्थना केली. बाबा लेकीची अब्रू वाचवा उगाच हा आळ का घेता. जागा दाखवा आणि आजच्या आज रिंगा मिळू द्या.

बाबा मी प्रयत्न केले. हरले मी बाबा हरले. आज उपवास आहे तुमच्या नावाचा. मग मी उपाशीच राहीन. रिंगा सापडतील तेव्हाच जेवीन. नाहीतर रिंगा आज सापडू देत.

मी बाबांकडे पहात बसले. मनातून बाबांची प्रार्थना चालली होती. बाबा तुमच्यावरचा विश्वास डळमळू देऊ नका. बाबा तिने विश्वासाने वस्तू दिली तिची तिला परत देऊ द्या. तुमच्या कृपेने त्याची किंमत मी देऊ शकेन पण ते योग्य नव्हे अशी प्रार्थना चालली होती. डॉ. नाईक समजावत होत्या. त्या म्हणाल्या, चल शांतपणाने परत शोधू. मी म्हटले छे आता बाबांनीच किमया केली तर. सारे सारे शोधले आता उपकार करताना अपकार पदरात पडणार, होऊ दे काय होते ते चिडून म्हटले, मी व बाबांच्याकडे पाहून पहा मजा या लेकीची असे रागाने म्हणत आळवणी चालली होती. मैत्रीण इंदूने माझ्याकडे लक्ष न देता कपाटातले कपडे इतर सारे बाहेर काढले. इतक्यात एक पुडी दिसली. सुमे, बघ बरे याच्यात काय आहे. मी रागानेच म्हटले बघ तूच पोटभर. मी दमले. तिने पुडी उघडली तर त्याच्यात पंढरपूरच्या कान्होपात्रेच्या झाडाची पाने व हळदकुंकू. दुसरी पुडी काढली तर त्यात उदी व आंगठी, बाबांची चांदीची, थोडी आशा वाटली. इतक्यात सुमे, बाबा आहेत ग. आपल्या भक्ताची अब्रू कसे घालवतील तुझ्याबद्दलचा गैरसमज दूर केला. ह्या बघ रिंगा. इतके तिने म्हटले मात्र मला काही सुचलेच नाही. तोंडातून बाबा माझे बाबा असे आले व डोळयातून आनंदाश्रु वाहू लागले. गहिवरून गेले. बाबा किती चांगले आहात हो तुम्ही भक्तांच्या संकट काळी धावून येता. माझा विसरभोळेपणा व मी तुम्हाला दोष दिला रागावू नका या लेकरावर.

# महाबळेश्वर ट्रीपमध्ये श्रीसाईबाबांनी डबा परत मिळवून दिला

—श्री. नंदकुमार रामचंद्र खेले
'सौभाग्य' १७४६, शुक्रवार पेठ,
जेधे प्रासाद रस्ता, पुणे–४११ ००२.

● आम्ही तीन जोडपी व सहा लहान मुले अशी १२ माणसे ता. २४ मे १९८० रोजी दुपारचे 'पुणे महाड' एस. टी. बसने निघून महाबळेश्वरला पोहोचलो, महाबळेश्वरला प्रथमच जात होतो व तीन दिवस मुक्कामाकरीता लागणारे शिधा-साहित्य स्टोव्ह, भांडी, कपडे इ. सर्व काही बरोबर घ्यावेच लागले होते. कारण सिझनमध्ये तेथे अफाट महागाई असते. सामानाचे डाग व पेट्या मिळून १४ ते १५ डाग तयार झाले, स्टॅन्डवर उतरल्यावर सर्व डाग व्यवस्थित उतरवून घेतले. प्रवासाचा थकवा आल्यामुळे प्रथम फ्रेश झालो, चहा घेतला व प्रयत्न करून एक रुम भाड्याने घेतली. नंतर हमालामार्फत सर्व सामान रुमवर आणले, त्यावेळी सायंकाळ झाली होती, स्वयंपाकाकरीता लागणारे साहित्य बाहेर काढताना एक महत्त्वाची वस्तू—मोठा ॲल्युमिनिअम डबा, ज्या डब्यात किरकोळ स्टीलची भांडी, खोबरे, तिखट, चहापावडर, तेल, साखर व अन्य आवश्यक खाद्यपदार्थ ठेवले होते. नाहीसा झाल्याचे आढळले, शोधाशोध केली, सापडेना.

मी स्वतः स्टॅन्डवर जावून सर्वत्र चौकशी केली परंतु डबा सापडला नाही एकुण डबा साहित्य व चिजवस्तूसह अंदाजे रु. १५०|– चा होताच, त्यामुळे सर्वजण खूप नाराज झाले, ट्रीपचा 'मूड' बिघडला, एस. टी. स्टॅन्ड प्रमुखाना महाडला फोन करून चौकशी करण्याची विनंती केली, परंतु त्यांनी उत्तर दिले की, "फोन लागलीच लागणार नाही, पाच ते सहा तास लागतील!" रात्रीचे आठ वाजले होते, महाडकडे जाण्यास गाडी नव्हती. जावूनही काही उपयोग होईल असे वाटेना, कारण डबा गाडीत राहिला कां स्टॅंडवरूनच गेला हे कोणालाच सांगता येईना, निराश झालो, त्यात गेलेले शिधासाहित्य पुन्हा खरेदी करावे लागणार होते, त्यात तेथे महागाई! तरीही ट्रीप व्यवस्थित व्हावी म्हणून मी सर्वांना धीर दिला व मनात श्री साईबाबांचे ध्यान करून, त्यांना एक छोटासा नवस केला व त्यांना मनोभावे

सांगितले, "बाबा आमचा हरवलेला डबा, सर्व साहित्यासह आम्हाला विनासायास परत मिळू द्या, मी पुण्यात पोहोचताच स्वारगेट जवळील आपल्या मंदिरात येवून हार, नारळ व पेढे आणून आपली पूजा करीन !"

असे श्री बाबांना प्रार्थनापूर्वक सांगितल्यानंतर पुन्हा स्टॅन्डप्रमुखाना भेटून चर्चा केली ते म्हणाले, "तुम्ही उद्या सकाळी ११ वाजता स्टॅन्डवर या. तीच एस.टी. बस गाडी, तेच ड्रायव्हर व कंडक्टर घेवून येतील, त्यांना भेटा, जर डबा त्यांना मिळाला असेल तरच तो मिळेल !"

दुसरे दिवशी सकाळी श्री साईबाबांचे नामस्मरण करीत करीत मी एकटाच महाबळेश्वर स्टॅन्डवर येवून 'महाड पुणे' गाडीची वाट पहात बसलो. गाडी वेळेवर आली, गर्दीतून वाट काढीत कंडक्टर बाहेर येताच मी त्याला भेटलो, नमस्कार करून त्याला डब्याबद्दल सांगितले, तो काय आश्चर्य ! तो म्हणाला "साहेब तुमचा डबा आम्ही सुखरुप आणला आहे, ड्रायव्हरचे केबीनमध्ये ठेवला आहे, घेऊन जा !"

कंट्रोल केबीनमध्ये जावून डबा मिळाल्याचे लिहून दिले. बक्षीस तर दूरच परंतु एक कप चहासुद्धा आमचेकडून न घेता त्या ड्रायव्हर कंडक्टरने गाडी सुरू केली. आमचा महत्त्वाचा डबा मिळाल्यामुळे सर्वांना आनंद झाला व आश्चर्यही वाटले.

आहे की नाही त्यांना आपल्या भक्तांची काळजी ! सदैव श्री बाबा आपल्या भक्तांचे हाकेला ओ देतातच, श्रद्धा मात्र पाहिजे. ट्रीप मजेत झाली, पुण्यात येताच नवस पूर्ण केला.

## — अभिनंदन —

कु. राजबाली दत्तात्रय बागवे, के. जे. सोमय्या महाविद्यालय कोपरगाव, ही विद्यार्थिनी माहे मे सन १९८० मध्ये झालेल्या टी. वाय. बी. कॉम परिक्षेत प्रथम क्रमांकाने फर्स्ट क्लासमध्ये उत्तीर्ण झाली. ६०० पैकी ३९४ म्हणजे ६५.६६% गुण तिला मिळाले. ऑडीट १०० पैकी ७४ व अकौंटमध्ये ७१ गुण मिळाल्याने ती सर्वांमधे प्रथम आली. सन १९७९-८० ह्या वर्षी ती सोमय्या कॉलेजची विद्यार्थिनी प्रतिनिधी होती. राजगुरुनगर (पुणे) येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन टेबल टेनिस स्पर्धेतील प्राविण्यामुळे तिची निवड मालेगाव येथे होणाऱ्या राज्य पातळीवरील टेबल टेनिस स्पर्धेसाठी झाली होती, तिने साईनाथ माध्यमिक विद्यालयात शिरडी येथे एस. एस. सी. ला असेच चांगले यश संपादन केले होते. श्रीसाईबाबांचे आशीर्वाद सदैव माझे पाठीशी असल्यामुळे मी हे यश संपादन करू शकले असे ती सांगते. तिचे वडील श्रीसाईबाबा संस्थानमध्ये नोकरीस आहेत. ☆

# ही खरेच साईकृपा

◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆

—डॉ. इंदूताई नाईक
सीताकुंज, बॉम्बे-पुणा रोड,
लोणावळा

● माझी भाची पहिल्या खेपेस गरोदर होती. योग्य वेळी पोटात दुखू लागले. घरच्या देवास नमस्कार करून बाबांची उदी लावून मी तिला हॉस्पिटलमध्ये घेऊन गेले—तो संध्याकाळचा समय होता. डॉक्टरानी तपासून ती पहाटेपर्यंत होईल असे सांगितले.

तिच्या कळा उत्तम होत्या. जशा हव्या असतात तशाच होत्या. पहाटे डॉक्टरांनी परत तपासून ती संध्याकाळशिवाय होणार नाही असे सांगितले. आता तिला वेदनांचा फारच त्रास होऊ लागला. परत तपासल्यावर तिचा जसा प्रोग्रेस व्हावयास हवा होता. तसा होत नव्हता. ती संध्याकाळी सहानंतर झाली तर होईल असे डॉक्टरांचे मत पडले. तिला तर कळा सहन होत नव्हत्या. कळा वरचेवर येऊनदेखील फायदा होत नव्हता.

मी तिला देवाचे नाव घे, गणपतीला हाक मार. बाबांना हाक मार. सारखे सांगत होते. दोन-तीन वेळा बाबांची उदीपण दिली. पोटाला लावली होती. सकाळी आठ वाजता जेव्हा तपासून "ती संध्याकाळपर्यंत झाली तरी नशीब, अजून बराच अवकाश आहे." असे डॉक्टर म्हणाले. माझी भाची तर रडूच लागली. मी तिला सारखी धीर देत होते. परत एकदा तिला उदी लावण्यास सांगितले व तिला म्हणाले, 'हे बघ, बाबांच्यावर विश्वास ठेव. ते सर्व ठीक करतील. परंतु वेदनामुळे त्रासाने ती रडकुंडीस येऊन म्हणाली, अग मी सर्वांवर विश्वास ठेवते. बाबांवर पण विश्वास ठेवते पण बाबा माझेकडे पहातच नाहीत आणि रडू लागली. मला पण गहिवरून आले. मी बाबांची उदी हातात घेतली आणि तिच्या पोटाला लावली. थोडी कपाळावर लावली व तोंडात टाकली आणि बाबांना सांगितले.

बाबा, तुमच्या लेकीला सुखरूप मोकळी करा. तुमच्यावर पूर्ण विश्वासाने आम्ही विसावलो आहोत. तुमची लेक आता तुमच्या ताब्यात आहे. कृपा करा. आणि परत उदी लावली व तोंडात टाकली. त्यावेळी १२ चा सुमार होता. आणि त्या नंतर तिच्या वेदना वाढल्या. प्रोग्रेस आला आणि ती २ तासात बाळंत झाली. मुलगा झाला. सर्व सुखरुप झाले. डॉक्टरांच्या अंदाजाच्या आधी जवळ जवळ ५ तास तिची सुटका झाली ही बाबांचीच कृपा म्हणायचे नाही का ?

# पापण्यांच्या गाठी बऱ्या झाल्या....!

—श्री. रमेश डी. चव्हाण
'साईनिकेतन' गुजर गल्ली
मु. पो. ता. नवापूर जि. धुळे

● श्री साईबाबांनी मला अनेक अनुभव दाखविलेत म्हणूनच माझा त्यांच्यावर परमावधीचा विश्वास जडला; परंतु माझी धर्मपत्नी सौ. कुसुम चव्हाण ( पत्रकार) हिचा बाबांवर विश्वास बसत नव्हता. नादब्रह्माने नटलेले संगीत एखाद्या ठार बहिऱ्याच्या कानी पडले तर ते व्यर्थ असते तसेच आंधळयाला प्रकाश व्यर्थ असतो तद्वतच श्रद्धा नसलेल्यास साईचे अनुभव दृग्गोचर होत नाहीत.

माझ्या पत्नीच्या माहेरची माणसे विशेषतः तिचे वडील साईबाबांना मानत नव्हते. बाबांच्या बोलीमुळे व पेहरावामुळे ते मुसलमान आहेत अशी त्यांची वेडी समजूत होती. त्यामुळेच की, काय सौ. कुसुमसुद्धा बाबांना मुसलमान समजून निंदा करायची असे असले तरी मी करीत असलेल्या भक्तीत कधी आडवी मात्र आली नाही. सौ. च्या मनात साईबाबांबद्दल नितांत आवड निर्माण व्हावी व भक्ती जडावी म्हणून मी साईबाबांचे अनुभव व महत्व तिला अधुनमधून जाणूनबुजून सांगत असे.

आजच्या शस्त्र आणि शास्त्र युगामध्ये माणसाचे जीवन अनेक स्थित्यंतरातून जात असते अशा धकाधकीच्या व धावपळीच्या काळात वावरणाऱ्या माणसाला दिलासा देण्याचे सामर्थ्य श्रीसाईबाबांच्या ठायीच आहे. ज्यावेळी माणसाला माणसा-कडून सहाय्य मिळत नाही. माणूस आधीव्याधींनी नि नाना अडचणींनी घेरला जातो तेव्हा बाबा निश्चितपणे धावून येतात असे सौ. ला ठामपणे सांगायचो. एकदा तर तिला शिर्डीलाच नेले त्यावेळी मनोज अवघ्या एक वर्षाचा होता. योगायोगाने तो शिर्डीत एकाएकी आजारी झाला तेव्हा पत्नीने मला सांगितले. "हेच काय तुमचे बाबा !" असे उपहासात्मक बोलली परंतु मी शांत होतो. मला खात्री होती मनोजला काहीही होणार नाही. सश्रद्ध अंतःकरणाने बाबांची प्रार्थना करून शिर्डीहून परतलो. दोन-तीन दिवसात मनोज बरा झाला.

मी निस्सिम साईभक्त तर पत्नी कडवी विरोधक म्हणून माझ्या मनात गोंधळ उडायचा. मी बाबांना विनंती केली की, "बाबा कुसुमला असा काही अनुभव दे की, तिची तुमच्यावर दृढ श्रद्धा बसावी."

बाबांनी माझी विनंती ऐकली होती पण योग्य वेळ यायची होती. एके दिवशी मी सौ. ला सुचविले की, तू साईबाबांना मानावे.

तेव्हा जरा तोऱ्यातच ती म्हणाली, " मानीन ! पण एका अटीवर ! "

" साईबाबांना मानायला सुद्धा अट ? " मी म्हणालो.

" होय ! मला साईबाबांचा अगदी 'पर्सनल' अनुभव यायला पाहिजे. "

अन् अगदी आकस्मिकपणे पत्नीच्या डोळ्यांच्या पापणीवर गाठी उठल्या. डॉक्टरांचा पुष्कळ इलाज केला पण तिळमात्र फरक पडला नाही एक वर्ष झालं तरी त्या गाठी नाहीशा होण्याचे चिन्ह दिसत नव्हते. पुन्हा एकदा मोठ्या तज्ञ डॉक्टरांना दाखविले तेव्हा डॉक्टरांनी सांगितले. " ह्या गाठी औषधाने मिटणार नाहीत. त्यांचे ऑप्रेशन केले नाही तर कदाचित् त्या वाढण्याचा सुद्धा संभव असून दृष्टीदोष सुद्धा निर्माण होईल."

आता मात्र सौ. कुसुम चांगलीच घाबरली. आपणास दिसणार नाही...आपण आंधळया झालो तर ? ह्या कल्पनेनेच तिला रडू कोसळले. ऑप्रेशन करायला ती तयार नव्हती कारण पापणीसारख्या नाजुक जागेच्या ठिकाणी ऑप्रेशन करायचे होते.

कुसुम बराचवेळ अंथरुणावर तळमळत पडून होती. तिच्या धास्तावलेल्या देहाला निद्रेने कधीतरी काबीज केले होते. ती झोपली होती तरी झोपेतही बरीचशी जागरूक होती. झोपलेल्या अवस्थेतही तिला जाणवत होते की, आपल्याला आज रोजच्या सारखी झोप लागत नाही, धास्तावलेले मन पुन्हा पुन्हा ऑप्रेशनच्या विचारांनी व्याकूळ झाले होते.

तेव्हा मी कुसुमला सांगितले की, " जर तुला ऑप्रेशन नको असेल व गाठी लवकर बऱ्या व्हाव्यात असे वाटत असेल तर मी सांगेन त्याप्रमाणे वागायला हवे साईबाबांवर श्रद्धा ठेवावी लागेल. बाबांची उदी रोज पापणीवर लावावी लागेल म्हणजे तू व्याधीतून मुक्त होशील. "

दुःखाच्यावेळी मनुष्याच्या मनाच्या सर्व वृत्ती परमेश्वराकडे सहज लागतात. सौ. कुसुम म्हणाली, "जर बाबांच्या उदीने माझ्या गाठी बऱ्या झाल्या तर मी पाच गुरुवार व बाबांना पूर्णपणे मानीन. " साईबाबांचा फोटो समोर ठेऊन रोज पापणीना उदी लावू लागली त्यावेळी मी मनाशीच एक शेर पुटपुटलो..

"बाबा तुझ्या अनुभवांचा
असा काही साक्षात्कार आहे
नास्तिक वृत्तीचा माणूसही
स्वतःहून तुला नमतो आहे!'

ज्या गाठी वर्षभरसुद्धा डॉक्टरकडून बऱ्या झाल्या नाहीत त्या अवघ्या आठ दिवसात बाबांच्या उदीने बऱ्या झाल्या. तेव्हा मात्र सौ. कुसुमचा बाबांवर विश्वास बसला. तिने नवस केल्याप्रमाणे पाच गुरुवार कडक पाळले. आता तर ती साईबाबांची निस्सीम भक्त बनली आहे.

साईबाबांना आपण श्रध्देने शरण गेल्यास आपल्या मनोकामना पूर्ण होतात व संकटे दूर पळतात कारण बाबांनी सांगितले आहे की,

"जेथे भक्ती श्रद्धान्वित । तयाच्या मी नित्यांकित ।
ये अर्थी न व्हावे शंकित । इतरत्र अप्राप्त मी सदा ॥
जो मज लागी अनन्य शरण । विश्वासयुक्त करी मद्भजन ।
माझे चिंतन माझे स्मरण । तयाचे उद्धरण ब्रीद माझे ।
जो गाई वाडे कोडे । माझे चरित्र माझे पवाडे ।
तयाचिया मी मागेपुढे । चोहीकडे उभाच ॥

बाबांच्या अनुभवांची सत्यता कोणीही नाकारू शकत नाही. भक्तांच्या इच्छेप्रमाणे अनुभव येत असतात. भक्तांचे कर्तव्य एवढेच की, श्रीबाबांवर श्रद्धा ठेऊन त्यांना शरण जाऊन अनन्यभावाने प्रार्थना करावी इतकेच याप्रसंगी सांगावेसे वाटते. कारण—

"आता तरी जाग
मूढ रे मानवा......
होईल कल्याण
साई तो भजावा!"

☆ ☆

# श्रीसाईचे किती सांगू महिमान आमच्या आजीचे आले कान

—सौ. मालती य. आगाशे
स्युएज प्युरिफिकेशन
ऑफिसर्स क्वार्टर्स,
सेनापती बापट मार्ग, दादर मुंबई २८

● २५ ते ३० वर्षापूर्वीची गोष्ट. त्यावेळी आजच्याएवढी साईबाबांची किर्ती जनमानसात पसरली नव्हती. अशा काळात साईबाबांच्या अगाध शक्तिचा महिमा आम्हाला पटला.

आमच्या आजीला एकाएकी दोन्ही कानांनी ऐकू येईनासे झाले. आजी खेडेगावात रहात असल्याने औषधोपचार केले गेले नाहीत. माझ्या आईला ही गोष्ट कळल्यावर तिने आजीला मुंबईला आणले. आमच्या फॅमिली डॉक्टरांनी तिची तपासणी केली. इलाज चालू केले पण काही केल्या गुण येईना. शेवटी डॉक्टरानी आशा सोडली. स्पेशॅलिस्टनेहि काही उपयोग नाही असे सांगितले.

आई व आजी निराश झाल्या. पुढे मार्ग दिसेना. काही ऐकू येत नसलेला माणूस वेड्यातच जमा होतो. संशयी बनतो. आजीची अवस्था तर दयनीय होतीच, पण आईलाही चैन पडेना. सर्वात मायेचे माणूस म्हणजे आई. सर्व सुख दुख तिच्याजवळ बोलायची पण त्या माऊलीचे कान बंद. पण अशा वेळी साईमाऊली धावून आली.

आमच्या आईच्या मनात कसे आले कोणास ठाऊक ? तिने आमच्या शेजारच्या तारामाई चिवळ्याकडून साईसच्चरीत्र आणले व पोथी वाचायचा संकल्प केला दुसऱ्या दिवसापासून आजीला समोर बसवून स्वतः पोथी वाचू लागली. आजीला काही समजायचे नाही पण ती बघत बसायची. पोथी वाचून संपत आली आणि चमत्कार असा की एके दिवशी आजीच्या कानातून वालाएवढे काळे खडे बाहेर पडले व तेव्हापासून आजीला स्पष्ट ऐकू येऊ लागले. आमच्या आईचा आनंद गगनात मावेना. डॉक्टरनाही खूप आश्चर्य वाटले.

श्री साईबाबांच्या लीला वर्णनरुपी दिव्य रसायनानेच हा चमत्कार घडवून आणला यात शंकाच नाही. आजीला तिच्या मृत्युपर्यंत स्पष्ट ऐकू येत होते. साईबाबांच्या सामर्थ्याला तोड नाही. ●

# साईकृपेने पाठदुखी कायमची बंद!

—श्री. गणेश बी. नाईक
मडकई टॉक पो. मारदोळ,
गोवा

* १९७८–७९ ह्या साली मी पाठदुखीने फारच त्रस्त झालो होतो. कशाकडेच माझे लक्ष लागत नव्हते. पाठीची उजवी बाजू सारखी दुखायची. पाठीत काहीतरी चढल्यासारखे व्हायचे. कितीतरी प्रकारचा औषधोपचार केला पण काहीच गुण मिळत नव्हता. आता काय करावे हेच मुळी समजत नव्हते.

खरे म्हणजे माझे पाठदुखीचे रामबाण औषध फक्त शिरडीतच होते. तीनवेळा मी शिरडीत येऊन गेलो होतो. पण माझे त्याकडे लक्षच नव्हते. पाठदुखीने त्रस्त. अशाच एके दिवशी मी साईबाबांवर पुस्तक वाचत होतो आणि आनंदाची गोष्ट म्हणजे माझ्या पाठदुखीचे औषध मला प्रथम त्या पुस्तकात सापडले. पुस्तक वाचत असताना नेमका तोच मला आवश्यक असा मजकूर माझ्या वाचनात यावा याला खरोखरच साईकृपाच म्हणावी लागेल. लेखकाने त्या पुस्तकात लिहिले होते की पाठदुखीने पिडीत अशा व्यक्तीने जर द्वारकामाईत बाबा ज्या खांबाला पाठ टेकवून बसत असत त्या खांबाला काही वेळ पाठ टेकवून बसले तर त्याची पाठदुखी कायमची बंद होते.

प्रथम तीन वेळा जेव्हा मी शिरडीला आलो होतो, तेव्हा द्वारकामाईत मी जेव्हा येई तेव्हा मला सारखे त्या खांबाला टेकून बसावे असे वाटत होते, पण मन धजत नव्हते, मला संकोचल्यासारखे वाटायचे, कारण कुणीच मला त्यावेळी त्या खांबाला टेकून बसलेले दिसत नव्हते. खरे म्हणजे शिरडीला आलो म्हणजे मला खरी विश्रांती मिळते. नाहीतर इतर वेळा माझी सारखीच धावपळ असते. काही दिवसानंतर मी शिरडीला आलो होतो. फक्त दोन दिवसासाठी, पण तब्बल बारा दिवस मला शिरडीला थांबावे लागले. कारण साईबाबांची तशी इच्छाच होती म्हणायची शिरडीत त्यांच्या आज्ञेशिवाय कोणी येऊ शकत नाही आणि त्यांच्या इच्छेविरुद्ध कोणीही जाऊ शकत नाही हेच खरे.

ह्यावेळी द्वारकामाईत मी जेव्हा प्रवेश केला, तेव्हा साईबाबांवर पूर्ण श्रद्धा ठेऊन निःसंकोचपणे त्या खांबाला पाठ टेकून बसलो. आणि अशा प्रकारे सतत नऊ दिवस मी बाबा ज्या खांबाला टेकून बसत त्या खांबाला सकाळ संध्याकाळ मी अवघे १५ ते २० सेकंद पाठ टेकून बसून उठायचो आणि काय आश्चर्य! माझी पाठदुखी त्या ९ दिवसापासून कायमची बंद झाली. साईकृपेने आता पाठदुखीची मला कसलीच तक्रार नाही.

माझ्या सारखीच जर का इतर कुणाला पाठदुखीची तक्रार असेल तर त्यांनी सर्व औषधोपचार बंद करून साईबाबांवर पूर्ण श्रद्धा ठेवून सरळ शिरडीला येऊन बाबांच्या त्या खांबाला थोडा वेळ टेकून बसावे आणि बाबांच्या त्या खांबाच्या दैवी शक्तीचा अनुभव जरूर घ्यावा.

साईभक्ती हा माझ्या जीवनातला मोठा साक्षात्कार आहे. ●

# श्रद्धा आणि सबुरी सर्व दुःखातुनी तारी

—सौ. सिंधु देवीदास मुळीक
उंटखाना, अशोकचौक, नागपूर

● उन्हाळयाच्या सुट्टीत मी माझे सासरी कुम्हारी म. प्र. येथे नेहमी जाते. यंदा प्रथमच भिलाईला नवीन बनत असलेल्या साईमंदिरात जायचे असे ठरविले होते. परंतु काही अपरिहार्य कारणास्तव तेथे जाणे लांबणीवर पडले व रायपूरला जाण्याचा कार्यक्रम ठरला. तिथे जाण्यासाठी वाहनाची सोय नसल्यामुळे आम्ही ट्रकने रायपूरला गेलो. ट्रकमधून उतरताना माझी करंगळी दाराच्या काचेला अडकून चांगलीच जखम झाली. दैव की बोटाचे दोन तुकडे झाले नाहीत. परत आल्यानंतर पंधरावीस दिवस झाले तरी जखम ठीक होईना. सेप्टीक होण्याची पाळी आली तेव्हा सर्व कामे टाकून आम्ही पत्ता काढीत भिलाईतील साईमंदिरात गेलो. तिथे आम्ही ठीक बारा वाजता पोचलो. देवळात कुणीच नसल्यामुळे आम्हीच आरती केली व माझ्या लहान मुलांनी उदी आणून माझ्या करंगळीस लावली. नंतर तिथे निवांतपणे तीन चार तास थांबलो. श्रद्धा म्हणा किंवा विश्वास त्या दिवसापासून करंगळी सुधारत गेली. चुका व शिका याप्रमाणे साईबाबा स्वतःच भुलवतात व स्वतःच भक्तांना मार्गदर्शन करतात.

जादुगार तर दोन तासांचा खेळ करून प्रेक्षकास चकीत करतो. परंतु आधुनिक काळाचे हे साईबाबा महान जादुगार बनून निरंतर आपल्या अलौकीक चमत्कृतीने भक्ताचे संरक्षण करीत असतात. पूर्ण आयुष्य भक्तीमार्गाला लावूनही ईश्वर प्राप्ती लवकर होत नव्हती परंतु आज संसार करूनही केवळ साईनाम घोकून श्रद्धा सबुरीची जोड लावून साईची प्राप्ती करून घेता येते. त्याकरीता त्याग, तपस्या याची जरूरी नसते. आज भक्तांना साईप्राप्तीचा त्रास होत नसून साईबाबांनाच आपण आपल्या आत्म समाधानासाठी त्रास देत असतो. म्हणूनच त्यांचे भक्त म्हणतात की—

“ आम्हीच अपुल्या काजास्तव तूज कष्टवितो देवा
सहन करशिल ते ऐकूनी धावी भेट कृष्ण धावा ”

# साईबाबांचा अनुभव

—श्री. डी. बी. पोतनीस,
पिंपरी

● श्रीसाईबाबांचे अगणित भक्त आहेत. पुष्कळ भक्तांना अनुभव आले आहेत व त्यांचे इच्छेनुरुप श्रीसाईलीला मासिकात प्रसिद्ध झाले आहेत.

मला एक नवीनच अलिकडे आलेला श्री साईबाबांचा नाट्यमय अनुभव देत आहे.

श्रावणातला सोमवार. संध्याकाळी ५-२० वाजता मी शिवाजीनगर स्टेशनवर जाण्यासाठी जंगली महाराज रोडने येत होतो. मला पुणे—लोणावळा ५-४५ची लोकल मिळावी म्हणून मी पायाना गती दिली. मी ६४ वर्षाचा वृद्ध असल्यामुळे चालताना थोडा फार त्रास होतो. तरीसुद्धा सावधगिरीने रस्ता ओलांडीत असता सिमला ऑफीस चौकाकडून एक रिक्षा भरधाव येऊन मला रिक्षाची धडक बसली. मला इलेक्ट्रीकचा शॉक बसावा तसा सर्व शरीराला शॉक बसल्यासारखे झाले. मी फूटपाथवर बसलो. बघे लोकांची गर्दी झाली. त्यातील काहीजण रिक्षा ड्रायव्हरला बोलू लागले व काही म्हणू लागले की बाबा आता जरा सांभाळून रस्ता ओलांडत जा! ऑफिसे सुटतात, गाड्या वाहनांची गर्दी असते, रिक्षा ड्रायव्हर जरा घाबरल्यासारखा झाला. त्यांनी मला दवाखान्यात नेण्याची तयारी दर्शविली परंतु मी नको नको करीत असतानाच बघे लोकांनी बळेच मला उचलून रिक्षात बसविले. मी रिक्षा ड्रायव्हरला म्हणालो मला काही लागले नाही मला शिवाजीनगर स्टेशनवर घेऊन चल म्हणजे ५-४५ ची लोकल मिळेल. रिक्षा ड्रायव्हर म्हणाला आता सहा वाजले आहेत. लोकल गेली असेल. तेव्हा मी म्हणालो माझे साईबाबा दयाळू आहेत तू मला शिवाजीनगर स्टेशनवर घेऊन चल. रिक्षा ड्रायव्हर म्हणाला मीसुद्धा श्रीसाईबाबांचा बच्चा आहे. आम्ही स्टेशनात आलो तर आश्चर्यच घडले. लोकल ६ वाजून १० मिनिटांनी आली, मी रिक्षा ड्रायव्हरचा हसतमुखाने निरोप घेतला.

★

# श्रद्धा आणि सबूरी

—सौ. सुलभा दि. ऋषी रेनुकूट
जि. मिर्झापूर (यू. पी.)

● श्रद्धा आणि सबूरी ही दोन नाणी श्री साईबाबांनी आपल्या गुरुस देवून टाकली असे साईचरित्रात वर्णन आहे. ही दोन नाणी आपल्या भक्तांजवळ आहेत किंवा नाही ह्याची बाबा कधी कधी परिक्षा घेतात आणि मग जो भक्त डगमगतो त्याला आपली श्री साईबाबांवरील श्रद्धा ही अंधश्रद्धा तर नव्हे, बाबा आपल्या रक्षणास येतील का ? असा शंकेचा काळोख त्याच्या मनात डोकावू लागतो. त्याची दशा हीनदीन होते व तो अनन्यभावे केविलवाणे होऊन बाबांकडे पहातो, त्याच्या हृदयातील शंकेचा काळोख डोळयावाटे वाहू लागतो, व सबूरीच्या दिपकावर जळणाऱ्या श्रद्धेच्या ज्योतीच्या स्वच्छ प्रकाशात श्री समर्थ साईबाबा त्याला हात देतात.

जुलै १९८० च्या गुरुपौर्णिमेनिमित्य "साईचरित्राचे" पारायण शांत व सावकाशपणे व्हावे म्हणून मी एक एक अध्याय वाचण्यास सुरुवात केली. आठ दिवस लोटल्यानंतर एक अनपेक्षित संकट डोकावू लागले, व माझी मनःस्थिती अत्यंत विचलित झाली. दोन चार दिवस पोथीत अजिबात मन लागेना. त्या दिवशी एकविसावा अध्याय चालू होता. शेवटल्या ओळी "भक्ताचे भावी संकट निवारण" असे वाचताच मला धीर आला, व आपले गाऱ्हाणे बाबांना सांगून श्रद्धा व सबूरीच्या दोरीवर मी आपला भार टाकला आणि खरोखरच साईचरित्रातील पोथीत सांगितल्याप्रमाणे माझ्या पूज्य बाबांनी मला सहारा दिला.

अशाच माझ्या दोन्ही मुलांच्या काळज्याही माझ्या पूज्य बाबांनीच दूर केल्या आहेत.

म्हणूनच बाबा म्हणतात, "का त्या संकल्प विकल्प लहरी शांत झाल्या का आता तरी । ठेवील निष्ठा धरील सबूरी । तयासी श्रीहरी रथील" हे लक्षात रहावे म्हणूनच आठ दिवसाचे गुरुवार मी बाबांचे वार (उपवास) करावयाचे ठरविले आहेत.

# असे शिरडीचे साईबाबा

—श्री. ग. रा. पालकर
२२३/२ दारुवाला चाळ, बझारवॉर्ड
कुर्ला, मुंबई ७०

● माझ्या थोरल्या बहिणीच्या मुलांच्या आग्रहास्तव शिरडीला जायचे नक्की झाले. बाबांविषयी तसे थोडेसे कर्णोपकर्णी ऐकले होते. पण दर्शनाची उत्कंठा मात्र लागली नव्हती. जेव्हा शिरडीला जायचे ठरले तेव्हा, केव्हा एकदा बाबांचे दर्शन घेतो, असे झाले होते.

अभिषेकाचे ताट घेऊन आम्ही सर्वजण सभामंडपात बसलो होतो. पुरोहिताचे मंत्र पठण चालू होते. माझे सर्व लक्ष बाबांच्या करुणामय मूर्तीकडे केन्द्रीत झाले होते. अंतःकरणाच्या गाभाऱ्यात भीतीयुक्त शब्द निनादत होते.

"बाबा ! या जगात आम्ही निराधार राहणार का ?"

भविष्यातल्या, त्या भयाण कल्पनेने मी पुन्हा एकदा थरारून गेलो. घर मालकाने आमच्यावर लादलेली केस त्यावेळी कोर्टात चालू होती, पागडी रुपात मिळणाऱ्या १५/२० हजार रुपयाच्या लालसेने त्याने आम्हाला त्याच्या कावेबाज जाळ्यात पकडून, समन्स बजावला होता. खोली खाली करण्यावाचून गत्यंतर नव्हते. वकिलाने हि (आमच्या) सांगितले की, "जोपर्यंत केस चालू आहे. तो पर्यंत तुम्हाला राहता येईल."

सारं जग भोवताली फिरतय असे त्यावेळी वाटले. घरात अधून-मधून प्रत्येक जण अश्रू गाळायचा कारण नव्या जागेसाठी लागणारी हजारो रुपयाची पूंजी आणायची कुठून ?

अभिषेकाच्या वेळी बाबांकडे लक्ष केन्द्रीत करुन मी मनातल्या मनात हे सारं काही आठवित होतो. विधी संपला. बाबांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी आम्ही उठलो. समाधी जवळ जाताच. अभिषेकाच्या ताटातील नुकत्याच खरेदी केलेल्या चांदीचे गंडे आणि अंगठ्या माझ्या नकळत, समाधीवर पडून, सर्वत्र विखुरल्या. भावपूर्वक समाधीचे दर्शन घेतले; गंडे अंगठ्या गोळा केल्या आणि बाबांच्या मूर्तीच्या मागील बाजूस गेलो. तेथे काहीजण भींतीला नाणे लावून कौल मागीत असलेली पाहिली. खिशातून दहा पैशाचे नाणे काढून भिंतीला लावले, आणि आश्चर्य म्हणजे काही वेळ ते ते नाणे भिंतीवर स्थिरावले होते.

शिरडीहून आल्यानंतर एका केसच्या तारखेला घर मालक आणि त्याचे वकील. स्वतःहून कोर्टात केसच्या वाटाघाटी बद्दल बोलू लागले. मला आश्चर्य वाटले क्षणार्धात बाबांची करुणामय मूर्ति डोळ्यांसमोर उभी राहिली. ३ वर्षेपर्यंत चाललेली केस घर मालकाने काढून घेतली. हे सर्व बाबांच्या प्रथम भावपूर्ण दर्शनाचे फळ. तेव्हा पासून, आम्हां साऱ्यांची बाबांवर नितांत श्रद्धा जडली आहे. या उघड्या जगात आमच्या अनाथांचा तोच एक नाथ, शिरडीचा साईनाथ !

★

# साईबाबांना साकडे

—श्रीनारायण उर्फ काशिदास पुरुषोत्तम मेथा
महाड जुनी पेठ

● माझी विवाहीत मुलगी आणि जावई एकदा सिनेमाला गेले होते. सिनेमा सुटल्यावर ती मंडळी घरी आली. मुलगी गळ्यात पहाते तर मंगळसूत्र तुटून त्यातील ४ ते ५ ग्रॅम वजनाचा सोन्याचा मणी हरवला होता. मुलगी दुःखी झाली. आम्ही घरातील सर्व माणसे उठलो. मी साईबाबांच्या फोटोला नमस्कार केला व तो मणी मिळावा असे साकडे घातले. माझा एक मुलगा ती विवाहीत मुलगी आणि जावई अशी तिघेजण पुन्हा रस्त्याने बॅटरीच्या उजेडात मणी शोधत जात होती. थोडे अंतर गेल्यावर काळ्या दगडात बॅटरीच्या उजेडात काही चमकले. त्यांनी जवळ जाऊन पाहिले तर तो हरवलेला मणी होता. माझी खात्री आहे की तो मणी श्रीसाईबाबांनी आम्हाला परत मिळऊन दिला.

❀

# पैसे टाकताच गाडी आली !

—श्री. गोविंद विश्वनाथ भडसावळे
मु. पो. कोळवण
ता. मुळशी जि. पुणे.

● लोणावळयास असलेल्या माझ्या मित्राची पत्नी रामनवमीस निर्वतल्याचे कळल्यावरून त्यांचे भेटी साठी मी, माझी पत्नी व माझे वाड्यातील दोन शिक्षिका व इतर ४ स्त्रिया असे सर्वजण रविवारी पौड-लोणावळा या गाडीने निघालो. सदर गाडी पौड मुक्कामाहून सकाळी ८ वा. सुटलेली दररोज तळेगावहून सायंकाळी ४ वा. सुटून लोणावळा करून परत येऊन कामशेत मार्गे काले कॉलीनी ते कोळवण-पौड मुक्काम व परत त्याच मार्गे सकाळी ८ वा. सुटून तळेगावला जाते.

लोणावळा येथे १०॥ वा. पोचल्यावर स्टँडवरून मित्राचे घरी जाताना स्टेशन-जवळ असलेल्या साईबाबांचे (झाडाखालील छोटेसे देऊळ) दर्शन घेतले व मित्राचे घरी गेलो.

सायंकाळी ५ वा गाडी परत जाणारी असल्याने वेळीच सर्वजण परत फिरलो व वाटेवील परत श्रीसाईबाबांचे दर्शन घेतले व पेटीत ५ पैसे टाकावेत असे मनात येताच मी खिशात हात घातला सुटे ५ पैसे नव्हते ४ आणे होते म्हणून मी पेटीत पैसे न टाकता सर्वांबरोबर एस. टी. स्टँडवर आलो. मनातून पैसे न टाकल्याची रुखरुख होती पण मी दुर्लक्ष केले. परंतु त्याचा परिणाम आम्हास चांगलाच भोवला.

स्टँडवर आल्यावर ५ ची गाडी ७ वाजले तरी पत्ता नाही. कंट्रोलरने ही गाडी तळेगावची असल्याने आम्हास काही सांगता येत नाही असे चौकशी करता खुलासा केला. फोन करण्यास भाग पाडल्यावर गाडी उशीरा सुटेल असा तळेगाव डेपोवरून खुलासा झाला. परंतु ९ वाजले तरी गाडीचा पत्ता नाही. आपण सर्व उपाशीपोटी गाडीची वाट पहात आहोत म्हणून गाडी येत नाही या माझ्या मनातील शंकांचे निरसन व्हावे म्हणून मी सर्वांना आपण हॉटेलात काहीतरी खाऊन घेऊ असे सुचविले पण सर्वांनी दुर्लक्ष केले.

आमच्या बरोबर असलेल्या दोन शिक्षिकांना मुलांच्या परिक्षा चालू असल्याने शाळेवर सकाळी ७॥ वा हजर होणे अत्यंत महत्वाचे होते, ज्यावेळी आम्ही स्टँडवर

आलो त्यावेळी गाडीसाठी असलेले २५/३० सिटस गाडी न आल्याने निघून गेले होते. राहीलो फक्त आम्ही व एक पौडचे गृहस्थ असे सातजणच. आमचे विनंती-वरून तळेगावला पुन्हा फोन करता, कळले की गाडी ८ वा. येथून सुटली. म्हणजे येथे ९ वाजेपर्यंत गाडी येणे आवश्यक होते. याचा अर्थ असा की गाडी लोणावळ्यास न येता परस्पर कामशेतवरून गेली. हे समजल्यावर सर्वांचे हातपाय गळाले. अशा परिस्थितीत मित्राकडे जाणेही योग्य नव्हते. या सर्व अडचणी सांगून येथून गाडी सोडा असे कंट्रोलरला विनवले. पण गाडी शिल्लक नाही असे सांगून आम्हास झट-कले. पुण्याकडून जायचे म्हटले तर पैसे नव्हते आणि त्याशिवाय दुसरा मार्ग नव्हता आमचे बरोबर राहिलेले पौडचे गृहस्थ ओळखीचे होते त्यांचेकडून उसने रु. ४० घेऊन पुण्यास जाण्यासाठी सर्वजण रात्री १२ वा. स्टेशनवर निघालो. स्टेशनजवळील श्री साईबाबांचे पुन्हा दर्शन घेतले व मघाची रुखरुख म्हणून हाताला येईल ते पैसे पेटीत टाकले व सर्वांबरोबर स्टेशनचा जीना चढून वर आलो तोच मागून एस. टी. स्टँडचे कंट्रोलर आमचेसमोर ड्रायव्हरसह हजर ! ते म्हणाले.

'आम्ही तुम्हालाच पहातो आहोत. तुमच्यासाठी पौडला गाडी सोडणार आहोत. म्हणून सर्व परत चला."

आम्ही सर्वांना फार आनंद झाला. मनात योजल्याप्रमाणे पेटीत पैसे न टाकल्याने श्रीसाईबाबांनी दाखविलेला हा खेळ मी पैसे टाकल्यावर पुरा केला. हे फक्त मलाच माहीत ! नंतर दोन दिवसानी ही गोष्ट मी पत्नीस सांगितली. नियंत्रका सारखा अधिकारी आमच्या ७ जणासाठी गाडी सोडावी म्हणून शोधत येतो हा चमत्कार नव्हे काय ?

रात्री ३ वा. घरी सुखरुप पोचलो. कंडक्टर यांना चहापाणी दिला.

आपण मनात बोललेले संकल्प श्रीसाईबाबा अशा तऱ्हेने पूर्ण करून घेतात.

# बसची तिकीटे योग्यच

— श्री. हेमंत सदाशिव हळवे
५३ आहेरेश्वर वाडी, मुकुंदनगर, पुणे ९

●

● काही वर्षापूर्वीची गोष्ट. मी शिर्डीला साईबाबांच्या दर्शनाला गेलो होतो. त्यापूर्वी व त्यानंतर बऱ्याचवेळा मी शिर्डी येथे गेलो. पण त्यावेळेला मला जो अनुभव आला तो सांगितल्याशिवाय राहवत नाही.

साईबाबांनी सांगून ठेवले आहे. " नित्य मी जीवंत जाणा हेचि सत्य नित्य घ्या प्रचित अनुभवे. ह्याचाच मला त्यावेळच्या प्रवासात अनुभव आला.

त्यावेळेस मी शिर्डीस दोन दिवस राहिलो. दर्शन, अभिषेक इ. कार्यक्रम झाल्यानंतर मी पुण्यास यावयास निघालो. त्यावेळेस शिर्डी–पुणे अशी थेट बस नसल्याने कंडक्टरच्या सांगण्यावरून श्रीरामपूरला गेलो. श्रीरामपूरला समोरच पूर्ण रिकामी असलेली बस थांबली होती. पुण्याला जाण्याची घाई असल्याने कंडक्टरला विचारून बसमध्ये बसलो.

बसमध्ये बसल्यानंतर सहज पाकिट पाहिले तर पाकिटात फक्त ४ रु. आणि १२ सुटे पैसे होते.

कंडक्टर आल्यानंतर, मनात भिती वाटायला लागली की जर तिकीट ४ रु. १२ पैशापेक्षा जास्त असेल तर कंडक्टर मधेच उतरावयास सांगणार. म्हणून सारखी बाबांची प्रार्थना करू लागलो " बाबा मला फक्त पुण्याच्या स्टेशनवर सोडा तेथून मी चालत घरी जाईन.

बस सुरू झाली आणि कंडक्टर माझ्याकडे आला मी त्याला पुण्याच्या तिकीटाचे पैसे विचारले आणि बाबांची कृपा म्हणून कंडक्टरने मला तिकीटाचे फक्त ४ रु. द्या असे सांगितले. तिकिट घेतले आणि एकदम मनातली भिती दूर गेली. योग्य वेळी बस पुण्याला पोहोचली आणि सुखरुपपणे मी घरी पोहोचलो, आणि घरी आल्याबरोबर साईबाबांना हात जोडून प्रार्थना केली. देवा तुझा कृपाहस्त असाच सदैव माझ्यावर व सर्व भक्तांवर राहू दे.

★

# स्मर्तुगामी श्रीसाईबाबा

★

ध्यानयोगिनी श्री उमानंद सरस्वती
अंधेरी,

● १९४७ चे साल असावे ते. स्वामी चिन्मयानंदांजवळ वेदान्ताचा ७ वर्षे अभ्यास करून झाला होता. वेदान्ताच्या अधिकारी गुरूजवळ 'श्रावण साधना' झाल्यानेही कुंडलीनी जागृत होऊ शकते. पण आज्ञा चक्रापर्यंतच तिचा प्रसाद होऊ शकतो. पुढे मात्र शक्तीपातकुशल असा गुरूदेव मुक्तानंदांसारखाच गुरू भेटावा लागतो. तेव्हा कुंडलीनी जागृतीचे तर अनुभव यायला लागले पण स्वामीजींचा तो विषय नसल्याने पुढचे मार्गदर्शन मिळेना. काय करावे, कोठे जावे तेही कळेना. गुरूदेव रानड्यांची पुस्तके वाचून येत असलेल्या अनुभवाविषयी शंका वाटत नव्हती. एक दिवस एका इंग्लीश सन्डे पेपरमध्ये साईबाबांविषयी लेख वाचण्यात आला. नुसते 'साई' म्हणून हाक मारली, त्यांचे स्मरण जरी केले तरी ते पावतात असे लेखिकेने निक्षून लिहिले होते. मनात आले, योगासाठी हा प्रयोग करून पहावा. साईबाबांचा फोटो मिळवला व पूजा, स्मरण सुरू केले. नंतर एकदिवस अम्मा नाईक नावाच्या माझ्या मैत्रीणीकडे सहज गेले असताना, त्यांच्या बैठकीच्या खोलीतील एका शोकेस मध्ये साईबाबांची छोटीशी मूर्ती बघितली. चैत्र गौरीपुढे मांडायच्या इतर चित्रातच ती ठेवली होती. मला राहवले नाही, त्या मूर्तीचे मला जबरदस्त आकर्षण पडले. मी आम्मांना म्हटले, "अम्मा, साईबाबांना असे का इतर चित्रात ठेवायचे ? मला तरी ही मूर्ती द्या, मी पूजा करीन, देव्हाऱ्यात ठेवीन." त्यांनी चटकन ती मूर्ती काढून मला दिली. माझा आनंद माझ्यातच मावेना. मी घरी येऊन तिची स्थापना केली, पूजा केली, व रोज त्यांच्या त्या अद्वैत चरणावर डोके ठेऊन व पाय चेपल्या खेरीज मी कधीही निजले नाही. असेच काही महिने गेले. दिवाळी जवळ आली होती. सकाळी मनात विचार आला. नोकरांना वाटणी द्यायची तर मिठाई आणता येईल पण खारे काय द्यावे, खारी डाळ वगैरे असे काही आणावे. त्याच दिवशी संध्याकाळची ६ ची वेळ असावी. दारावरची बेल वाजली. मी दार उघडले. समोर भगवी कफनी घातलेला, डोक्याला कपाळ झाकून भगवा कपडा बांधलेला, गौर वर्णाचा एक मनुष्य, पाठीवर बोचकी

घेतलेला असा मला म्हणतो, "खारी डाळ वगैरे काही हवे का?" मी सरळ 'नको' म्हणुन दार लावले मात्र, आणि मला काही तरी आठवले, उमगले. म्हणून पायात काही एक न घालता अक्षरशः बाहेर धावले. सर्वांना विचारले, सर्वत्र शोध घेतला. गुरख्यालाही खोदून खोदून विचारले. पण कोणीच 'त्याला' पाहिले नव्हते.पाच मिनिटात तो जाऊन जाऊन कोठे जाणार! मी अगदी रडकुंडीस आले. मला श्री साईबाबांनी, माझी तेवढी भक्ती, सेवा होताच दर्शन दिले पण मला ते कळले नाही. त्याच दिवाळीच्या सुट्टीत, पुण्याला दिलीप कुमार रॉय ह्यांच्या आश्रमात जाण्याचा योग आला. प्रवेशद्वाराजवळच साईबाबांची मूर्ती पाहून मी तेथे थबकलेली पाहून त्यांचा शिष्य सांगू लागला, "इथे अगदी ह्याच ठिकाणी साईबाबांनी दिलीपकुमारांना दर्शन दिले म्हणून आम्ही त्यांचा पुतळा येथे स्थापन केला. "माझ्या अनुभवाची सत्यता मला पटली. दुसरे दिवशीच शिरडीला १२ वाजताच्या आरतीच्यावेळी पोहचून व्यवस्थीत दर्शनही झाले. असेच साईबाबांना पुजणे, आळवणे, सुरू होते. व त्यांच्या कृपाप्रसादानेच, लवकरच, गणेशपुरीचे माझे सिद्धगुरू, स्वामी मुक्तानंद परमहंस भेटून कुंडलीनीच्या मार्गातील अडथळा दूर झाला, व सिद्धयोगाची दीक्षाही मिळाली. प. पू. मुक्तानंद बाबांच्या खोलीत भगवान नित्यानंदांच्या फोटोजवळच, श्रीसाईबाबांचाही फोटो पाहून माझी निष्ठा आणखीनच दृढ झाली. भगवान नित्यानंद श्री साईबाबांना भेटले होते. तसेच प. पू. मुक्तानंद बाबांनीही श्री साईबाबांच्या समाधीपाशी काही दिवस साधना केली होती. दत्तपरंपरेतील एक दुवा सापडला. गुरुचरित्र, श्रीस्वामीसमर्थ लीला, व साईलीला ह्या पोथ्यांमध्येही गुरुदत्तपरंतरा स्थापीत करणाऱ्या ओव्याही मिळाल्या. मग तर काय तिन्ही बाबांची पूजा करताना त्रिमूर्ती दत्तगुरुच्या भक्तीचे सुख लाभू लागले व अपार आनंदाची मी धनी झाले. एकनाथ महाराज, दत्ताच्या आरतीत म्हणतात, 'दत्तगुरु राहीला.' तसे श्री साईबाबा राहिले आहेत. ज्यांना अद्याप सिद्धगुरु भेटला नसेल, त्याला बरोबर त्याच्याकडे सुपूर्त करतील. श्री साई-बाबा, भगवान नित्यानंदबाबा प्रत्यक्ष नाहीत असे वाटायला नको. आपल्या भक्तीवर त्यांचे दर्शन अवलंबून आहे. ते स्मर्तृगामी आहेत. स्मरण करताच ते पावतात, हे नक्कीच. जणु गेल्या १२ वर्षातील त्यांच्या भक्तीचे फळ त्यांनी माझ्या पदरात टाकले व म्हणूनच त्यांच्या विषयींच्या मासिकात त्यांचे स्तवन करण्याची मला संधी मिळाली. श्री साईबाबांची कृपा झाली की सर्वच महापुरुषांची कृपा लाभते. अस्तु.

सद्गुरुनाथ महाराज की जय !

# भक्तवत्सल साईबाबा

—डॉ. श्री. दि. परचुरे
एम्. ए. पीएच. डी.
गजानन भुवन, मुंबई १६

● भक्तासाठी देवाला किती काळजी वाटते, भक्तासाठी देवाचा जीव किती तिळतिळ तुटतो, भक्ताच्या संकटकाळी देव कसा धावून येतो याची अनंत उदाहरणे पुराणात सापडतात. भक्त प्रल्हाद, ध्रुव, चिलया इत्यादिकांची उदाहरणे आपणास सहज सुचतील; परंतु अगदी पुराणातील वांगी पुराणातच ठेवली तरी अलीकडे भक्त दामाजीकरता "झाला महार पंढरीनाथ" हे उदाहरण तरी सर्वांनाच आठवेल. शिरडीचे श्री साईबाबा हे देखील असेच ईश्वरी अवतार असल्यामुळे त्यांनाही आपल्या अनन्य भक्तांची अशीच काळजी असते व त्यांचे मनोरथ पूर्ण करण्यासाठी ते असेच झटत असतात. ह्या संबंधातील एक अलीकडचा अनुभव येथे मी सांगणार आहे. त्यावरून साईबाबा किती भक्तवत्सल होते हे सर्वांना पटेल असे वाटते.

सव्वीस सप्टेंबर १९७७ ला मी नेहमीप्रमाणे माझी सकाळची आन्हिके आटपीत असता, माझे एक मित्र, नुकतेच दिवंगत झालेले, माहीम येथे रहाणारे रा. व्ही. बी. नंदवाणी ह्यांचेकडून व्हिक्टर आल्बी ह्या नावाचे एक साईभक्त माझे नावे एक चिठी घेऊन आले. त्यांना बसायला सांगून, त्यांच्या येण्याचे प्रयोजन काय असा प्रश्न मी त्यांना विचारला असता ते म्हणाले, "माझे नाव व्हिक्टर आल्बी. श्री. नंदवाणी माझे मित्र व हितचिंतक आहेत. मीही एक साईभक्त आहे. अलीकडेच मला साईबाबांचा असा हुकूम झाला की मी गुरुचरित्राचे एक पारायण करावे. साईसच्चरित मला माहीत आहे पण गुरुचरित्र काय आहे हे मला माहीत नव्हते, म्हणून मी तपास करू लागलो. तेव्हा मला प्रथम असे कळले की ती एक मराठी पोथी आहे! मी मूळचा केरळचा; परंतु कित्येक वर्षांपूर्वी केरळ सोडून मी चंदीगड येथे रहावयास गेलो. तशा मला बऱ्याच भारतीय भाषा कळतात; परंतु मी वाचू शकतो अशी भाषा केवळ इंग्रजीच. तेव्हा बाबांची आज्ञा कशी पाळावी हा मोठा प्रश्न माझेपुढे उभा राहिला. एवढ्यात मला कोणीतरी सांगितले की गुरुचरित्राचे इंग्रजीत भाषांतर अलीकडेच साईलीला मासिकात प्रसिद्ध झाले आहे. माझे मित्र श्री. नंदवाणी हे त्या मासिकाचे ग्राहक आहेत हे मला माहीत होते, तेव्हा त्यांचेकडून साईलीला मासिकाचे अंक आणून बाबांच्या आज्ञेची पूर्ती करावी असे मी ठरविले व त्यांचेकडे गेलो व त्यांना सर्व हकीकत सांगितली. त्यांनी माझी हकीकत ऐकून घेऊन आपल्याकडचे अंक शोधण्याचा प्रयत्न केला; पण त्यांचेकडे सर्व अंक मिळू

शकले नाहीत म्हणून त्यांनी मला आपलेकडे पाठविले आहे. तरी आपण मला ते अंक द्या म्हणजे मी बाबांच्या आज्ञेप्रमाणे गुरुचरित्राचे पारायण करतो."

व्हिक्टर आल्बीचे हे म्हणणे ऐकताच माझ्या डोळयात आनंदाश्रु उभे राहिले व आपल्या भक्तांचे मनोरथ पूर्ण करण्यासाठी श्री साईबाबा गुप्तपणे काय काय व्यवस्था करून ठेवीत असतात हे पाहून अचंबा वाटला व मनांतल्या मनात मी बाबांना नमस्कार केला. श्रीसाईलीला मासिकाची इंग्रजी आवृत्ती १९७४ पासून मालवणकर बंधूंच्या नायगाव क्रॉस रोड येथील मराठा प्रिंटिंग प्रेसमध्ये छापली जाते. सर्वसाधारण छापखान्याच्या प्रथेप्रमाणे मराठा प्रिंटिंग प्रेसमध्येही दर अंकाच्या एक-दोन प्रती ठेवलेल्या असतात. त्यामुळे कोठल्याही जुन्या अंकांतले काही पहावयाचे असल्यास ते अंक तेथे मिळत. शिवाय हे अंक एकत्र बांधून शिर्डी संस्थानच्या कार्यालयात त्यांच्या वार्षिक फायली ठेवलेल्या असतातच. त्यामुळे आपली स्वतंत्र फाईल असावी असा विचार माझ्या मनात कधीच आला नाही; परंतु ऑगस्ट १९७४ मध्ये मालवणकर मला म्हणाले की, "आमचेकडे बरेच अंक साठले आहेत. काही भक्त ते अंक मागत असतात. तेव्हा तुम्हाला त्यातले काही पाहिजे असल्यास घ्या. तुम्हाला ते नको असल्यास आम्ही अन्य भक्तांना देऊन टाकणार आहो." मालवणकरबंधूनी असे सांगितल्यावर आपले स्वतःचे असे स्वतंत्र अंक बांधून घ्यावे असे माझ्या मनात आले, आणि त्याप्रमाणे हा प्रसंग घडण्यापूर्वी नुकतेच काही दिवस १९७५ व १९७६ ह्या वर्षांचे अंक एकत्र बांधण्यासाठी मी मालवणकर बंधुकडे दिले होते.

पूर्वी सांगितल्याप्रमाणे श्री व्हिक्टर माझेकडे आले व त्यांनी १९७६ सालचे अंक माझेकडे मागितले आणि मला तात्काळ आठवले की मी ते अंक मालवणकरांकडे एकत्र बांधण्यासाठी नुकतेच दोनतीन दिवसांपूर्वीच दिले आहेत, आणि हीच भक्तांचे मनोरथ पूर्ण करण्याची श्रीसाईबाबांची गुप्त योजना. वस्तुतः श्री मालवण करांच्या छापखान्यात मी गेले तीन वर्षे सतत जात आहे. कारण मासिकाची प्रूफे मला तेथेच तपासावी लागतात; पण इतके असूनही हे अंक बांधून घेण्याची कल्पना मला गेली तीन वर्षे सुचली नाही ती आताच का सुचली ? श्री व्हिक्टर यांना बाबांनी आदेश दिला गुरुचरित्राचे पारायण करण्याचा व इकडे मला सूचना दिली अंक एकत्र करून ठेऊन देण्याची. कशासाठी ? तर श्री व्हिक्टर ह्यांना ते मिळावे म्हणून. आहे की नाही भक्तवत्सल बाबांची अजब योजना !

श्रीसाईबाबांची योजकता येथेच संपत नाही. साईलीला मासिकाचे अंक व्हिक्टर ह्यांना देण्यासाठी, त्यांना घेऊन मी लगेच मालवणकरांच्या छापखान्यात आलो. त्यावेळी सुमारे सव्वाअकरा वाजले होते. सबंध दिवसात होणारी प्रुफे तपासण्यासाठी साधारणपणे नेहमी संध्याकाळच्यावेळी मी प्रेसमध्ये जातो; पण त्यादिवशी (२६-९-७७) सकाळी मी अनपेक्षितपणे प्रेसमध्ये आलेला पाहून

रा. मालवणकर ह्यांनाही आश्चर्य वाटले. कारण आदल्याच दिवशी संध्याकाळी ( दि. २५-९-७७ ) ऑक्टोबर १९७७ च्या अंकाची शेवटची पाने मी तपासून दिली होती आणि नेहमी प्रमाणे मालवणकर ह्यांना म्हणालो होतो, " ऑक्टोबरच्या अंकाचे काम संपले. आता नोव्हेंबरच्या अंकाच्या कामाची सुरवात एक ऑक्टोबरला करू. तेव्हा मी आता एक तारखेलाच येईन. " असे माझे बोलणे झालेले असल्यामुळे मी आता एक तारखेलाच येणार अशी मालवणकरांची अपेक्षा. त्यामुळे त्यांना माझ्या अचानक येण्याचे आश्चर्य वाटणे सहाजिक होते, पण मी आल्यामुळे त्यांनी मात्र एक समाधानाचा सुस्कारा सोडला, कारण त्यांची एक काळजी दूर झाली. त्याच दिवशी सकाळी १०-४० च्या सुमारास साईनिकेतनमधून ( शिर्डी संस्थानचे मुंबई येथील कार्यालय ) त्यांना फोन आला होता त्या प्रमाणे साईभक्तांचे एक संमेलन दिनांक ९-१०-७७ ला व्हावयाचे होते व त्या संबंधीचे निवेदन ऑक्टोबरच्या अंकात घालावे असे त्यांना सांगण्यात आले होते. ते निवेदन कोठे घालता येईल हे त्यांनी ठरविले देखील होते; पण ह्या बाबांतील आचारसंहितेला अनुसरून मी कार्यकारी संपादक असल्यामुळे माझ्या माहितीशिवाय ते होऊ नये असे त्यांना वाटत होते. बरे, माझ्या घरी फोन नाही, तेव्हा हे मला कळवावे कसे ह्या विवंचनेत ते होते, पण साईभक्त मालवणकरांची ही काळजी दूर करण्यासाठी साईबाबांनी मला नेमके त्याचवेळी, व्हिक्टरच्या कामाचे निमित्त करून, मराठा प्रेसमध्ये पाठविले व मालवणकरांची काळजी दूर केली. माझ्या सूचनेप्रमाणे साई-भक्तांच्या संमेलनाचे निवेदन योग्य त्या ठिकाणी ऑक्टोबरच्या अंकात घालण्यात आले व सर्व साईभक्तांना ते योग्य वेळी मिळाले. व्हिक्टर ह्यांनाही जे अंक पाहिजे होते ते मी दिले व त्यांचे काम पूर्ण झाले. त्याचप्रमाणे मालवणकरांच्या छापखान्या-तूनच शिर्डी ऑफीसला फोन करून त्यांना पाहिजे असलेले निवेदन ऑक्टोबरच्या अंकात छापण्याची व्यवस्था करण्यात आली असल्याचे कळविले.

वरील सर्व प्रसंग जसे घडले तसे मी निवेदन केले आहेत. हे सर्व प्रसंग केवळ योगायोगाने घडले असे म्हणता येईल का ? हे सर्व प्रसंग कोणत्या तरी दैवी शक्तीने नियोजन पूर्वक घडवून आणले असेच मला तर राहून राहून वाटल्याशिवाय रहात नाही. माझ्या रिकामपणच्या वेळी जेव्हा मी वरील सर्व प्रसंग आठवतो तेव्हा माझ्या मनासमोर पुढील प्रश्न उभे रहातात.

१) मालवणकरांच्या प्रेसमध्ये गेली तीन वर्षे मी जात असूनही १९७५ सालचे अंक एकत्र करण्याची बुद्धि मला ह्या प्रसंगापूर्वी तीन चार दिवसांपूर्वीच का झाली ? कोणाला तरी ते अंक पाहिजे होते म्हणून ?

२) श्री व्हिक्टर हे कै. नंदवाणी ह्यांचेकडे दिनांक २६–९–७७ लाच नेमके का गेले ?

३) श्री व्हिक्टर लगेच त्याच दिवशी माझ्याकडे का आले ? त्यांच्याबरोबर मी प्रेसमध्ये तात्काळ का गेलो ? श्री व्हिक्टर ह्यांचे काम मी दुसऱ्या दिवसावर टकलू शकलो नसतो का ? मला प्रेसमध्ये जाण्याची बुद्धि तात्काळ झाली ह्याचे कारण माझ्या तेथील उपस्थितीची आवश्यकता होती हेच काय ?

वरील सर्व प्रश्नांचा विचार केल्यावर जे उत्तर मिळते ते एकच की आपल्या भक्तांचे मनोरथ पूर्ण करण्यासाठी श्री साईबाबा सर्व गोष्टींचे नियोजन गुप्तपणे, आपल्याला कळू न देता, करीत असतात. श्रीसाईबाबांना मी भक्तवत्सल म्हटले आहे ते ह्याकरिताच श्री व्हिक्टर, मालवणकरबंधु व साईभक्तांचे संमेलन ठरविणारे लोक या सर्वांचे हेतु जाणून श्रीसाईबाबांनी वरील लीला घडविल्या तेव्हा आपल्या भक्तांची ह्याप्रमाणे सर्वप्रकारे काळजी घेणाऱ्या बाबांचे आपण सतत ध्यान करून त्यांना मनोमन नमस्कार करून धन्यवाद देऊ या.

---

# बाबांची भेट झाली

—सौ. राही प. लिमये
सांगली

● जो जो मज भजे जैशा जैशा भावे तैसा तैसा पावे मी ही त्यासी.

बाबांची ही वाणी अगदी सत्य आहे. त्यावेळेला मला चौथा महिना होता. कडक डोहाळे लागले होते पण माझी तीव्र, इच्छा होती की दिवस गेल्यावर शिर्डीला जायचे. आम्ही ज्या दिवशी जाणार होतो त्या दिवशीची तिकीटे काढायला माझा भाऊ गेला होता. पण तेव्हा त्याला, तिकीटे मिळाली नाहीत पण माझ्या वडीलांनी परत जाउन एक प्रयत्न कर असे सांगीतले तेव्हा तो परत व्ही. टी. ला गेला. खिडकी बंद व्हायची वेळ झाली होती. आणि आश्चर्य म्हणजे तीनच तिकीटे होती तो म्हणाला वेळ संपलीय पण तुम्हाला म्हणून तिकीटे देतो. अशा तऱ्हेने साईबाबांनी आमची इच्छा पूर्ण केली. येताना मी एस, टी, ने सहा तासाचा प्रवास केला पण मला अजिबात त्रास झाला नाही ही पण बाबांचीच कृपा.

बाबांचे एक भक्त श्री. नानासाहेब चांदोरकर यांची कन्या बाळंतपणात अड-

कली होती तेव्हा बाबांनी एका माणसाजवळ उदी पाठवली आणि त्या उदीचे तीर्थ घेताच तिची सुटका झाली. मला देखील चार महिन्यापूर्वी हाच अनुभव आला. मी खुप घाबरले होते. पावणेदहाला लेबर रूममध्ये गेले. साडेअकरा वाजता माझ्या वडलांच्या लक्षात आलं आणि त्यांनी साईबाबांचा फोटो लेबर रूममध्ये आणून ठेवला. मी एकदाच त्या फोटोकडे बघीतलं आणि थोड्याच वेळात माझी सुटका झाली आणि साईबाबांच्या आशीर्वादाने मला सुंदर बेबी झाली, आणि अजूनही माझी बेबी रडायला लागली किंवा तिचं पोट वगैरे दुखायला लागलं की मी बाबांची प्रार्थना करते आणि तिला उदी लावते थोड्याच वेळात तिला बरे वाटते.

अशीच साईबाबांची आमच्या कुटुंबावर कृपा राहू दे हीच प्रार्थना.

# साई-भक्तिचे अंकुर

—कु. रेखा कुळकर्णी एम.ए.
बोकारो स्टील सिटी.
जि. धनबाद ( बिहार )

ही गोष्ट जवळ जवळ तीस वर्षापूर्वीची आहे आणि आज इतके वर्ष झाल्यावर सुद्धा माझा दादा वारंवार सांगतो, त्याचे कारण एकच की ह्या घटनेपासून आमच्या घरात साई भक्तिचा शुभारंभ झाला आहे.

माझी आई लहानपणापासून धार्मिक वातावरणात वाढलेली त्यामुळे कोणत्याही साधू संतावर तिचा विश्वास असायचा. मग ते हिन्दु असो की मुसल्मान. साधू संताना जाती नसते, असे तिचे मत होते. पण वडील पुजा इ. करीत असून सुद्धा साधू संतां विषयी संशयी होते. त्याहून उदी अंगारा या वस्तुनां नुसती राख मानायचे. एकदा त्यांच्या पायावर लहानसा फोड झाला. त्यांनी लक्ष दिले नाही. काही दिवसांनी त्या फोडांजवळ आणखी पुरळ उठू लागले. इतके दिवस स्वस्थ बसणारे आमचे वडील डॉक्टरजवळ गेले. डॉक्टरांनी त्यांना नीट तपासून ते पुरळ म्हणजे एक्झीमा आहे असा निर्णय दिला. त्या प्रमाणे औषधेही सुरू केली आठ दिवसात तो एक्झिमा बरा होण्याऐवजी वाढत चालला. आता रेल्वे हॉस्पीटलचे सी. एम. ओ. कडे केस गेली. त्यांचे औषध सुरू झाले पण काही केल्या बरे वाटले नाही. तो एक्झिमा वाढता वाढता गुडघ्यापर्यंत आला. त्यातून सारखे पाणी निघायचे पाय रात्रंदिवस ठणकत

होता. वडिलांना रात्री झोप नाही, काही चैन पडत नव्हते शेवटी डॉक्टरांनी मुम्बईला जाण्याचा सल्ला दिला. हे सांगून आता हे प्रकरण बरेच सीरियस झाले आहे आणि केस माझ्या आटोक्यातून बाहेर गेली आहे.

डॉक्टरांचे हे बोल ऐकून घरची सर्व मंडली हताश झाली. माझा दादा, देखील हिरमुसला तसाच तो मास्तरांना सांगायला गेला की मी उद्यापासून शिकण्यासाठी येणार नाही. मास्तर आमच्या घरात आलेल्या आजारापासून अनभिज्ञ होते. त्यांनी सर्व हकीगत दादाला विचारली. त्याने सांगितल्यावर मास्तर उठून देवघरात गेले आणि एक उदीची पुडी दादाच्या हातावर ठेवीत म्हणाले "ही उदी साईबाबांचे नाव घेवून तुझ्या वडिलांच्या पायाला लाव थोडी पाण्यातून प्याय-लाही दे. बाबांना प्रार्थनाकर की माझे वडिल बरे झाल्यावर तुमच्या पुजेसाठी ५ रु. मनिआर्डर करतील व शिरडी दर्शनाला येतील. त्यानी सांगितल्याप्रमाणे दादानी ती उदीची पुडी आईला आणून दिली आणि मास्तरांनी सांगितलेला निरोप सांगितला.

माझे वडील दोघांचे संभाषण पडून ऐकत होते. पायाच्या आजारामुळे आणि डॉक्टरांच्या अयशस्वी उपचारांमुळे त्रासून गेले होते. चिडून म्हणाले, "हो आता पर्यंत एवढे मोठे डॉक्टर पायाला बरे करू शकले नाही. म्हणे त्या साधूच्या राखेनी बरा होईल. मला नको ती राख. ठेव तिथेच." आईने शांतपणे त्यांना समजाव-ण्याचा प्रयत्न केला. पण व्यर्थ, त्यांच्या हट्टापुढे तिचे काही चालले नाही ती गप्प राहिली. पण मनोमन विचार करीत होती. सारखे कण्हत रहाणाऱ्या वडिलांना काही वेळाने झोप आली. आईने हळूच त्यांच्या पायाला बाबांची उदी लावली, आणि काय आश्चर्य ! आई देवाजवळ बसून बाबांपासून करुणा भाकतच होती तोच वडि-लांनी तिला बोलावून चादर बदलण्यास सांगितले. जखमेतून बरेच पाणी वाहू लागले होते व वडिलांच्या पायाखालची चादर भिजून गेली होती. पाणी वाहिल्या-मुळे वडिलांच्या वेदना कमी झाल्या व त्यांना पुन्हा झोप लागली. तसेच आईने पुन्हा बाबांची उदी लावली. सकाळपर्यंत आई वडिलांच्या पायथ्याशी बसून थोड्या-वेळाच्या अंतराने पाणी टिपत होती. सकाळी वडील उठून बसले आणि स्वतःच्या पायाकडे आश्चर्याने पाहू लागले. जखमेतून अर्ध्याहून अधिक पाणी वाहून गेले होते. त्यांनी आईला विचारले की, तू काय लावलेस. तिने सांगितले तुम्ही नाही म्हणालाना त्याच साधूची राख ! वडिलांना माहीत नाही, काय वाटले. त्यांनी उदीची पुडी मागवून स्वतःच्या कपाळी उदी लावली व थोडीशी खाल्ली. तीन दिवस हा क्रम होता. तिसऱ्या दिवशी जखमेतील पूर्ण पाणी निघून ती वाळायला सुरुवात झाली आणि आठव्या दिवशी तर जखम पूर्णपणे बरी होवून गेली. फक्त डाग राहिला, त्या प्रचितीची आठवण म्हणून वडील डॉक्टरला भेटायला गेले.

त्यांनी पाय पाहून आश्चर्य व्यक्त केले. अं ! इतक्या लवकर ? कसे शक्य आहे ? कोणता डॉक्टर होता ? काय औषध दिले ? असे कितीतरी प्रश्न त्यांनी एकदम विचारले. वडील हसत हसत उत्तरले, डॉक्टर म्हणजे एक साधु साईबाबा आणि औषध राख नव्हे उदी. डॉक्टांना विश्वास पटत नव्हता पण प्रत्यक्ष प्रमाण ठणठणीत बरा झालेला पाय.

असे म्हणतात की एक्झीमा पूर्णपणे कधीही बरा होत नाही. पण बाबांचे औषध लागल्यावर तो कधीही पुन्हा झाला नाही. आजपण माझ्या वडिलांचा पायावर काळा डाग आहे. त्यांचाकडे पाहताच तो न पाहिलेला प्रसंग माझ्या डोळ्या पुढे उभा राहतो. ज्यांनी आमच्या कुटुंबामध्ये साईभक्ति पेरून दिली. आज त्याच सावलीमधे आम्ही विसावा घेत आहोत. जीवन संघर्षांचे डाव सहजतेने झेलतो आहोत. बाबांचा कृपाळू, मायाळू हात सदा माझ्या पाठीवर राहो, हीच साई चरणी प्रार्थना.

# 'दान दे, सौभाग्याचे मला'

—सौ. शशीकला रेवणकर
कुंटोली, अंबरनाथ

● अन् खरोखरच त्या दिवशी बाबांनी मला सौभाग्याचे दान दिले, आणि माझ्या पतीचे कृतांताच्या दाढेतून ओढून रक्षण केले. ती आठवण झाली की अजुनही अंगावर शहारे येतात. अन् बाबांना असे सांगावे वाटते की, बाबा माझीच ही घेतलेली भयंकर कसोटी परीक्षा बस्स् झाली. पण दुसरा कोणीही वैरी, अनंत पापी अथवा भक्त असला तरी त्याची मात्र अशी परीक्षा घेवू नका. कारण माझ्या हृदयात तुमची 'श्रद्धा व सबुरी' हेच शब्द एवढे फिक्स बसलेत की कोणतेही काळाचे क्रूर शस्त्र त्याना माझ्या पासून दूर लोटू शकणार नाही. म्हणूनच तर मी आजपर्यंत अनंत यातना सहन करत आले. स्वतः अत्यंत कष्टी, दुःखी असून इतरांचे दुःखात, त्रासात सहभागी होऊन त्यांना हसवत आले. माझ्या हृदयात व मुखात साईनामा-शिवाय काही येतच नाही. अनेकवेळा मी दुःखाने हैराण होऊन सबूरी पासून दूर

बावू लागते. पण बाबांचे मुखकमल व वरद्हस्त पाहीला की परत सबुरीजवळ येते. व बाबाच माझ्या मनात पुढील मार्ग दाखवून धैर्य निर्माण करतात. व त्या संकटातून मुक्त झाले की मला बाबांच्या प्रेमाने एवढे गहीवरून येते की मला रडणेही मुश्किल होते.

वर्ष-दीडवर्षभर अनेक प्रकारच्या संकटाना तोंड देत हैराण होऊन आम्ही उभयता दोघे शेवटी अंबरनाथ येथे माझ्या मावशीकडे राहण्यासाठी म्हणून आलेलो. येऊन ८–१५ दिवस झाले, मी रात्रीची सहज स्वयंपाक घरात पुरुष मंडळी जेवतात म्हणून जरा बाहेर मोकळी जागा आहे तिकडे बाथरूमला म्हणून नेले. जातेय तोपर्यंत काय माहीत नाही पण काहीतरी भयानक आकृती माझ्या अंगावर धावून आली. अन् मी जोरात 'साई' म्हणून ओरडले व मागे पळाले. माझ्या ओरडण्याने जेवणारी मंडळी बाहेर आली, पण त्यांना तेथे कुत्र्याव्यतिरिक्त काहीच दिसले नाही. मी थोड्या वेळाने भानावर आले पण मला काहीच आठवत नव्हते. त्यानंतर दुसऱ्या दिवशी अमावास्येचा दिवस होता आम्ही पतिपत्नीव्यतिरिक्त घरात कोणीच नव्हते. सायंकाळी ७ ची वेळ होती मी स्वयंपाक करत होते. बाजूलाच खिडकी होती. बाहेर काळाकुट्ट अंधार होता. माझ्या मनात का कोण जाणे अचानक भितीने ग्रासले. अन् मी अचानक बाजूला खिडकीत पाहिले तो एक काळी आकृती खिडकीतून हळुहळू वर येत होती. मी पहातच राहीले, ती खुप वर आल्यानंतर 'साई' म्हणून मोठ्याने ओरडून शेजारीच देवाजवळ बाजूला माझे मिस्टर झोपले होते, त्यांच्या अंगावर कोसळले. कितीतरी वेळाने मी भानावर आले. हे मला विचारत होते काय झाले पण माझ्या तोंडातून शब्दच निघेना मी फक्त हाताने खिडकीकडे खुणावत होते. नंतर थोड्या वेळाने उदी वगैरे लावून व्यवस्थित झाल्यावर मी सर्व सांगितले. हे सर्व माझ्यावर झाले. पण मला बाबांच्या कृपेने नंतरही त्याचा कांहीच परीणाम झाला नाही.

तिसऱ्या दिवशी गुरुवार होता नित्याप्रमाणे मी सायंकाळी बाबांची आरती भजन वगैरे केले व नेहमी प्रमाणे आम्ही १० वाजता झोपलो. मला अर्धवट झोप लागलेली. माझी मावशी अजून जागीच होती, पावणे अकरा वाजलेले अन हे झोपेत आई आई म्हणून कण्हत होते, ५-१० मिनिटे त्यांचे कण्हणे मावशीने ऐकले. मी ही अर्धवट झोपेत ऐकत होते पण असेल एकाद्या स्वप्नात म्हणून मी गप्पच, नंतर माझ्या मावशीने उठून त्यांना जागे करण्याचा प्रयत्न केला. त्या आवाजाने मी उठून त्यांना जागे करू लागले. पण व्यर्थ त्यांचा आवाजही बंद झाला. व इतर कांही हालचालही होईना नंतर आम्ही थोडेसे घाबरलो झोपेतून जागे व्हावे म्हणून अंगावर यथगार पाणी शिंपून पाहिले तरी जागे झाले नाहीत. नंतर मी बाबांची उदी लावली

व तोंडात तीर्थ घालू लागले. पण व्यर्थच पाणी सुद्धा जाईना. अंग सगळे एकदम ताठलेले, छातीची धडधड नाही, डोळे बंद, मानही आडवी पडलेली. सर्व काही प्रेतासारखेच निचेष्ट पडलेले, पुष्कळ लोक जमलेले कोण काही करत होते. अशात अर्धा पाऊण तास गेला. मी मोठ्याने साई साई म्हणून रडत होते. अन् थोड्या वेळाने मी माझ्या बॅगेतील बाबांचा मोठा आशिर्वादाचा फोटो काढून ह्यांच्या उशाजवळ ठेवला, व बाबांना मनातून सांगितले—बाबा आता मला हे सौभाग्याचे दान देणे फक्त तुम्हालाच शक्य आहे. आता पर्यंत मी सर्व काही तुमच्या मुळेच सहन करत आले आहे. अजून मी सबुरी पाहीली पण आता ह्यामध्ये मात्र मला सबुरीची वाट पहाता येत नाही, जर तुम्हाला ह्यांना न्यायचेच आहे तर मलाही न्या. अन् जर तसं झालंच तर तुमच्याच नावाला बट्टा लागेल. कारण ह्यापूर्वी एवढं काही झालं तरी तुमची वेडी भक्ती सोडत नाही. अशी पुष्कळ नास्तीकांनी माझी चेष्टा केली. पण मी ऐकले नाही. ते सर्व अजून तिखट मिठाने ह्या घटनेची वाखाणणी करतील. तरी तुम्हीच सर्व काही ठरवा अन् तुमचा महीमा तुम्हीच वदवा. 'असे बोलून मी ह्यांच्या छातीवर बाबांची उदी चोळू लागले, तेवढ्यात माझ्या मावशीला काय वाटले कोण जाणे. तीही देवभक्तच आहे. तिने बराच लसुण तोंडात चावला व ह्यांच्या नाकात जोराने फुंकर मारली. त्यासरशी ते एकदम उठून बसले व बडबडत होते. तो बघा काळा धिप्पाड माणूस मला ओढून नेतो आहे. त्याने आत्ताच मला तिकडे खूप दूर गेल्यावर मोठ्याने ओरडून सोडून दिले व तो धाऊन गेला. तेथून मला सफेत दाढीवाल्या माणसाने इकडे आणुन सोडले. असे सांगत होते. ते सर्व ऐकून माझे अंतःकरण भरून आले. बाबांच्या चेहऱ्याकडे पाहून डोळ्यांतून प्रेमाश्रूच्या धारा वाहू लागल्या. सर्वांना खूप आनंद झाला व आश्चर्यही वाटले. पण माझा आनंद तो काय मलाच माहीत, जणू जग जिंकल्याचा, तो आनंद व्यक्त करण्यास मजजवळ शब्दच नाहीत. अन् खरेच बाबांच्या लीलांचे वर्णन करण्यात असमर्थ आहे.

# भक्तांच्या पाठीशी श्रीसाईनाथ महाराज

—सूर्यकांत मा. गर्जे
८०, शिवाजीनगर, पुणे ५

☆

● ता. १० ऑगस्ट ७६ चा दिवस. जमिनीच्या कामाबाबत जुन्नर येथील मामलेदार कचेरीत उपस्थित रहाण्याबद्दल मला पत्र आले होते. ऑफिसला एक दिवसाची रजा टाकली. सर्व आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची जुळवाजुळवी केली व शिवाजीनगरचे एस. टी. स्टँड गाठले. सकाळचे अकरा वाजले होते. त्यावेळी थेट जुन्नरची गाडी प्लॅटफॉर्मवर नव्हती म्हणून नाशिकच्या गाडीत बसून नारायणगावला उतरलो. त्यावेळी दुपारचे दोन वाजले होते. नारायणगावाहून जुन्नरला जाणारी एकही एस. टी. बस प्लॅटफॉर्मवर नव्हती. सुमारे एक तास गाडीची वाट पहात बसलो परंतु गाडी येण्याचे काही चिन्ह दिसेना. उलट पावसामुळे जुन्नरला जाणाऱ्या गाड्यांना विलंब लागण्याची शक्यता तेथील व्यवस्थापकांनी सांगितली. काय करावे काही सुचेना. एक-दीड तासांनी तर जुन्नरची मामलेदार कचेरी बंद होणार आणि मी तर अद्याप जुन्नरला पोहोचलोहि नव्हतो. वेळ थोडा होता. गाडी दिसत नव्हती आणि वेळेवर पोहोचणे तर नितांत आवश्यक होते. मी तर पूर्ण हतबद्ध झालो. प्रसंग छोटा परंतु मनाला टोचणी लागून राहिली.

मी एकटा असलो की, मनातले मनात श्री बाबांचे नामस्मरण चालू असते. ती एक सवयच होऊन बसली आहे. आता सुद्धा एस. टी. स्टँडच्या आवारात विचार मग्न स्थितीत येर-झारा मारीत असताना मनोमन श्री बाबांचे नामस्मरण चालू होते. अचानक कोण जाणे कशी माझी पावले एस. टी. स्टँडच्या बाहेर पडली. जुन्नरला जाणारी एखादी टॅक्सी किंवा लॉरी वगैरे मिळते का म्हणून मी रस्त्यावर इकडे-तिकडे पाहू लागलो. जवळच एक माल ट्रक उभी होती. तिच्याकडे माझे लक्ष वेधले गेले ते दुसऱ्याच कारणामुळे. ट्रकच्या दर्शनी भागावर 'पब्लिक कॅरियर' म्हणून एक बोर्ड होता आणि मधोमध श्री बाबांची एक रंगीत प्रतिमा होती. नकळत माझे मस्तक नत झाले. सर्व साक्षी सर्वाभूती वास करणाऱ्या श्री बाबांना मी सांगणार तरी

काय आणि तेवढी अवधी तरी बाबांनी मला कुठे दिली. मोटारीचा हॉर्न वाजला म्हणून मी मागे वळून पाहिले. मालाने खच्चून भरलेली एक लॉरी माझ्या अगदी जवळ येवून उभी राहिली. आतमध्ये ड्रायव्हर आणि क्लिनर असे दोघेच बसलेले होते. सहजच मी ड्रायव्हरला विचारले—

"गाडी कुठे जाणार ?"

"जुन्नरला." ड्रायव्हरने शांतपणे उत्तर दिले.

"मी बसू का ?" मी मोठ्या आतुरतेने विचारले.

"हो, चला ना !" ड्रायव्हरच्या बोलण्यात आपुलकी दिसली.

क्लिनरने दरवाजा उघडला. मी पटकन ड्रायव्हर शेजारी बसलो. गाडी चालू झाली. जुन्नरच्या दिशेने ती वेगात धावू लागली. माझ्यासाठी श्री बाबांनी लॉरी पाठविली या भावनेने माझे मन भरून आले डोळे पाणावले. मी थरथरत्या नजरेने गाडी न्याहाळू लागलो आणि मला आश्चर्याचा धक्काच बसला. माझ्या सीटच्या मागे श्री बाबांचा एक फोटो लावलेला होता. श्री बाबांच्या डोळ्यात मिस्किल हास्य चमकत होते आणि माझ्या डोळ्यांतून आनंदाश्रु ओघळत होते.

माझी सर्व कामे सुरळीत पार पडली आणि त्याच दिवशी अगदी सुखेनैन मी पुण्याला परतलो सुद्धा. नारायणगावाला मी एस. टी. बसमध्ये बसलो ती होती "शिरडी पुणे" एस. टी.

भक्तांच्या हाकेला धावून येणाऱ्या श्री बाबांना देवाधिदेव उगीच नाही म्हटले आहे.

# बाबांची शक्ती महान आहे

—सौ. सिंधू कृष्णराव सणस
काटोल जि. नागपूर

" अमृत घट भरले तुझ्या घरी
कां वणवण फिरशी असा बाजारी "

● तसेच बाबांचे सान्निध्य मिळाल्यावर वणवण फिरण्याची गरजच नाही. असे माझे तरी मत आहे. माझे सारे जीवनच बाबांच्या स्वानुभवाने ओथंबलेले आहे. माझी मुले, माझे पती व मी नेहमीच बाबांच्या उदीने कुठल्याही दुखण्यातून मुक्त होतो. माझे कोणतेही कार्य त्यांचा निर्णय घेऊनच करते.

माझे गाव एक लहानसे खेडे आहे. तीस चाळीस घरांची वस्ती असेल, गाव लहानसे असल्यामुळे इलेक्ट्रीक नाही. माझे सासरे पाटील या नावाने ओळखले जात. ते वारल्यामुळे तो वारसा हक्क माझ्या पतींना मिळाला. आपल्या गावात इलेक्ट्रीक यावी ही माझ्या पतींची फार इच्छा होती. त्यांनी इलेक्ट्रीक पैंपाकरिता ८०० रु. भरले. पुन्हा दिड हजार रुपये भरावयाचे होते. ही रक्कम दोन इसमाना भरावयाची होती. परंतु तीन वर्षापर्यंत कुणीच भरली नाही. माझे पती इलेक्ट्रीक ऑफिसमध्ये सारखी ये जा करीत. परंतु यश मात्र मिळाले नाही. शेवटी ही कामगिरी बाबांवर सोपविली.

सन १९७७ मध्ये हा प्रसंग घडला. इलेक्ट्रीक इंजिनियरकडे दोन सभ्य गृहस्थ आले व म्हणाले आम्ही सणस पाटलांच्या मांगलीचे आहोत. दीड हजार रुपये भरलेले आहेत. पावत्या उद्या आणून देऊ. असे म्हणून निघून गेले. त्यांनी ऐकल्यानंतर दुसरे दिवशी त्यांची मिटींग होती. मिटींगमध्ये इलेक्ट्रीक द्यायची हा ठराव मंजूर होऊन २५००० रुपये मंजूर झाले. दुसरे दिवशी इ. पोल. वायर, सीमेंट, पेन्ट आणि मजूर गावात जाऊन पोचले. कामाला सुरवात झाली, पोल, उभारण्यात आले. माझे पती गावाला गेले तेव्हा त्यांना आश्चर्य वाटले. आपल्या गावातील व्यक्तींनी पैसे भरले असावेत. परंतु पैसे कोणत्याही व्यक्तीने भरलेले नव्हते. ते पुन्हा

इलेक्ट्रीक ऑफिसमध्ये जाऊन साहेबांची भेट घेतली. त्यांचे अभिनंदन केले. हे सर्व श्रेय तुमचेच, धन्यवाद असे म्हणताच साहेब म्हणाले काहो तुमच्या गावचे दोन गृहस्थ येऊन म्हणाले, आम्ही पैसे भरले आहेत. उद्या पावत्या आणून देतो. असे म्हणून निघून गेले. तेव्हापासून त्यांचा पत्ता नाही. माझ्या नोकरीला वीस वर्षे झाली आहेत. असा प्रसंग आतापर्यंत घडला नाही. आता काय होईल असे वाटू लागले. माझे पती म्हणाले, तुम्ही घाबरू नका. मी पुन्हा पैसे भरतो. तुम्हाला फसवणार नाही. हा माझ्या साईचा प्रसाद आहे.

बाबांची शक्ती महान आहे. माझे साई चरणी नम्र प्रणाम. "ऐशा योगीयांचे वंदु या चरण, होऊ या पावन स्मरूनिया त्यासी."

# माझे साईबाबा

—श्री. रा. व. बारशी
७३/६ काटोल, जि. नागपूर

● माहे एप्रिल ७९ मधील माझा अनुभव—मला पुतणीच्या लग्नजुळवणी संबंधाने उमरेडला जाऊन त्याच दिवशी परत यावयाचे होते. त्याप्रमाणे मी नागपूरला एस. टी. बसमधे बसलो व बस उमरेडला जाण्यास निघाली. उमरेड येण्यापूर्वी ५–६ मैल अगोदर बस बंद पडली. डिझेल टाकीतून डिझेल वाहू लागले. थोडी दुरुस्ती करून बस चालू करण्याचा प्रयत्न केला. २–३ वेळा प्रवाशांनी बस काहीदूर ढकलून नेली परंतु बस सुरू होईना. शेवटी दुसऱ्या बसने प्रवाशी पाठवावे असे ड्रायव्हरने सांगितले. मी ड्रायव्हरला म्हटले पुढील उतारावर गाडी नेल्यास गाडी सुरू होण्याची शक्यता आहे. एकदा प्रयत्न करून पाहू त्याप्रमाणे सर्व प्रवाशी गाडी ढकलू लागले व ड्रायव्हर गाडी सांभाळू लागला. मी श्रीसाईबाबांचे मनात स्मरण केले व आर्त हाक देऊन बसला ढकलू लागलो १० ते १५ फूट बस गेल्यावर एकदम बस सुरू झाली व सर्व प्रवाशाना घेऊन उमरेडला पोहचली. योग्यवेळी पोहचल्यामुळे माझ्या पुतणीच्या लग्न जुळवणीचे कामसुद्धा व्यवस्थित झाले, व परत त्याच दिवशी मला माझे गावी सुखरुप परतता आले. मला ज्या-ज्या वेळी अडचण आली त्या त्यावेळी श्रीबाबांच्या कृपेने ती पूर्ण झालेली आहे, व पुढेही श्रीबाबाच माझे पाठी राखण आहेत ही माझी खात्री आहे.

# बाबांचा आशिर्वाद

—श्री. अनिल केशवराव रसाळ
२१/३८२, बी. पी. टी. स्टाफ क्वॉर्टर्स,
रेनॉल्डस् रोड वडाळा ( पूर्व ) मुंबई ३७

● सोमवार दिनांक २१.१.१९८० श्री गणेश जयंतीचा शुभदिन ! नित्यपूजा करून कार्यालयात जाण्यास निघालो असता " आतल्या आवाजाने " मला आग्रह पूर्वक दोन वेळा सांगितले की, आज तू सोबत " ज्ञानेश्वरी " घे त्याप्रमाणे मी पोथी घेतली. व नित्याच्या रस्त्याने सकाळी १० वाजता शिवडी स्टेशनकडे निघालो बर्मा शेलच्या टाक्या जेथे आहेत, तेथे मी व माझ्या कॉलनीतील एक स्नेही असे जात असता समोरून हातात एक कमंडलू घेतलेला व गळयात मोठा अजगर अडकवलेला लुंगी नेसलेला माणूस माझ्या व मित्राच्या समोर आला. त्याने मला थांबवले व मला तुझ्याकडून पैसे पाहिजेत असे म्हणू लागला. मी थांबलो मनात विचार आला मुंबईत अनेक धंदे चालतात त्यातीलच हा एक धंदा करणारा इसम असावा म्हणून मी विचारात पडलो दरम्यान माझा स्नेही गाडी पकडण्याच्या धांदलीत पुढे निघून गेला. तेव्हा त्या इसमाने मला सांगितले की, " आज आप नहीं बोलना नहीं, " मी खिशात हात घातला १ रुपयाचे नाणे दिले तरी तो थांबेना तो म्हणाला " मुझे आजका उपास तुम्हारे पैसेसे छोडना है तो मुझे पाच रुपये दो और आज नहीं बोलना नही. " पैशाचे पाकिट काढले तर त्यात १० रुपयांची १ बंदी नोट. ती कुठे सुटे करणार ! तर त्या इसमाने माझ्या हातातील नोट जवळ जवळ पकडली व तो म्हणाला " आज नहीं बोलना नहीं. सब पैसे डाल दे. तेरा अच्छा होगा. यह देख." असे म्हणत त्याने ते अजगराचे संपूर्ण धूड माझ्या मानेत अडकवले. नंतर स्वतः त्याने अजगराचे तोंड माझ्या संपूर्ण पाठीवरून फिरवले व दोन्ही हात घट्ट धरून काही तरी पुटपुटला व तो म्हणाला "यह देख." पहातो तर त्याच्या हातातून तीर्थ पडू लागले. त्याने माझ्यावर ते शिंपडले व एक वस्तु ठेवण्यास दिली. व आता जाऊ शकतोस असे म्हणत त्याने चालण्यास सुरुवात केली. माझे पाकिट रिकामे झाले होते व केवळ ३५ पैसे खिशात होते. मी भांबावलो. त्या स्थितीत कार्यालयात आलो. मला कोणत्याही प्रसंगाचा उलगडा होत नसेल तर मी श्रींची पोथी त्यांचे नामस्मरण करून उदी बोटाना लावून उघडतो. माझ्या ऑफिस बॅगेत नेहमी इंग्रजी श्रीसाईसच्चरित्र बाळगतो व कुठेही वेळ मिळाला तरी

उघडून वाचतो. काहीच सुचेना म्हणून श्रींचे नामस्मरण करून मी प्रार्थना केली आणि वाचकहो! पोथी मेघा या शंकर व साईभक्तांच्या कथेत उघडली. एका निस्सीम साईभक्ताचा श्रीसाईनीं कसा शेवटपर्यंत सांभाळ केला त्याच्या प्रेतयात्रेला पण ते हजर राहिले व तो गेल्यानंतर ते रडले देखील. अशी ही कथा होती. मला श्रींनीच आशिर्वाद दिला या विषयी तिळमात्र शंका राहिली नाही. शिवाय जे ११ रुपये घेतले ते माझ्या मतानुसार ११ व्या अध्यायाची सेवा नित्य चालू ठेवण्यासाठी घेतले. कारण हा अध्याय हा पोथीतील रुद्राध्याय असून तो श्रींनी भक्तांना निष्काम भक्तींची दीक्षा देण्यासाठी दिला आहे. हा अध्याय माझ्या नित्य वाचनात असतो. त्याचबरोबर हे पण विशेष की, श्री शंकराने पार्वतीला ज्ञान दिले व मग ते श्रीकृष्ण अर्जुन यांची संवादरुपाने आपल्या पर्यंत आले. ज्ञानेश्वरीची सुरूवातच ॐकार श्रीगणेशस्तवनाने झालेली असून नेमक्या गणेशजन्मदिवशी श्रीनी सोमवारी शंकर स्वरूपात मला आशिर्वाद दिला. श्रीसाईसच्चरित्रात पण श्रींनी जोगांना सर्व पैसे द्यायला लावून मगच ज्ञानेश्वरी वाचण्याची आज्ञा केली होती. माझा पण खिसा त्यादिवशी खाली केला व मगच त्यांनी मला आशिर्वाद दिला.

卐

卐

# बाबांनी प्रार्थना ऐकली

—श्री. वसंत सच्चिदानंद देवभानकर
१२७०, सदाशिव पुणे ३०

नवसास पावेल माझी समाधी ॥ धरा दृढ बुद्धी माझे ठायी ॥

• माझी मुलगी चि. सौ. वसुंधरा रमेंद्र जोशी ही नोकरी करीत असल्याने तिचे जवळ माझी थोरली मेव्हणी तिचे ६ वर्षांचे मुलीस सांभाळण्यासाठी रहाते. मुलगी सी. डी. ए. मध्ये व जावई किर्लोस्कर कमिन्समध्ये नोकरीस आहेत. माझ्या मुलीस ६ वर्षांनी पुन्हा दिवस राहिले. १५ मे ७८ रोजी ९ वा महिना भरत आल्याने तिने आपली प्रकृती नेहमीच्या डॉ. जोत्स्ना पुरोहित एम. डी. यांना दाखवली. त्यांच्याच हॉस्पिटलमध्ये बाळंतपणासाठी नाव घातले होते व त्यांची ट्रीटमेंट चालू होती. दि. १५ रोजी डॉ. नी अजून ८-१० दिवस तरी तुम्ही घ्याल तोपर्यंत काळजी करू का असे सांगितले.

दि. १८-५-७८ गुरुवार रोजी मी नित्याप्रमाणे "श्रीबाबांची" पुजा आरती वगैरे सकाळी केली व बाबांना नवस केला की, माझी मुलगी सौ. ताई (सौ. वसुंधरा) हिच्या प्रसूतीचा दिवस सोमवार किंवा गुरुवार यावा व तिला मुलगा व्हावा व तिची सुखरूप सुटका व्हावी, तिला मुलगा झाल्यास तीन महिन्याच्या आत सौ. ताईसह तिच्या मुलाला आपले पायावर घालीन.

आणि त्याच दिवशी दुपारी ३ वाजता तिचे पोट दुखू (दिनांक १८-५-७८) लागले म्हणून तिला माझे मेव्हणीने डॉ. जोत्स्ना पुरोहित यांचे दवाखान्यात रीक्षा करून सहकार नगर येथून आणले. तावडतोब डॉ. ना तेथील नर्सने फोन केला. त्या ४ वा. दुपारी आल्या. प्रकृती पाहून लगेच ऑपरेशन थिएटरमध्ये नेले. सुमारे ५ ते ५-३० पर्यंत कुठल्याही प्रकारे त्रास न होता तिची सुखरूप सुटका होऊन मुलगा झाला, मला काहीच कल्पना नव्हती संध्याकाळी ६ वा. समजले त्यावेळी "श्रीबाबांनी" माझी प्रार्थना ऐकून सर्व चांगले केले म्हणून गहिवरुन येऊन आनंदाश्रु आले. नंतर नवस केल्याप्रमाणे मुलीला १ महिना होताच आम्ही सौ. ताईला व तिचे मुलाला घेऊन २८।६।७८ रोजी शिर्डी येथे आलो, दुसरे दिवशी पुजा, अभिषेक, सत्यनारायण सर्व व्यवस्थित करून तिचे मुलाला बाबांचे पायावर घातले २–३ दिवस शिर्डी येथे होतो, सर्व वेळ मजेत गेला.

दि. ११।८।७९ रोजी पुन्हा मी सौ. वसुंधरा (माझी मुलगी) जावई, नातू माझी पुतणी सर्वजण बाबांचे दर्शन घेऊन दि. १२ रोजी रात्री परत पुणे येथे आलो. "श्रीबाबांचे कृपेने आमचे सर्वांचे चांगले चालले आहे अशी बाबांची सदैव कृपा असावी हीच त्यांचे चरणा जवळ प्रार्थना आहे. ★

# ....तरीही धावेन भक्तांसाठी

—श्री. विजय द. हजारे, एम. ए.
सी/६, गुंफादर्शन, फर्स्ट कार्टर रोड,
बोरीवली (पूर्व), मुंबई नं. ४००,०६६

● जीवनात घडणारी प्रत्येक गोष्ट ही 'साई' च्या आशिर्वादाने घडते अशी माझी अढळ श्रद्धा आहे. कुणाला ते पटो वा न पटो पण निदान माझ्या आयुष्यातल्या हरएक घडी 'साईइच्छा' म्हणून मी प्रत्येक प्रसंगाला सामोरा जाऊ शकतो. मग तो चांगला असो वा वाईट, सुखद असो अथवा दुःखद ! पलबाचीच गोष्ट पहा !

अगदी साधी सरळ वाटेल प्रथमदर्शनी पण माझ्यावर 'साईकृपा' नसती तर कदाचित...

नेहमीप्रमाणे आमच्या सहकारी ग्राहक (घरगुती) सोसायटीच्या (बोरीवली-तील संस्थेच्या) श्री. कानडे यांच्याकडे मी नेहमीप्रमाणे स्वतः जाऊन बिल भरून आलो. एकूण एकशे तेहतीस रुपये! त्यात शंभर रुपयाची एक नोट तर १० रुपयाच्या चार नोटा त्यांना दिल्या. त्यांनी उरलेले सात रुपये परत दिले. ते व बिल पोहचल्या-बद्दलची बिलावरच त्यांची सही घेऊन मी परत घरी आलो. तेथून काही कामानिमित्त गिरगावला निघून गेलो. मी जाताच कानडे आमच्या घरी आले तेच माझ्यावर आरोप करीत की "मी त्यांना शंभर रुपयाची नोट दिलीच नाही. वरचे सुटे सात रुपये मात्र मी घेऊन आलो." मी नसल्यामुळे सौ. ला काहीच बोलता येईना. तीही गांगरली. बाबांच्या तसबिरीकडे पाहून तिने त्यांना माझ्या प्रामाणिकपणाची ग्वाही दिली की "ते असं करणार नाहीत, म्हणून!" पण कानड्यांची समजूत काही पटेना.

शेवटी रात्री १०।।/११ ला मी घरी परतल्यावर तिने मला झालेला प्रकार सांगितला. मलाही आपल्यावर 'एकप्रकारे खोटा आरोप' घेतल्याचे जाणवले. त्याने क्षणभर मीही भांबावलो. आणि 'साईमाऊली'ला मला वाचविण्याची मनोमन प्रार्थना केली. बाबांची उदी लावूनच मी दाराबाहेर पडतो न पडतो तोंच 'सौ. नं मला आडविलं' आणि विचारलं की "तुम्ही कानड्यांना पटविणार कसं की तुम्ही त्यांना नोट दिलीत ते"...खरंच, मला देखील ते सुचलं नव्हतंच, जणुं तिच्या तोंडून बाबांनीच माझी विवेकबुद्धी जागृत केली होती. मी बाबांच्या तसबिरीसमोर उभं राहून एक चित्तानं त्याचं मनन स्मरण केलं. पहाता पहाता आशिर्वादासाठी उंचाव-लेल्या बाबांच्या हातात कोऱ्या नोटाचं छोटसं पुडकं दिसलं. माझ्या डोळ्यातून घळघळ अश्रू वाहू लागले. साईंनी मार्ग दाखविला होता. स्वतःला निष्कलंक म्हणून शाबीत करण्याचा! माझ्या पगाराच्या पाकीटातून 'शंभर' रुपयाची नोट दिली होती. ते पाकीट पाहिले. त्यात इतर दोन-तीन शंभरच्या नोटा शिल्लक होत्या. त्या बहुतेक (कोऱ्या असतील तर) एकाच सिरीजमधल्या नंबरच्या असतात. त्या नोटांचे नंबर टिपले आणि कानड्यांच्या घरी धाव घेतली. मी सांगितल्याप्रमाणे त्यादिवशी जमा झालेल्या शंभरच्या नोटांचे नंबर पडताळून पाहिले. नेमकी मी सांगितलेल्या नंबरच्या आधीच्या नंबरची नोट त्यात मिळाली. त्यांचा चेहरा पाहण्या-सारखा झाला. माझ्यावर अविश्वास दाखविल्याबद्दल त्यांना वाईट वाटलं. त्यांचेही तसं चुकलं नव्हतं. माझ्या आधी तिघांनी त्यांना पैसे दिले होते. ते सहाशेच्या वर होते हिशोबाप्रमाणे त्यांच्याकडे शंभरच्या सहा नोटा हव्या होत्या पण निघाल्या

पाचच ! म्हणून त्याना मी 'नोट' दिली नाही असं वाटणे साहजिकच होते. तरी देखील......नोटांचे नंबर पहाण्याचे 'बाबांनी' मला सुचविले नसते अगर त्या सिरीजमधली 'नोट' घरात शिल्लकच नसती तर......माझ्यावरचा चुकीचा का होईना पण "आरोप"च सिद्ध करता आला असता का ?...अशी घेतात बाबा आपल्या भक्तांची काळजी ! आणि देतात आपल्या वचनांची प्रचिती.

# नाम जपाने मुलीचा पुनर्जन्म

—श्री. जे. डी. दळवी
१२/२४४ बी. पी. टी. क्वार्टर्स
नाडकर्णी पार्क, वडाळा (पूर्व) मुंबई ३७

● माझी नव्या खात्यात बदली झाली. तिथे काही नव्या ओळखी झाल्या. तर काही जुन्या ओळखीना उजाळा मिळाला. माझ्या बोलक्या स्वभावामुळे लवकरच सर्वांचा परिचय झाला.

थोडयाच दिवसानंतर माझ्या एक गोष्ट लक्षात आली ती ही की इथला आमचा एक सहकारी आमच्यात मिसळत नाही. आमच्या गप्पा गोष्टीत भाग घेत नाही किंवा आमच्या विनोदाना दाद देत नाही. नेहमी दुर्मुखलेल्या चेहऱ्याने एकटाच काम करत असतो. फक्त कामापुरता बोलत असे.

हे माझ्या लक्षात आल्यानंतर एके दिवशी मी तो एकटा असताना, त्याला विश्वासात घेऊन, गंभीर होऊन, याचे कारण विचारले. त्याने अतिशय दुःखी आवाजात सांगितले की, त्याची एक २ वर्षांची मुलगी थोडयाशा आजारानंतर एक महिन्यापूर्वी अचानक मृत्यू पावली, आणि त्या धक्क्यातून तो अजून सावरला नाही.

तो म्हणाला, "माझा देवावर विश्वास आहे. जेव्हा माझी मुलगी ८ दिवस मृत्यूशय्येवर तडफडत होती तेव्हा मी तिचे प्राण वाचवण्यासाठी देवाची सतत प्रार्थना करत होतो. परंतु देवाने माझी प्रार्थना ऐकली नाही. आणि आता जेव्हा मी या घटनेचा विचार करतो तेव्हा मलाच प्रश्न पडतो की मी देवाची काहीही सेवा करत नसताना देवाने माझ्यावर कृपा का करावी ? आणि मला अधिकच दुःख होत आहे

ते याचं की देवाची कृपा संपादन करण्यासाठी मी काय करावे हे मला समजत नाही. नोकरी आणि संसार सांभाळून मी परमेश्वराची कोणती आणि कशी सेवा करू की ज्यामुळे माझ्या संकटात मला परमेश्वराला हक्काने हाक मारता येईल ? ”

तो अतिशय भावनोत्कटतेने बोलत होता, आणि मीही त्याला त्याचे मन हलके होण्यासाठी बोलू दिले. तो थोडा शांत झाल्यानंतर मी त्याला काही अध्यात्मिक तत्त्वज्ञान सांगून त्याचे सांत्वन करण्याचा प्रयत्न केला आणि शेवटी त्याला सांगितले की, “ परमेश्वराची कृपा संपादन करण्यासाठी अत्यंत सोपा आणि तितकाच प्रभावी कुणालाही आचरणात आणता येईल असा एकुलता एक उपाय म्हणजे नामजप.

आणि म्हणून त्याला त्याच्या दुःखावर उपाय म्हणून परमेश्वराच्या नामजपावर जोर देण्यास सांगितले.

दुसऱ्या दिवशी मी त्याला, कै. रामचंद्र कृष्णा कामत यांनी लिहिलेले “ नाम जपाचे महत्त्व ” हे पुस्तक वाचावयास दिले. कामतांनी लिहिलेल्या “ नामजपाचे महत्व ” भाग १ ला आणि त्याचाच भाग २ रा “ नाम चिंतामणि ” या दोन पुस्तकानी माझ्या जीवनात क्रांति केली. या दोन पुस्तकानी अध्यात्मीक जीवनाच्या वाटचालीची निश्चित दिशा दाखवून अत्यंत सोपी पण तितकीच प्रभावी साधना मला दाखवून दिली.

या पुस्तकांचा माझ्या मनावर इतका परिणाम झाला की, या मार्गातील भेटेल त्याला ही पुस्तके वाचण्याचा मी आग्रह करू लागलो. या पुस्तकाच्या प्रति मी लग्नात भेट म्हणून सुद्धा देवू लागलो आणि म्हणूनच मी हे पुस्तक माझ्या वरील मित्राला वाचावयास दिले.

मी दिलेले पुस्तक या मित्राने मोठ्या अधीरतेने वाचून काढले आणि तो इतका प्रभावीत झाला की त्याने तावडतोब मोठ्या श्रध्देने आणि निश्चयाने नामजपाला सुरुवातही केली. आता तर तो अधिकच एकांतप्रिय झाला. आम्हा सर्वांना तो टाळू लागला. कामावरून घरी जाताना किंवा कामावर येताना तो कुणाच्याही बरोबर जाण्याचे टाळत असे. कारण काय, तर त्याच्या बरोबर गप्पा मारण्यात वेळ फुकट जाऊ नये, आणि आपल्या नाम जपात खंड पडू नये. तो घाटकोपरला रहात असे. ते सुद्धा स्टेशनपासून अर्धा तास दूर चालत जात असे. घर ते ऑफिस या प्रवासाला त्याला दीड तास लागत असे. पूर्वी हा प्रवास कंटाळवाणा वाटत असे.

ण आता मात्र ही नामस्मरणासाठी मिळालेली संधी आहे असे समजून तिचा तो रेपूर उपयोग करू लागला. ऑफिस मध्ये, प्रवासात, घरी, जेवताना, आंघोळ रताना, दाढी करताना वा इतर कसलेही काम करताना, बस्स, नामस्मरण आणि ामस्मरण. दुसरी बात नाही. डोक्यात दुसरे विचार नाहीत. मनाला दुसरा छंद ाही. त्या पुस्तकात सांगितल्याप्रमाणे दररोज केलेल्या नामजपाचा हिशोब लिहून ठेवू लागला. दररोज ३० ते ३५ हजार जप होऊ लागला. याचाच अर्थ तो दिवसाला १० ते १२ तास जप करत असे, आणि अशा तऱ्हेने त्याने एका वर्षात कोटी जप पुरा केला.

महिन्या मागून महिने जात होते. याचा जप अखंडपणे चालू होता. अशा ऱ्हेने वर्ष गेल्यानंतर त्याची पत्नी पुनः गरोदर राहिली. पूर्ण दिवस भरले आणि सूतिला ७/८ दिवस असताना त्याची मृत मुलगी त्याच्या स्वप्नात आली आणि हणाली, "बाबा, मी पुन्हा आले. बाबा मी पुन्हा आले."

योग्य वेळी पत्नी प्रसूत झाली. मुलगी झाली. मुलगी पाहिल्याबरोबरच आई वडिलांची खात्री झाली की स्वप्नात सांगितल्या प्रमाणे आपली गेलेली मुलगीच पुन्हा आपल्या पोटी जन्माला आली आहे. म्हणून त्यांनी पहिल्या, गेलेल्या मुलीचेच नाव या मुलीला ठेवून आनंदाने बारसे केले. हळू हळू मुलगी वाढू लागली. नावारुपास येऊ लागली. तिच्या स्वभावाचे एक एक पैलू उमलू लागले आणि मग तिचा स्वभाव, रूप तिचा वर्ण तिचे वागणे तिचे हसणे, बोलणे चालणे हे सर्व काही पहिल्या मुलीशी इतके तंतोतंत जुळत होते, की ही आपली गेलेलीच मुलगी पुनर्जन्म घेवून आली याबद्दल त्यांना तिळमात्र शंका उरली नाही.

आणि जेव्हा ती २ वर्षांची झाली तेव्हा तर खुद्द तिच्या आई वडिलांना सुद्धा केव्हा केव्हा शंका यायची की ही आपली मुलगी खरोखरच मरण पावली होती की ते एक भयानक स्वप्न होते असे असताना, ज्याना त्या पहिल्या मुलीच्या मृत्यूबद्दल कल्पना नव्हती त्यांना जर सांगितले की, ही ती पहिली मुलगी नव्हे, तर त्याना तरी कसा विश्वास वाटावा ?

केवळ श्रीसाई परमेश्वराच्या कृपेनेच आपली गेलेली मुलगी आपल्याला परत मिळाली आणि केवळ नामजपानेच आपण या परमेश्वराच्या कृपेला पात्र झालो अशी आमच्या मित्राची खात्री झाली.

# साईबाबा गरीबांचे वाली

— सौ. अस्मिता देशपांडे
कन्या शाळेसमोर, केळकर वाडी, वाई

● मला श्री साईबाबांनी संकटातून कसे वाचविले याचा एक अनुभव देत आहे.

दिनांक १३ मार्च १९७६ रोजी माझ्या लग्नाची ठरवाठरवी झाली. मुलांकडील मंडळींचे मागणी प्रमाणे सर्व काही माझ्या वडिलांनी कबूल केले. आमचे घरी दोन बहिणी व दोन भाऊ आहेत. आम्ही तीन मुली मोठ्या आणि दोन भाउ लहान. माझे वडिल सरकारी सेवेतून दिनांक ३१-७-१९७६ पासून निवृत्त झाले. त्यांना मिळणारे पेन्शन सात माणसांचे कुटूंबास पुरेल असे नसल्याकारणाने मी दरमहा रुपये शंभर पगारावर नोकरी धरली. घरातला खर्च जेमतेम कसातरी भागत असे. माझे वडिलांनी सेवा निवृत्ती नंतर मिळणारी ग्रॅच्युएटी व फंडाची रक्कम यातून माझे लग्नाचा खर्च करण्याचे ठरविले. लग्न मुहूर्त २ डिसेंबर १९७६ ठरविला. मुलाकडील मंडळीनी ठरलेली रक्कम लग्न मुहूर्ताचे अगोदर एक महिना द्यावी असे सांगितले. दिपवाळी झाली तरी ग्रॅच्युएटी किंवा फंडाचे पैसे मिळाले नाहीत. १५ नोव्हेंबर १९७६ रोजी मुलाचे वडिलाकडून खडखडीत जबाब आला की ठरलेली रक्कम वेळेवर देत नसाल तर नाही म्हणून सांगा, आम्ही मुलीला एकटीला आणून लग्न उरकून घेऊ. माझे वडिल बेचैन झाले. त्याचे ऑफिसचे वरिष्ठ अधिकारी यांना तारा पाठविल्या परंतु उपयोग झाला नाही. मला सुध्दा माझे लग्नाचे बाबतीत माझे वडिलांना किती त्रास पडतोय वेळेवर जेवण नाही, झोप नाही, घरात थोड्या कारणाने अनिवार संतापणे काही काही कोणालाच सुचत नव्हते. मी आता शेवटचा उपाय म्हणून श्रीसाईबाबांना हाक घातली, कारण माझे वडिल श्रीसाईबाबांचे परमभक्त आहेत. त्यांचेमुळे घरातील आम्हा सर्वांना श्रीसाईबाबां शिवाय कोणी वाली नाही. दिनांक २१।११।७६ रोजी श्रीसाईबाबांनी दृष्टांत दिला की, माझे वडिलांना चार पाच माणसे काठीने मारीत ओढीत नेत आहेत एका भल्या मोठ्या कोठारात त्यांना ढकलून देत म्हणतात की, घे, घे हा पैसा, किती पाहिजे, अरे तू मर्दासारखा मर्द आणि कपाळाला हात लावून बसतोस चल आटोप घे पाहिजे तेवढा पैसा.

मी एकदम दचकले झालेली सर्व दृष्टांत कथा आई वडिलांना सांगितली. माझे वडिल म्हणाले कसले बाबा अन् कसले काय. कार्टे तुझ नशिबच वाईट. मिळणारे पैसे सुद्धा येत नाहीत तर दुसरे कोण देणार. हा विषय तिथेच सोडून देऊन माझे वडिल खिन्न मुद्रेने बाहेर पडले.

दिनांक २०-११-७६ चा दिवस आजही मला आठवतो खरोखर साईबाबा गरीबांचे वाली आहेत हे मला सत्य पटते. माझे वडिलांचे मित्राने, (श्री. पिंपुटकर) काही एक विचार न करिता रोख रक्कम संध्याकाळी ५ वाजता त्यांचा पगार झाले बरोबर माझे वडिलांना दिली. हल्लीच्या दिवसात प्रत्यक्ष भाऊ भावाला मदत करीत नाहीत परंतु श्रीबाबांचे रुपातच श्री पिंपुटकर यांनी या शुभ कार्यात मदत केली. दिनांक २ डिसेंबर १९७६ रोजी माझे लग्न मोठ्या थाटात निर्विघ्नपणे पार पडले. आज मी माझ्या राजाबिंड्या मुलाला खेळवीत असताना त्याच्या प्रथम वाढदिवसाचे दिवशी दिनांक ६।९।७८ गणेशचतुर्थी या शुभवेळी स्वाभिमानाने श्रीसाईबाबाच वाली म्हणून ही छोटी लेखणी त्यांचे चरणी अर्पण करीत आहे.

# श्रद्धा ! श्रद्धा !

—श्री. दत्तात्रय जर्नादन दळवी
भट बिल्डिंग घंटाळी देवी पथ, ठाणे २

● श्री बाबाविषयी मला नितांत श्रद्धा आहे. तसा मी त्यांचा भक्त आज जवळ जवळ ४० वर्षे आहे. त्यांनी मला माझ्या संसारात काही कमी पडू दिले नाही. वर्षातून एक दोन वेळा शिर्डीस जाण्याचा योगही आपोआप येतो. माझा पुतण्या त्याच्या मित्राबरोबर शिर्डीस ता. ११–४–८० रोजी जाणार होता. त्यांनी येणार का म्हणून विचारले. अनायासे सोबत असल्यामुळे मी होकार दिला. सकाळचे एस. टीने आम्ही निघालो नाशिकपर्यंत गाडी ठीक गेली. पण पुढे बस सुटण्याची चिन्हे दिसेनात. तेव्हा चौकशी अंती कळले की नगरजिल्ह्यात "कांदा" प्रकरणी आंदोलन सुरू आहे. कंडक्टरने सांगितले की गाडी पुढे जाणार नाही. पण माझी बाबांवर श्रद्धा होती की माझी शिर्डी भेट चुकणार नाही. कारण माझ्या रिवाजाप्रमाणे मी चिठ्या टाकून बाबांकडे विचारणा केली होती की "बाबा" मी शिर्डीस येऊ का. उत्तर होकारार्थी आले होते. माझा पुतण्या व त्याचा मित्र हताश झाले होते. त्यांनी नाशिकचे "मुक्तिधाम" पाहून परत जाण्याचा विचार केला होता. पण मी त्यांना आश्वासन दिले की आपण आज संध्याकाळपर्यंत शिर्डीस नक्की जाऊ आणि तसेच घडले. मुंबई-नगर (व्हाया नाशिक, शिर्डी) गाडी सुमारे १२-३० वाजता आली. त्या ड्रायव्हर कंडक्टरनी गाडी पुढे नेण्याचा निर्णय घेतला आणि आम्ही सुखरुप शिर्डीस सुमारे ३–३० वाजता पोचलो. वाटेत काही त्रास झाला नाही.

# पैसे चोरले नि शिरडी गाठली

—श्री. प्र. ना. बेलसरे,

"जग हे आहे दिल्या घेतल्याचे
परि अंतः काळचे साईबाबा."
"जेथे जातो तेथे तू माझ्या सांगती
चालविसी हाती धरोनिया"

ह्या तुकाराम महाराजांच्या अभंगातील उक्ती श्री. सद्गुरू साईबाबांच्या बाबतीत अगदीच योग्य ठरतात. हा माझा स्वतःचा अनुभव आहे.

मी सन १९५४ सालच्या जून महिन्यात शिर्डीला आलो होतो. कारण मला माझ्या जीवनाचा उबग आला होता. त्याचे असे झाले, ५४ साली मी हायर मॅट्रीक नापास झालो म्हणून नॉर्मल स्कूलच्या परीक्षेला बसलो. तेथेही पेपर्स कठीण गेले घरी वडीलांचा भयंकर धाक. आमचे वडील म्हणजे "पंतोजी." जुन्याकाळचे सेवानिवृत शिक्षक. ते शिरडीवरून ४७-४८ च्या दरम्यान परत आले होते.

जो जो मज भजे, जैशा जैशा भावे।
तैसा तैसा पावे मीही त्यासी ॥

या साईबाबांच्या कृतिचा खोल ठसा माझे मनावर उमटला होता, व कोणत्य मार्गाने शिर्डीला जावे याचा विचार करत होतो. मी कोणत्याही गोष्टीचा मागचा पुढचा विचार न करता वडीलांच्या पेटीतील ५० रुपये चोरले व शिर्डीचा रस्ता धरला. घरी कोणालाच सांगीतले नाही.

अर्थात इकडे मला पाहाण्याकरीता घरच्या लोकांची धावपळ झालीच हे सांगणे नलगे.

त्यावेळी कोपरगांववरून जायचे झाल्यास गोदावरी नदीच्या पलीकडच्या तीरावर मोटारी थांबवत असत. मी कोपरगावला उतरल्यानंतर जून मध्ये गोदावरी नदीला पाणी असल्यामुळे डोंग्यात बसून पलीकडच्या तिरावर गेलो, व चार दिवस शिर्डीला मुक्काम ठोकला व पाचव्या दिवशी घरी परत आलो तो घरचे सर्व लोक आनंदीत दिसले. कारण मी शिरडीला असल्याबद्दलचा कौल साईबाबांनी माझ्या

वडीलांना आदल्या रात्रीच दिला होता, व दुसरी गोष्ट म्हणजे माझा नॉर्मल स्कूल मध्ये शिक्षकांच्या ट्रेनिंगकरिता नंबर लागल्याची ऑर्डर त्याच दिवशी आली होती. मग काय विचारता ! त्या वेळच्या आनंद वर्णन करण्यास, माझे शब्द अपुरे पडतात.

आज माझ्या नोकरीला २३ वर्षे पूर्ण झाली आहेत. अजूनही मी श्री सदगुरू साईबाबा यांच्या फोटोची नित्य नेमाने पूजा करतो, व मधून मधून शिर्डीला येत असतो.

त्यांच्या कृपेने आज माझी इतरही बाजूने प्रगति होत आहे, व माझी संतती वगैरे सुखी आहे. माझ्यावर संकटे येतात पण ती साईबाबांच्या कृपेने निस्तरली जातात

" साईच्या किर्तीचा वाजे डिंडीम पहा ।
ऐकू येई नांव त्यांचे जगती पहा. ।। "


# शिरडीचे श्री साईबाबा

श्री साईबाबा संस्थान शिरडीचे नवे इंग्रजी प्रकाशन
विजयादशमीचे सुमुहूर्तावर प्रकाशित झाले

: लेखिका :

## श्रीमती पेरीनबेन एस्. भरूचा

पृष्ठे १०६ ] [ किंमत ५ रुपये

मुंबईत शिरडी कार्यालयात विक्रीस उपलब्ध

# कृपाळू बाबा

▲ ▲ ▲

—सौ. आर. व्ही. जाधव बी. एस. सी.
गोविंद भुवन, लिमयेवाडी अलिबाग.

" वरी ऐक सांगतो शामा प्रेमे घेईल जो मन्नामा तयाचिया मी सकल कामा पुरवी प्रेमा वाढवी. ।। मज गाई जो वाडे कोडे माझे चरित्र माझे पवाडे तयाचिया मी मागे पुढे चोहीकडे उभाची " ।।

अशी माझी दयाळू गुरूमाऊली, असे आमचे बाबा. बाबा आम्हाला माता पित्यासमान वाटतात, कारण आपल्या बावरलेल्या कोकराला ते धीर देतात. आधार देतात. श्रीसद्‌गुरू साईबाबांबद्दल मला काय वाटते ते शब्दांकीत करणेच कठीण आहे. बाबा म्हणजे एक तेज आहे एक अपूर्व अशी शक्ती आहे कोठेही कोणत्याही क्षणी बाबांना साद घाला अगदी मनापासून, बाबा हाकेला धावलेच ! लाईटचे बटन दाबल्यावर दिवा लागायला जितका वेळ लागत असेल तितकाही वेळ श्रीबाबांना धावून यायला लागत नाही पण ती हाक कळकळीची असावी. इकडे तिकडे चोहीकडे सगळीकडेच बाबा. याचा अनुभव मला अनेकवेळा आला आहे. माझा विवाह सुद्धा श्रीसाईबाबांच्याच कृपेने झाला. त्यांच्याच कृपेने लवकरच आम्हाला गोपालकृष्णाची आठवण यावी असे नटखट, अवखळ कन्यारत्न झाले.

त्यानंतर मला नोकरी मिळावी म्हणून मी रोज श्रीसद्‌गुरु साईबाबांच्या फोटोला ताज्याफुलांचा हार घालीत असे व रात्री निजताना बाबांची प्रार्थना म्हणत असे. श्रद्धा आणि सबूरी हवी त्याप्रमाणे लवकरच म्हणजे १ ते १॥ वर्षातच श्रीबाबांच्या कृपेने मला एका हायस्कूलमध्ये शिक्षिकेची नोकरी मिळाली. हायस्कूल घरापासून जवळ जवळ १५ कि. मी. अंतरावर होते त्यामुळे एस. टी. ने जावे लागे. तसा त्रासही खुप व्हायचा आणि मग बाबांची तीव्रतेने आठवण व्हायची. पुढीलवर्षी त्या शाळेच्या मुख्याध्यापकांनी अपडाऊन करणाऱ्यास परवानगी नाकारली. त्याच गावात रहा अन्यथा नोकरी सोडा. आता इतके दिवस नोकरी केली पण गाठीशी तसे काहीच नाही, आणि घरची माणसे म्हणू लागली की नोकरीसाठी आम्ही तुला तिथे कसे ठेवणार ! नको ती नोकरी बस झाली. झाले परत बाबांचा धावा सुरू. बाबा मला नोकरी करायचीच आहे हो काही तरी मार्ग काढा, तरीही जून

मध्ये माझे अपडाऊन १३, १४ दिवस चालूच होते आणि २६ ता. ला आमच्याच गावात घरापासून थोड्याच अंतरावरच्या हायस्कूलमध्ये ( मी दोन महिन्यांपूर्वी अर्ज केला होता तेथे. ) दुसऱ्याच दिवशी हजर होण्याचा आदेश मिळाला. आणि मन बाबांवरील स्नेहभावाने भरून आले. धावतच बाबांच्या छबीकडे गेले तर बाबा गालावल्या गालात हसत आहेत असे वाटले. बाबा धन्य आहे तुमची. तुमची लीला अगाध आहे. आज तुम्ही नसता तर मला नोकरी सोडणेच भाग होते. माझे कनवाळू कृपाळू बाबा.

# अन् त्या दिवसापासून साईबाबा आमच्याकडे रहावयास आले....!

—श्री. प्रभाकर चेंदवणकर
अंबिका निवास, आग्रा रोड,
कुर्ला, मुंबई नं. ७०.

* चार एक वर्षापूर्वीची गोष्ट. गुरुवारचा दिवस होता. ऑफिस सुटल्यानंतर दादरला पोर्तुगीज चर्चजवळ काही कामानिमित्ताने गेलो होतो. परत येताना डिसिल्व्हा हायस्कूलसमोर एक छोटेसे फ्रेममेकरचे दुकान आहे. दुकानाच्या बाहेर साईबाबांची सुंदरशी फ्रेम लावलेली होती. जाता जाता माझे सहज लक्ष त्या फ्रेमकडे गेले. क्षणभर माझे पाय रेंगाळले. मी थांबलो, व तसबिरीतील साईबाबांचे निरीक्षण करू लागलो. बाबांची ती कारुण्यमय मूर्ती व भावपूर्ण डोळे पाहून माझे पाय जागच्या जागीच खिळून राहिले. बाबांच्या डोळयात अशी काही जबरदस्त जादू होती की, माझे पाय पुढे हलेचनात ! जणू बाबांचे डोळे मला खुणावित होते. जवळ बोलावित होते. मी तसबिरीच्या जवळ जाऊन अवलोकन करू लागलो. माझे डोळेच काय तर माझे सारे देहभान हरपले. माझे तन-मन सारे काही बाबांच्या प्रतिमेभोवती केन्द्रित झाले. माझे मन प्रसन्न झाले. अत्यानंदाने पुलकित झाले. काही झाले, कितीही किंमत सांगितली तरी बाबांची ही तसबीर घेतल्याशिवाय घरी जायचे नाही असेच माझ्या मनाने घेतले. इतकी ती तसबीर मला आवडली.

दुकानदार तसा माझ्या ओळखीचाच होता. मी त्याला सांगितले, ‘ हे पहा, मला ही साईबाबांची तसबीर हवी आहे. तुझी मेहनत व योग्य तो फायदा व मोबदला घेऊन मात्र एकच किंमत सांग. या तसबिरीची घासाघीस किंमत करायची नाही. तू सांगितलेली किंमत देऊन मी ही तसबीर घेणार आहे...!’

माझ्या रोखठोक बोलण्याने दुकानदार माझ्याकडे बघतच राहिला. त्याने क्षणभर माझ्याकडे व तसबिरीकडे पाहिले व त्यानेच मला पेचिदा सवाल टाकला, "साहेब...! या तसबिरीची किंमत करायची नाही हे तुमचे म्हणणे अगदी बरोबर आहे. तुम्हीच काय ते समजून तुम्हाला योग्य वाटेल ती किंमत द्या...!!"

मी खिशातून दहा दहाच्या तीन नोटा काढून त्याच्या हातावर ठेवल्या. आतातरी खूष आहेस ना.

"साहेब... ! हेच जास्त झालेत.' असे म्हणून त्याने त्यातली दहाची एक नोट काढून माझ्या हाती परत दिली, व व्यवस्थित कागदात लपेटून माझ्या हाती ती तसबीर दिली.

जाता जाता वाटेत दवे स्वीट मार्टमध्ये पेढे घेतले. मला मोठा हार, फुले, नारळ, अगरबत्ती, कापूर सारे काही पूजेचे साहित्य घेतले, व फर्स्टक्लासमधून तसबीर सांभाळून कुर्ला मुक्कामी येऊन पोहोचलो.

माझ्या हातात हार, नारळ आदि पूजासाहित्य तथा एक भली मोठी तसबीर पाहून सौभाग्यवती व आई सारीजण अवाक् झाली.

मी कुणाशीच काही बोललो नाही. काही सांगितलेही नाही. कपडे काढले. हातपाय स्वच्छ धुतले. देव्हाऱ्याच्या खाली एक छोटेसे टेबल मांडले त्यावर सुंदरसा टेबल क्लॉथ अंथरला. गुलाबपाणी शिंपडले. गुलाबाच्या पाकळया पसरल्या व टेबलाच्या बरोबर मधोमध बाबांच्या तसबिरीची प्रतिस्थापना केली. तसबिरीच्या दोन्ही कोपऱ्याजवळ विडा सुपारी वर सव्वा रुपया ठेवून तसबिरी समोर नारळ ठेवला. समई लावली तसबिरीला हार घातला. बाबांच्या मस्तकाला व पायाला हळद-कुंकू लावले, व ताटात पेढ्यांचा प्रसाद ठेवला. ताम्हणात निरंजन व कापूर लावून बाबांची आरती म्हणू लागताच मागे सौभाग्यवती व आई व इतर मंडळी लगबगीत हजर झाली, व आरती म्हणण्यात सहभागी झाली. सर्वांना बाबांचा प्रसाद वाटला.

प्रसादाचा पेढा खात खात आईच्या मागून पत्नी हळूच विचारते. "आज हे काय नवीन वेड...!" अगदी योग्य शब्द वापरलास बघ. मलाच काय तर माझ्यासारख्या हजारो...लाखो लोकांनी 'वेड करण्याची...वेड...लावण्याची' असामान्य, जबरदस्त शक्ती सामर्थ्य या वेड्या...बावळ्या...फकिराच्या नजरेत आहे खास...! आणि याचे प्रत्यंतर मी स्वतः आज अनुभवले आहे ! ! "

मी घडला प्रकार आईला व पत्नीला सांगितला, आणि गमतीतच म्हणालो आज दादरला 'साईबाबा' भेटले. आमच्या घरी येण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली. मी तात्काळ सांगितले, खुशाल चला...! आमच्या बंगल्यात अमाप जागा आहे. तुमची इच्छा होईल तिथे, हव्वे तितके दिवस मुक्काम ठोका. आमची बिलकूल ना नाही...! फक्त एक. आम्ही पति-पत्नी दोघेही नोकरीला जातो. तेव्हा आम्हाला जमेल तशी ... जमेल तितकी आपली मनोभावे सेवा करू. आमची आई दिवसभर तुम्हाला सोबत करील.

यावर 'साईबाबा म्हणाले, ठीक' त्या दिवसापासून साईबाबा आमच्याकडे रहात आहेत.

# साई कृपा

—प्रा. गुंडेराव पटवारी, "साहित्य रत्न"
ब्राह्मणवाडी–बिदर

● आज पाच वर्षे होऊन गेली. मी साईबाबांच्या नामस्मरणात आपले आयुष्य घालवित आहे. गेल्या पाच वर्षां पासून जीवनात मला अनेक अनुभव आले, साईकृपा अनेकदा झाली. दुःख दूर झाले. क्षणो क्षणी साईकृपेचा अनुभव येत आहे!

घरात सुख आहे. बाहेर सुखी आहे. नोकरीत काही त्रास नाही. अधिकारी खुष आहेत, मुले शिकत आहेत, मोठी मुलगी पदवीधर झाली, लग्न झाले. आनंदात आहेत, मुलगा बी. ए. ला शिकत आहे. तीनदा शिर्डीची यात्रा केली, मला सहा वेळेस शिर्डी यात्रा करण्याचे सौभाग्य प्राप्त झाले.

४ जुलई १९७८ ला माझ्यावर एक मोठे संकट आले, मी सकाळी आठ वाजता काही कामासाठी घरच्या माडीवर चढलो व पाय घसरून १६ फूटा वरून खाली पडलो, पाय फ्रॅक्चर झाले, मोठी जखम झाली, जीवनाचा अंत दिसू लागला, आई आणि मुले रडू लागली, डॉक्टर आले, पाय पाहिले आणि निराश झाले, थोड्या वेळाने मला शुद्धी आली आणि साई बाबांचे नामस्मरण आरंभ केला. उदी आणवली आणि तेच औषध रुपाने घेतले.

दोन वाजता डॉक्टरानी पाय प्लॅस्टर मध्ये घातला आणि देवच कृपा करील असे सांगून गेले.

माझे एका मित्राने कार्यकारी संपादक श्री सदानंद चेंदवणकर यांना पत्र पाठविले आणि माझे हे दुर्दैव त्यांना कळविले.

गुरुवारी चार वाजता श्री. चेंदवणकरांचे उत्तर आले आणि त्यांनी साईनामस्मरण करित जा पंधरा दिवसाच्या आत पाय बरे होतील असे सुचविले, विचित्र झाले. दुःख कमी झाले आणि बरोबर पंधरा दिवसा नंतर मी उभा राहिलो, डॉक्टराना आश्चर्य वाटले, सर्वांना आनंद झाला. मला साईवर जो भरवसा होता तो पूर्ण झाला, मनाला फार आनंद झाला. साईकृपावंत आहे. त्याचे नामस्मरण करणे आवश्यक आहे! दीड लाख जप पूर्ण झाले आणि एका रात्री स्वप्न अवस्थेत साई एका फकीराचे रूप घेऊन आले व मला म्हणाले, "साईनाम बडी दवा है" खरोखर साईनाम मोठे औषध आहे! ज्याना काही शारीरीक बाधा आहेत त्यांनी दीड लाख जप करावे, साईकृपेने त्यांची बाधा दूर होईल. मी लोकाना हेच सांगत आहे साई नामाचे स्मरण करा. सुखी व्हाल! साईकृपा मी जन्मोजन्मी विसरू शकत नाही.!

# साई तारी त्याला कोण मारी

—श्री. प्रकाश कर्वे,
२४ रामबाग, इंदूर

● श्री साईबाबांची कृपा केव्हा होईल व कशी होईल हे काही कोणी सांगूच शकत नाही. त्यांच्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येक भक्ताला ते अप्रत्यक्ष रूपाने मदत करत असतात. कुठल्याही कामासाठी ते पाठीशी असतात. संकटसमयी त्यांचा धावा केला की ते मदतीला येतातच. आता तुम्हीच पहा की मला त्यांचा अनुभव कसा आला. मी "श्री साईलीला" मासिकाच्या ५ व्या लेखक-कवी संमेलनात भाग घेण्यासाठी शिरडीला गेलो. श्री साईबाबांचे दर्शन केले. संमेलनाला २-४ दिवस उशीर होता म्हणून सहज मुंबईला फिरायला गेलो. व्ही. टी. स्टेशनच्या बाहेर फिरत असताना...अचानक माझ्या पॅन्टीमध्ये काही तरी शिरले. काहीतरी म्हणजे तो

नक्कीच एकादा प्राणी असावा. क्षणभर मी एकदम घाबरून गेलो. काय शिरले याचा अंदाज लागायला काही वेळच मिळाला नाही. विंचू, खेकडा काहीतरी असेल असे मला वाटले. मलाच काय माझ्या जागी कोणीही असता तर नक्कीच तो घाबरला असता. क्षणभरात तो प्राणी वळवळ करू लागला. मला तर काय करावे आणि काय नाही, हे थोडा वेळ सुचलेच नाही. ज्या जागी वळवळ होत होती, ती जागा मी घट्ट दाबून ठेवली. दुसऱ्या हातातला कॅमेरा खाली ठेवला आणि श्रीसाईबाबांचे नाव घेऊन पॅन्टीमध्ये हात घातला. तुम्हाला आश्चर्य वाटेल की पॅन्टीमधून चांगला एक फुटाचा सरडा ( गिरगिट ) हाती लागला. हातांनी त्याला दूर सारले पण तो पुन्हा पँटीवर चिकटूनच बसला. इतक्या वेळात रस्त्यावर थोडी फार माणसे एकत्र झाली होती. दोन तीन वेळा हातानी त्या सरड्याला झटकारले तेव्हा कुठे तो जवळच्या बगीच्यांमध्ये पळाला. आता कुठे जीवात जीव आला होता.

तब्बल दोन मिनिटे पँटीत सरडा असल्यावरही मला कशाची इजा झाली नाही. ही साईकृपाच म्हणावी लागेल. दोन तीन दिवसांनी पुन्हा शिरडीला परत जायचे होते कारण लेखक-कवींचे संमेलनास हजर रहायचे होते. जर काही कमीजास्त झाले असते तर संमेलन एकीकडे राहिले असते आणि आम्ही डॉक्टरांचेकडे चकरा लावीत बसलो असतो! इंदूरहून आलो आणि मुंबईत अटकलो अशी गोष्ट झाली असती.

पण म्हणतात ना ' देव तारी त्याला कोण मारी ' खरी गोष्ट आहे. श्रीसाईंचे स्मरण करताच संकटे दूर होतात यात दुमत नाही.

# श्रीसाईकृपेची प्रचिती

—श्री. उज्ज्वल वामनराव कुळकर्णी
८९६/१ तांबोळी गल्ली, नंदुरबार, जि. धुळे

● भोपाळला राहणारी माझी मावस बहिण आणि तिचे पती लग्नानंतर प्रथमच म्हणजे जवळ जवळ ४० वर्षानंतर आमच्याकडे आले दोघानाहि आनंद झाला. गप्पा गोष्टीत पहिला दिवस कसा गेला कुणास ठाऊक. दुसऱ्या दिवशी कुठे कुठे जायचे विचार झाला. खूप भरगच्च कार्यक्रम आखला. गावातील सारी देवस्थाने, प्रेक्षणीय स्थळे याबरोबर शेतीवर पण जायचे ठरले. सारा कार्यक्रम व्यवस्थित ठरला, आणि रात्री मेहुणे झोपले. मध्यरात्री ते उठले व थंडी वाजते आहे असे सांगू लागले. घरात असलेल्या गोळ्या घेऊन त्यांनी झोपायचा प्रयत्न केला पण झोप येईना आणि जास्त त्रास होऊ लागला. तशातच लघवी अडकली.

सकाळी डॉक्टरांना बोलावले त्यांनी औषधे व इंजेक्शन दिले. दुपारपर्यंत थोडे तरी बरे वाटेल असे वाटले पण त्रास वाढला आणि लघवी मुळीच न झाल्याने त्यांचा जीव घाबरा होऊ लागला. डॉक्टरांनी त्यांना हॉस्पीटलमध्ये नेण्याचा सल्ला दिला. हॉस्पीटलमध्ये लघवी काढली तेव्हा थोडे बरे वाटले. तेव्हा मेहुण्यांनी-'साई कृपेने बरे वाटेलच' असे सांगितले. शिरडीला श्रीसाईचे दर्शन घेऊनच ते इथे आले होते. पण देवाच्या मनात काय होते कुणास ठाऊक. त्यांना जास्तच त्रास होऊ लागला. लघवी थोडीशीच व्हायची. नळीचा त्रास. सारेच हवालदिल झाले. वहिणीची मनस्थिती तर फारच बिघडली. डॉक्टरांनी मोठया हॉस्पीटलात जाण्याचा सल्ला दिला व 'कदाचित ऑपरेशन करावे लागेल' असे सांगितले. मेहुणे मूळचे नागपूरचे असल्याने नागपूरलाच जायचे ठरले पण रिझर्व्हेशन केलेले नाही. त्यामुळे जागा मिळते की नाही ही शंका होती, आणि काय आश्चर्य स्टेशनवर जाताच रिझर्व्हेशनच्या डब्यात तपास केला असता जागा नाही हेच उत्तर. परंतु एका गुजराथी कुटुंबास काय वाटले कुणास ठाऊक त्यांनी "आम्ही शेजारच्या किंवा दुसऱ्या डब्यात सोय करून घेऊ पण तुम्ही आमचा बर्थ व दोन सीट घ्याच"चा आग्रह केला, आणि उठून त्यांनी जागा रिकामी केली व स्वतः सामान आणावयास सुरवात केली. मेहुण्यांचे शब्द मला परत आठवू लागले. आश्चर्यजनक असाच हा अनुभव होता, आणि त्यांना चांगली जागा मिळाली. वेळोवेळी तो माणूस येऊन विचारपूस करी.

गाडी नागपूरला पोहचली आणि मेहुण्यांना फारच त्रास होऊ लागला. मावस बहीण फार घाबरली आणि बरोबरची मंडळी देखील घाबरली. त्यांना ताबडतोब मेडिकल हॉस्पीटलमध्ये नेण्यात आले. तेथील डॉक्टरांनी तपासणी केली. लघवी काढण्यासाठी उपचार झाले. नळीने लघवी काढली तेव्हा त्यांना थोडे बरे वाटले. आणि लगेच ते बोलले 'साईकृपेने मला बरे वाटेल काळजी करू नका' परंतु नळी जास्त दिवस ठेवणेही धोक्याचे होते. डॉक्टरांनी एक्सरे काढून नीट निदान करावयाचे ठरविले. परंतु त्याच रात्री त्यांना फार त्रास होऊ लागला. सारखे उठायचे बसायचे लघवी न होता सारखे कण्हायचे सारे घाबरले. कुणाचाच जीव थाऱ्यावर नव्हता. मावस बहिणीने साईची आराधना सुरु केली. "त्राता तूंच" हीच तिची भावना. स्वतः त्यांचीहि साईवर अढळ निष्ठा आणि काय आश्चर्य सकाळी डॉक्टरांनी इंजेक्शने दिलीत व दुपार पासून त्यांना आराम पडू लागला. दोन दिवसात आग व्हायची बंद झाली आणि लघवीसाठी नळी वापरावयाचे बंद केले. आठ दिवसात ते पूर्ण बरे झाले आणि सपत्नीक भोपाळला रवाना झाले. त्यांच्या पत्रात त्यांनी एकच वाक्य लिहिले की, 'श्रीसाईकृपेने माझा पुनर्जन्म झाला.' त्यांची श्रीसाईवरची अढळ निष्ठा पाहूनच श्रीसाईंनी त्यांना आपल्या कृपाप्रसादाने बरे केले. साईभक्ताचा हा जिवंत अनुभव श्रीसाईकृपेची प्रचिती देणाराच आहे. जिथे श्रद्धा आहे तिथे श्री साईंचा संचार आहे एवढे मात्र खरे.

# हरवलेले लॉकेट पुन्हा मिळाले

–सौ. प्रभाताई मुळये, इंदूर

● माझे नाव सौ. सरोजिनी मुळये. मला सर्व प्रभाताई या नावानेच ओळखतात. माझे वय ६८ वर्षाचे आहे.

माझे वडील कै. लक्ष्मण गणेश महाजनी त्यांना सर्व काका या नावाने ओळखत असत. ते श्री साईबाबांचे त्या कालचे परम भक्त होते. त्या काली भक्त-मंडलीचा फार मोठा परिवार नव्हता. तेव्हा मी लहान होते म्हणून जी भक्त-मंडली आठवतात त्यांची नावे

सॉलिसिटर दिक्षीत, रा. गोविंदराव दाभोलकर सांताक्रूझचे रावबहाद्दूर प्रधान इंदूरचे जस्टीस रेगे, माधवराव देशपांडे, गोपाळराव बुट्टी, संत श्री दासगणू महाराज, गोरक्षकर वगैरे मंडळी

प्रत्येक उत्सवाला ही सर्व मंडळी शिर्डीला जमत असत. एकदा राम नवमीला मी व माझी आई राम मंदीरात राम जन्माला गेलो असताना श्री साईबाबा पुण्याला त्याच वेळेला आमचे घरी येऊन गेले व घराला कुलुप दिसले तेव्हा ते वडिलांना म्हणाले की तुझ्या घरी जाऊन आलो पण घरात कोणी नव्हते. मग वडील आल्यावर त्यांनी आम्हाला ही गोष्ट सांगितली अशा अदृश्यपणाने ते फिरत असत.

मी लहान असताना शिर्डीला खूप वेळा गेले. मी गेले की ते मला मांडीवर बसवून घ्यावयाचे, व मला मैना म्हणावयाचे. ते अगदी चांगले आठवतात. ते नेहमी वडिलांना म्हणावयाचे मुलगी परक्याचे धन आहे.

पुढे १९२९ मध्ये माझे लग्न झाले. इंदूरचे प्रसिद्ध मुळये घराणे तेच माझे सासर.

मला लग्नामध्ये एका साईभक्ताने सोन्याचे लांबट–आकाराचे लॉकेट बक्षीस दिले. त्यावर त्यांची ( साईबाबांची ) मूर्ती कोरलेली होती. पुष्कळ दिवस म्हणजे पुष्कळ वर्षे ते लॉकेट मजजवळ दागिन्यांच्या पेटीत ठेवलेले होते. तेव्हा माझ्या मनात आले की हे असेच पडून राहण्यापेक्षा ह्या सोन्याचा उपयोग आपल्या बांग- ड्यात केला तर श्री साईबाबांचे सोने रात्रंदिवस आपल्या अंगावर राहील ही भावना. म्हणून सोनाराकडे बांगड्या करावयाच्या होत्या त्यातच भर घालण्यासाठी त्याला दिले. ही माझी मोठी चूक झाली असे मला मागाहून वाटले. पुढे त्या सोनाराने एका साईभक्ताने खूप गळ घातल्यामुळे ते मला न विचारता विकले. मी त्याला खूप रागावले पण मागाहून काही उपयोग नाही. ते गृहस्थ लॉकेट घेऊन गेले. पण त्याचा चमत्कार पुढे आमच्या प्रत्ययाला आला.

माझे पती श्री. भास्कर विनायक मुळये हे होळकर स्टेट सर्व्हीस इंदूर येथे एज्युकेशनल सेक्रेटरीच्या जागेवर काम करीत होते. लॉकेट गेल्यानंतर एक दोन दिवसातच चमत्कार घडला.

ते ऑफीसमध्ये गेले व गेल्यावर त्यांनी टेबलाचा खण उघडला तर समोर त्यांना सोन्याचे गोल आकाराचे लॉकेट श्रीसाईबाबांचा तसाच फोटो असलेला व मागे मारुतीची मूर्ती कोरलेली असे दिसले.

त्यांनी शिपायाला विचारले की हे कोणी ठेवले तर तो म्हणाला मला माहित नाही. तेव्हा माझ्या यजमानानी आदले दिवशी जितके लोक ऑफीसमध्ये येऊन गेले त्यांना बोलाऊन विचारले. परंतु कोणीही म्हणेना की हे माझे आहे. ही गोष्ट १९४५ साली घडली. माझे यजमान फार पूर्वीपासून मारुतीचे उपासक आहेत. म्हणून मागे मारुतीची मूर्ती असलेले त्यांना लॉकेट मिळाले.

संध्याकाळी घरी आल्यावर त्यांनी ते दाखविले तेव्हा लॉकेट आपल्या चुकीमुळे गेले ह्याचे अत्यंत दुःख झाले होते व हळहळ वाटत होती. म्हणून श्रीसाईबाबांनी ते माझे घरी परत पाठविले अशी मी समजूत करून घेतली व तेव्हापासून त्याची आमचे घरी रोज पूजा होते. असे अनेक चमत्कार बाबांनी करून दाखविले. ह्या लॉकेटमुळे तर मन अगदी थक्क होऊन गेले आहे.

●

# श्रीबाबांची मुद्रा

—श्री. ग. दे. कुलकर्णी,
कुलदीप तांबरी, उस्मानाबाद

● श्रीबाबांची सबुरी उराशी कवटाळून मी जन्माला आलो. तेव्हापासून आजवर प्रत्येक बाबीत श्रीबाबांच्या सबुरीनेच माझी साथ केलेली आहे. इतर बाकी तर सोडाच पण प्रत्यक्ष श्रीबाबांची मुद्राही सबुरीने आमच्या घरी आली.

फेब्रुवारी ८० मध्ये संमेलनासाठी शिर्डीला गेलो होतो. त्यावेळी संस्थानातर्फे श्रीबाबांची चांदीची मुद्रा घ्यावीशी वाटली. त्यानंतर नेमका कोणता विचार मनात आला हे आता नक्की आठवत नाही. पण ती मुद्रा घेतली नाही.

जून ८० मधे एके दिवशी श्रीबाबांचा मुद्रांकीत प्लॅस्टीकचा ताबीत रस्त्यात सापडला त्या दिवसापासून ती चांदीची मुद्रा आपल्या घरी असावी ही इच्छा बळावली.

२९ जून ८० रोजी आमचे घरमालक शिर्डीला गेले. त्यांच्या जवळ रु. २६-५० पैसे देऊन ती मुद्रा आणि प्रसाद आणण्याची विनंती केली. तो कुठे व केव्हा मिळतो हे पण सांगितले. तेही शिर्डीला यापूर्वी दोनदा गेलेले होते. ते एका निमशासकीय कार्यालयात जबाबदारीच्या जागेवर आहेत.

३० जून ८० रोजी ते परतले. ५० पैशाचा चुरमुऱ्याचा प्रसाद आणि रु ११।- ची मंदीराजवळच्या खाजगी दुकानातील श्रीबाबांची एक मुद्रा माझ्या हातावर त्यांनी ठेवली. मला हवी होती संस्थानातील मुद्रा. काहीही न बोलण्याच्या स्थितीत मी होतो. आजच्या आज श्रीबाबांनी ह्या मुद्रेची प्रचिती दाखविली नाही तर ती विकून टाकायची असे मी ठरविले.

त्यानंतर एक तासात पोस्टाकडून माझ्या पत्नीच्या नावाने एक रजिस्टर्ड लखोटा आला. तिच्या बचत खाते क्र. ११६-३५१ ला नुकत्याच झालेल्या बक्षीसाच्या सोडवणूकीत रु. ५०/- चे बक्षीस लागल्याचे ते पत्र होते. श्रीबाबांनी प्रचिती दिली. काहीही न बोलण्याच्या स्थितीत श्रीबाबांना जे काही बोललो होतो त्याबद्दल क्षमा मागितली.

असे बाबा आणि अशी त्यांची सबुरी पण तिने माझी आमरण साथ करायला नको का! कारण पूर्णतः निराश झाल्यावर लाभलेल्या गोष्टीतून हवे तसे सुख समाधान, किंवा आनंद मिळत नाही. किमान मरताना तरी श्रीबाबांच्या सबुरीने मरणाच्या दारातून मला मागे ओढू नये.

---

## निवेदन

# श्रीसाईबाबा डिव्होटीज क्लब

प्रमोटर्स, साईबाबा डिव्होटीज क्लब (संकल्पित) पोस्ट बॉक्स नं. १६४७८, मुंबई ४०००१६ या नावाने वर्तमान पत्रातून प्रसिद्ध झालेली क्लबची योजना व सभासद प्रवेश फी १०००रु भरून सभासदत्वासाठी केलेले आवाहन याबाबतची योजना श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांची नसून त्या योजनेशी संस्थानचा काहीही संबंध नाही.

# श्री बाबांची कृपा

सौ. उषा प्रभाकर अधिकारी
सावित्री सदन, बंदर रोड, रत्नागिरी

● गेल्या दिवाळी सुटीत घरातील सर्व मंडळींनी श्री. अधिकारी आणि आमच्या तीन कन्या शिरडी शेगाव यात्रा करून यावयाचे ठरविले. ३ नोव्हेंबरला आम्ही येथून निघालो तो ४ तारखेला दुपारी १ वाजता शिरडीस सुखरूप पोचलो. शिरडी हे सर्व तीर्थक्षेत्रे एकवटलेले एकमेव स्थान. सुटीचे दिवस. सहाजिकच गर्दी फार. गेल्या बरोबर खोली मिळाली नाही. कॉमन हॉलमध्ये पथाऱ्या पसरल्या. जेवणाच्या रांगेत ही नंबर लागला नाही. दुसरीकडे जेऊन रांगेत ( जागेसाठी ) मी उभी राहिले. एवढ्यात ह्यांच्या एस. टी. डिपार्टमेंटचे एक इन्स्पेक्टर श्री. रानडे सपत्नीक तेथे आलेले ह्यांना भेटले. ती विलक्षण गर्दी पाहून नुसते दर्शन घेऊन ती दोघे व्यथित अंतः करणाने परत निघाली होती. मी बाबांची प्रार्थना केली की बाबा मला कुठल्याही इमारतीत जागा मिळू दे आम्ही ह्या जोडप्याला आमच्यात सामावून घेऊ, आणि काय आश्चर्य ! आम्हाला शांती निवास मध्ये जागा मिळाली. ह्या एवढ्यागर्दीत आमचा नंबर कसा काय लागला हे आम्हाला व रानड्यांना कोडेच वाटले पण खोली मिळाली या आनंदात सर्वजणानी खोलीत सामान नेऊन टाकले. थोडा वेळ विश्रांती घेतली. संध्याकाळची आरती आटोपून भोजनगृहात नंबर लावला आणि शेजारती आटोपून बाहेर पडलो. रानडेमंडळी अगदीच नवीन असल्याने आरत्यांचे सोहळे पाहून खूष झाली. दुसऱ्या दिवशी हे व रानडे यांनी सत्यनारायण आणि अभिषेकाची तिकीटे काढून आणली. आम्ही काकडआरतीला गेलो श्रीबाबांचे स्नान आटोपल्यावर समाधीवर चढून बाबांचे दर्शन घेता येते. मी सौ. रानडे, माझ्या मुली गर्दीतून तशा पुढे जाऊन मनासारखे दर्शन घेतले तीर्थही घेतले. त्यात श्री. अधिकारी व रानडे यांना समाधीवर चढता आले नाही. ते आधीच मंदिरातून बाहेर गेले होते. आम्ही मंदिरातून बाहेर येताच त्यांना विचारले तेव्हा वरील प्रकार कळला. मला फार वाईट वाटले. पहाटेपासून उठून माणसे ज्यासाठी जीव टाकतात तेच नेमके ह्यांना व रानड्यांना साधले नाही. याचे मनात शल्य निर्माण झाले. त्यानंतर अभिषेक सुरू झाले पण आमचा नंबर खूपच लांबचा होता. आम्ही बाहेर बसून होतो.

इतक्यात सत्यनारायणाची वेळ झाल्याचे कळले. तो नंबर पहिल्या बॅचमध्ये असल्याने आम्ही चटकन तिकडे गेलो व उपाध्याय सांगतील तसे बसलो. पूजा आटोपली. १०८ बाबांची नावे म्हणून झाली. उपाध्याय म्हणाले, ' आता स्वतः- भोवती प्रदक्षिणा घाला आणि आपल्या आराध्य दैवताचे स्मरण करून त्याला नमस्कार करा.' मी उभी राहिले आणि सहज समोर पाहिले तो आमच्या दोघांच्या बरोबर समोर बाबांची हसतमुख छबी. माझे आराध्य दैवत माझ्या अगदी समोर असेल असे यावेळेपर्यंत माझ्या मनातसुद्धा नव्हते. मी प्रदक्षिणेला वळले तो माझ्या पाठीमागे बाबांची तशीच दुसरी छबी. माझ्या डोळयात आनंदाश्रु घळघळू लागले. मी तुझ्या पाठीपुढे उभा आहे याची प्रचिती बाबांनी आणून दिली. पूजा संपून खाली खोलीत आले तो अभिषेक संपून माध्यान्ह आरती सुरू झाली होती. मी सर्व साहित्य बाजूला ठेऊन आरतीत सामील झाले. आणि बाबांकडे पाहू लागले. यापूर्वी माझ्या तीन खेपा शिरडीस झाल्या होत्या. पण इतक्या जवळून मला बाबांकडे पहाण्याची संधी मिळाली नव्हती. आज बाबांच्या अंगावर जरीचे बुट्टे असलेले हिरवेगार वस्त्र होते, आणि धवधवीत हार त्यावर शोभून दिसत होता. श्रीबाबांच्या चेहऱ्यावर इतके विलक्षण तेज दिसत होते की, ती मूर्ती सजीव वाटत होती. किती- तरी लोक भराभर फोटो काढून घेत होते. मला त्यांचा त्यावेळी हेवा वाटला. या रूपातला फोटो माझ्याकडेही असावा असे मला वाटले. पण फोटोग्राफी आपल्याला येत नाही तेव्हा आपल्या हृदयातच ही मूर्ती आपण ठसवून घेऊ या. या विचाराने मी पुन्हा पुन्हा त्यांच्याकडे पहात राहिले. आरती संपून आम्ही खोलीवर गेलो. पुन्हा जेवणघरात जेवलो. रात्रीच्या दोन्ही आरत्यांना हजर राहिलो तरी दुपारचे ते तेजस्वी रूप माझ्या मनातून जात नव्हते. अभिषेक झाला नाही हा विषाद मनात घेऊन दुसऱ्या दिवशी श्रीबाबांचा निरोप घेऊन शेगावला गेलो. मोठा प्रवास असुनही श्रीबाबांच्या कृपेने तो सुलभ झाला. आम्ही व रानडे कंपनी दोन दिवस शेगावला राहिलो. तिथे मात्र अभिषेक, महाप्रसाद सर्व व्यवस्थित झाले अर्थात हीही श्री बाबांचीच कृपा.

मी एकदा शिरडीला गेले की काय करू नि काय नको असे होते. शिरडी सोडून इकडे येऊच नये असे वाटते. शेगावाहून आनंदीत मनाने आम्ही निघालो तेव्हा माझ्या पुन्हा मनात आले की चारवेळा आपण शिरडीस आलो पण बाबांच्या पालखीचा सोहळा आपणास पहावयास मिळाला नाही, हा माझ्या मनातील विचार बाबांनी जाणला आणि शेगावहून पुन्हा आम्ही शिरडीला आलो. ८ तारखेला रात्री ८ ला संस्थानमधे शिरलो. सगळया जागा भरलेल्या. भक्तनिवासच्या व्हरांड्यात

आम्ही मुक्काम केला. पहाटेस एक गृहस्थ श्री. सामंत आमचेकडे येऊन म्हणाले अभिषेकाची २ कूपन्स आहेत घेता का ? लगेच ती आम्ही घेतली आणि त्यावेळी श्रीबाबांवर अभिषेक होऊन श्री. अधिकारींना श्रीबाबांना हार घालण्याचे भाग्य मिळाले. आधीच्या वेळचा राहिलेला अभिषेक अज्ञातऱ्हेने पुरा करून घेऊन अधिकारींना समाधीची पायरी चढायला मिळाली नाही ही माझ्या मनातील रुखरुख नाहीशी करवली. त्याच दिवशी म्हणजे गुरुवारी सकाळी अभिषेक आटपून मी व अधिकारी गुरुपादुकास्थानात आलो तेव्हा तिथली खोली रिकामी करुन एक गृहस्थ निघाले होते. शिरडीला ४ वेळा येऊन याठिकाणी आम्हाला रहावयास मिळाले नव्हते. मी चटकन् कार्यालयात जाऊन सदर खोली रिकामी झाली असून मी रात्रीपासून नंबर लावला आहे माझे बरोबर माझ्या मोठ्या मुली आहेत तेव्हा ती खोली मला द्या अशी विनंती केली ती मान्य झाली आणि बाबांच्या गुरुपादुकास्थानात मला चांगले २।३ दिवस राहायला मिळाले. आम्ही सगळीकडे मनासारखे फिरुन घेऊन शिरडीहून रत्नागिरीला आलो.

येथे आल्यानंतर सुद्धा मला बाबांच्या त्या विलक्षण तेजस्वी मूर्तीची वारंवार आठवण होई व तसे कुणी कॅलेंडर काढले तर आपण ते विकतही घेऊ असे मनाशी ठरविले. त्यानंतर माझी धाकटी मुलगी बंगलोरला ट्रिपला गेली असता श्रीबाबांसाठी चंदनी हार आण असे मी तिला सांगितले होते पण ती विसरली. त्याही वेळी मला फार वाईट वाटले पण काय करणार ?

या गोष्टीला ८ दिवस झाले. दुपारी माझी एक विद्यार्थिनी माझेकडे आली तिला इ० ७ वी ची स्कॉलरशिप मिळाली होती. दरवर्षी २५० प्रमाणे तीन वर्षे पैसे मिळणार होते. ती सर्वांना पेढे घेऊन आली ते तिने वाटले आणि हातातला खोका उघडून म्हणाली, "बाई, हा हार कसा काय आहे ?" खोक्यात चंदनी फुलांचा हा हार होता. मी म्हटले, "चांगला आहे. कुठे घेतलास ?" ती म्हणाली, "अहो माझे बहिणीचे यजमान बेंगलोरला गेले होते त्यांनी आणला. मी तो खास तुमच्यासाठी आणला आहे. सदर मुलीजवळ मी चंदनी हाराबद्दल कधीच बोलले नव्हते. श्रीबाबांनी ही माझी इच्छा पूर्ण केली. पण मला बैचेन करणाऱ्या त्या तेजस्वी मूर्तीच्या फोटोचे अगर कॅलेंडरचे काय ? दुसऱ्या की तिसऱ्या दिवशी माझी मोठी मुलगी तिच्या बँकेतल्या एका गृहस्थाकडे (तोही माझा पूर्वीचा विद्यार्थीच आहे) चहाला म्हणून गेली. त्यांचेकडे चहापाणी गप्पा गोष्टी झाल्या आणि ती घरी यावयास निघाली तेव्हा एका कॅलेंडरची गुंडाळी तिच्या हातात देऊन तो म्हणाला

की हे बाईंना नेऊन दे. मुलीने ते घरी आणले पण तिने तिथे किंवा घरीही ते उघडून बघितले नाही. मला राहावेना मी ते चटकन् उघडले आणि काय आश्चर्य! मी शिरडीला पाहिलेले बाबांचे तेजस्वी रुपडे त्या दिवशीच्या हिरव्यावस्त्रात आणि घवघवीत हारात आशीर्वाद देत माझ्या पुढ्यात होते. मला आनंदाचा गहिवर आला, किती विलक्षण तऱ्हेने हा फोटो आणि हार मला मिळवून दिले होते बाबांनी! मी लगेच तो फोटो फ्रेम करून आणला आहे. त्याला तो हार घातला आहे. माझ्या मनाची अस्वस्थता आता संपली आहे. तो सच्चिदानंद सद्गुरु दयाघन श्रीसाईनाथ माझ्या कुटुंबियांना दिलासा, धीर, प्रेम सर्व काही देत आहे.

▲

# तूच करता आणि करविता....

—श्री. किशोर गोविन्दराव सूर्यवंशी
मु. पो. इंगे, ता. पारनेर,
जि. अहमदनगर पिन ४१४३०१

पाहोनिया भक्तभाव । कैसे साई महानुभाव
दावित भक्तास एक एक अनुभव । वाढवित वैभव भक्तिचे ॥१३९॥
वाटेल तैसा वेष होती । मानेल तेथे प्रकट होती ।
भक्त कल्याणार्थ कुठेही फिरती । शिष्य भावार्थी पाहिजे ॥१४०॥

या ओळींची प्रचिती अनेक साईभक्तांना आलेली आहे यापुढेही येत राहील. फेब्रुवारी ७९ ला भारतीय नौदलाची जाहिरात प्रसिद्ध झाली. पात्रता एस. एस. सी पास होती. आमचे धाकटे बंधू त्याच वर्षी मॅट्रीक पास झाले होते. अहमदनगर येथे मेडिकल परीक्षा झाली. तिच्यात आमचे बंधू पास झाले. ३५० पैकी ३१ विद्यार्थी या परीक्षेत पास झाले. नंतर २ महिन्यानी पुण्याला लेखी परीक्षा झाली त्या परीक्षेतही बाबांच्या कृपेने आमचे बंधू मेरिटमध्ये आले. यात जवळजवळ महाराष्ट्रातून ५१ विद्यार्थी मेरिटमध्ये आले. नंतर २५ जून ७९ रोजी पुन्हा मेडिकल परीक्षा झाली व फक्त १९ विद्यार्थ्यांची पूर्णपणे निवड झाली, आणि त्यामध्ये आमचे बंधू चि. शेखर यांचा समावेश होता हे ऐकून आम्हाला आश्चर्याचा धक्काच बसला.

कितीही अवघड गोष्ट असो बाबांचा कृपाशिर्वाद असल्यावर त्यात काय अशक्य. भक्त कल्याणासाठी बाबा कुठेही फिरतात फक्त-भक्त भावार्थी पाहिजे. या सर्व विद्यर्थ्यांना १८ महिन्यांच्या ट्रेनिंगसाठी विशाखापट्टणम येथे पाठविण्यात आले. सर्वांना आनंदाने निरोप दिला. तिथे ६ महिन्याचे ट्रेनिंग झाल्यानंतर आमच्या बंधूची बदली योगायोगाने सध्या मुंबई येथे झाली आहे.

या सर्व गोष्टी घडण्यास बाबाच कारणीभूत आहेत असे आम्ही मानतो.

दुसरा अनुभव म्हणजे आमचे मेव्हणे भिंगार येथे एम. ई. एस. मध्ये कामाला असतात. जून महिन्यात ते कुटुंबासहीत शिर्डीला बाबांच्या दर्शनासाठी गेले. पाण्याने पातेले भरून ते हिटरवर ठेवले होते, हिटर चालू होता, परंतु घाईत जाताना तो हिटर बंद करण्याचा राहून गेला. ही गोष्ट त्यांच्या लक्षात रस्त्यामध्ये आली. परंतु परत घरी जाणेही शक्य नव्हते. बाबांवर पूर्ण विश्वास ठेवला. संध्याकाळी दर्शन घेऊन परत घरी आले, पाहतात तो पातेल्यात जेवढे पाणी ठेवले होते ते तसेच शिल्लक होते व हिटरही लाईट गेल्यामुळे बंद झालेला होता. हे पाहून घरातील सर्वांना व शेजाऱ्यांना नवलच वाटले. कारण नेमकी त्याच दिवशी लाईट गेली व त्यामुळे होणारे संभाव्य संकट दूर झाले तो योगायोगच होय. मी तर असेच म्हणतो की या गोष्टीच्या पाठीमागे पूर्णपणे बाबांचाच कृपाशिर्वाद होता.

अशाचप्रकारे असंख्य साईभक्तांना आपल्या दैनंदिन जीवनात कळत नकळत अनेक अनुभव येतात, मात्र त्यामागे मनामध्ये श्रद्धा आणि सबुरी असायला हवी.

शेवटी असेच म्हणावे लागते.

तूच करता आणि करविता ।
शरण तुला साईनाथा ॥

# उदी दिली उलट्या बंद

—सौ. स्वाती जयकर
डहाणूकर वाडी, कांदीवली (प.)
मुंबई ६७.

● प्रत्येक देवाची भक्ती मनोभावे करावी. परंतु मनःशांती, समाधान मिळावे केवळ साईभक्तीनेच. निरनिराळे अनुभव घ्यावे साईभक्तीनेच. खरोखरच साईभक्तीचा अनुभव काही वेगळाच आहे. मला पदोपदी त्याचा अनुभव येतो. माझा छोटा मुलगा एकदा आजारी होता. पुष्कळ ताप व सतत उलट्या. ताप एकाकी भरलेला. रात्री ८ पासून उलट्यांना सुरवात झाली. लगेच धावाधाव करून मी डॉक्टरांकडे गेले व औषध आणले. उलट्या थांबण्यासाठी त्यांनी औषध दिले. परंतु उलट्या थांबेनात. त्याचे वडील १० वाजेपर्यंत ३–४ वेळा डॉक्टरांकडे गेले. मी तर त्याला मांडीवर घेऊन बसले होते. जवळ टब ठेवले होते. त्याच्या पोटात पाणी सुद्धा रहात नव्हते. शेवटी १० वाजता डॉक्टर म्हणाले की आता जर त्याच्या उलट्या थांबल्या नाहीत तर हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करावे लागेल. मला तर रडूच येऊ लागले. शेवटी मनाचा हिय्या केला व त्याला त्याच्या वडिलांच्या मांडीवर झोपवले. उलट्या सुरु होत्याच. साईबाबांची उदी एका वाटीत थोड्या पाण्यात घातली व बाबांच्या पुढे उभे राहून सांगितले की आता तुम्हीच मला तारणार. काही झाले तरी त्याच्या उलट्या बंद झाल्याच पाहिजेत. हे तीर्थ मी त्याला देतेय, आणि ती वाटी बाबांच्या फोटोला लावून मी ते तीर्थ थेंब थेंब करून बारा वाजेपर्यंत त्याच्या तोंडात टाकले. कारण त्याला पाण्याची तहान तर लागत होती, व पोटात पाणी तर रहात नव्हते. आणि खरोखरच माझ्या पाठीशी बाबा धाऊन आले. खरोखरच ते अर्धे वाटी तीर्थ त्याच्या पोटाबाहेर पडले नाही. उलट्या थांबल्या आणि मला बाबांच्या भक्तीचा, उदीचा पूर्ण अनुभव आला. अशा कितीतरी वेळा बाबा माझ्या पाठीशी उभे रहातात. कितीही अडचणी येवोत, आजारपणे येवोत केवळ बाबांच्या भक्तीने मी त्यातून तरुन जाते. खरोखरच बाबांचा महिमा हा अगाध आहे.

# साईची कृपा

-श्री. पां. बा. भुतकर
२३।१६७५, अभ्युदयनगर, मुं. ३३

● माझा मुलगा चि. किरण हा १० वीला बसणार होता त्यावेळची गोष्ट. कोणत्याही ठिकाणी उदा. नोकरी, कॉलेज वगैरे ठिकाणी एस. एस. सी. चे गुण विचारात घेत असल्यामुळे आम्ही त्याला अभ्यासाव्यतिरिक्त इतर कामे सांगण्याचे कटाक्षाने टाळण्याचे ठरविले. त्याप्रमाणे आम्ही त्याला ऑगस्ट महिन्यात संपूर्ण वेळ दिला.

आमच्या घरी गणपती गौरी असल्यामुळे गणपतीची तयारी करण्याकरिता व तद्नुषंगाने येणाऱ्या इतर कामासाठी घरात तोच एक मोठा मुलगा असल्याने त्याला थोडेफार काम करावे लागणे अपरिहार्य होते. त्याला त्यावेळी मी असेही सांगितले की गणपती विसर्जनानंतर मात्र मी तुला कोणतेही घरकाम सांगणार नाही. तुला सर्व वेळ अभ्यासाकरिता वापरता येईल.

यानंतर अनंतचतुर्दशीपर्यंत सर्व वेळ गडबडीत गेला. अनंत चतुर्दशीच्याच दिवशी माझी सौ. पाय घसरून मोरीत पडली. तिच्या हाताचे हाड थोडेसे मोडले. डॉक्टरानी सांगितले की हाडाचा मोडलेला तुकडा ऑपरेशन करून बाहेर काढावा लागेल. ऑपरेशन व्यवस्थित रितीने साईकृपेने पार पडले पण जवळजवळ दोन महिने हात प्लॅस्टरमध्ये ठेवावा लागला.

या अवधीत घरातील सौ. ची सर्व कामे वाढल्यामुळे चि. किरण यास अभ्यासास मुळीच वेळ मिळाला नाही. ऐन महत्त्वाच्या वर्षी त्याचा अभ्यास आमच्या व त्याच्या मनाविरुद्ध दैवगतीने बुडाला !

डिसेंबर महिना उजाडला ! त्याला अभ्यासाकरिता जेमतेम दोन तीन महिने उरले. त्याने श्री साईंचे स्मरण करून अभ्यासास सुरुवात केली. परिक्षा सुरू झाली व पेपर चांगले गेले.

१६ जुलै १९७९ रोजी एस. एस. सी. चा निकाल लागला व चि. किरण हा डिस्टींगशन क्लासमध्ये पास झाला. त्याला ७८% गुण पडले होते. लगेच त्याने

स्वतःच्या पैशामधून हार आणून घरातील साईबाबांच्या तसबिरीला घातला. आम्ही दर गुरुवारी बाबांच्या तसबिरीला हार घालतो पण त्या दिवशी बुधवार असूनसुद्धा आनंदाप्रित्यर्थ हार व पेढे आणून बाबांविषयी वाटणारी श्रद्धा त्याने प्रगट केली.

आमच्या सर्व कुटुंबावर आजतागायत श्री बाबांची कृपा असून पुष्कळ अडी-अडचणीत त्यांनी आम्हास निरनिराळया रूपात मदत केली आहे. त्यांचे कृपाछत्र यापुढेही आमच्यावर नित्य राहो हीच साईचरणी नम्र प्रार्थना !

# श्रीसाई परिवार – वृत्तविशेष

—श्री. क. हि. काकरे न्यायालय धारक श्रीसाईबाबा संस्थान शिरडी यांनी गिरगाव मुंबईतील श्रीसाईधाम या प्रसिद्ध संस्थेला भेट देऊन समाधान व्यक्त केले.

—मशिदीत प्रगटला परमेश्वर, या सुप्रसिद्द साई कादंबरीचे इंग्रजीत रुपांतर दि मिशन डिव्हाईन, असे करण्यात आले आहे. ते रुपांतर मराठीतूनच ती कादंबरी लिहिणारे लेखक श्री. र. शं. जुन्नरकर यांनी केले असून ही आंग्ल कादंबरी रविवार ता. १९-१०-८० रोजी दसऱ्याच्या दिवशी डॉ.श्री.दि. परचुरे यांच्या शुभहस्ते दादर साईनिकेतन येथे प्रकाशित करण्यात आली. या समारंभापूर्वी सौ. कमलाबाई जोशी यांचे त्याच टिकाणी कीर्तन झाले.

—श्री. साईलीलाचे एक लेखक श्री. एन. जी परुळेकर यांचे चिरंजीव श्री. विवेकानंद यांना अमेरिकेच्या टेक्सास संस्थानाच्या ह्युस्टन येथील राईस विद्यापीठाने वार्षिक दहाहजार शंभर डॉलर्सची फेलोशिप दिली असून ते ' थर्मोडायनामिक्स ' या विषयामध्ये संशोधन करण्यासाठी म्हणून १४-८-१९८० रोजी अमेरिकेस रवाना झाले आहेत त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन.

—साईभक्त श्री. एस. पी. कोरगावकर (कै.डी.पी. कोरगावकर संगीत दिग्दर्शक यांचे थाकटे बंधू ) यांचे बंधू नाशिक येथे हृदयविकाराच्या झटक्याने गेल्या महिन्यात अचानकपणे श्रीसाईचरणी विलीन झाले.

—श्री. साईनाथमंदिर, ट्रस्ट वरळी ( श्री. मोहितेबाबांचे श्रीसाई मंदिर ) येथे श्रीबाबांचा ६२ वा पुण्यातिथी महोत्सव १९-१०-८० ते २१-१०-८० पर्यंत थाटात साजरा करण्यात आला. महाअभिषेक, महिलांसाठी हळदीकुंकू भजन, किर्तन, प्रवचन असे भरगच्च कार्यक्रम तीन दिवस योजण्यात आले होते.

—श्रीसाईभक्त मंडळ, ग्वाल्हेर येथे बाबांची ६२ वी पुण्यतिथी उत्साहाने साजरी करण्यात आली. मुख्य अतिथी डॉ. ईश्वरदास, आयुक्त ग्वाल्हेर संभाग हे होते.

# बिस्कीट खाणारा माझा राजू ( साईकृष्ण ) आणि गंगामाई

—लीलाताई शंकरराव गोलतकर
अभंग बिल्डींग न्यू परेल व्हीलेज परळ, मुं. १२

राम कृष्ण साई यामधे भेदची नाही !
साईचरित्र ओवी

● साईबाबांशी प्रेमाने नाते जोडल्यावर ते कोणत्याही नात्याला उभे रहातात. अशी माझी खात्री आहे. मी त्याचा अनुभव घेत आहे आणि घेत रहाणार माझ्याकडे बिटकोचा भगवान गोपाळ श्रीकृष्णाचा चैतन्यमय असलेला, हातात लाडू असलेला सुंदर फोटो आहे. त्याचे नाव मी राजू ठेवलेले आहे. त्याचे माझे आई मुलाचे नाते आहे. मी त्याला मुलाप्रमाणे वागवीत असते. साक्षात् साईकृष्णच तो...तो माझी स्वतःची सर्वकामे करीत असतो. माझ्याकडे येणाऱ्या साईभक्तांचे सुद्धा त्याच्यावर जास्त प्रेम आहे, आणि तो आहेच तसा प्रेम करण्याजोगा. त्याला सर्व राजूच म्हणतात.

माझ्या इथे साईबाबांच्या दर्शनाला आल्यावर पहिल्याप्रथम माझा राजूच सर्वांचे हसून स्वागत करीत असतो. त्याला हार सुद्धा मोठ मोठे असावे लागतात. आणि त्याला ते शोभून दिसतात. हार जर नसेल त्याच्या गळयात तर मग त्याला मी, शी नागडा म्हणून चिडवते. पण तो कसला ! लगेच तो आपल्या भक्ताला हार घेऊन बोलावतो. मग मी आपली हसून गप्पच बसते. कारण मला माहितच असतात त्याच्या खोड्या, त्याला किनई बुंदीचे लाडू फार आवडतात. भक्तमंडळी त्याला बुंदीचे लाडू आणतात प्रेमाने म्हणतात राजू , आमच काम होऊ देत. आम्ही तुला बुंदीचे लाडू देऊ हं ! त्याप्रमाणे माझा साईराजू सर्वांची इच्छा परीपूर्ण करतो. त्याला "ताईचा राजू म्हणतात"

काल परवा असेच झाले. २३ जून माझ्या इथे साईबाबांच्या स्थानाचा वाढदिवस होता. १३ वे वर्ष संपून १४ वे वर्ष लागले. साईबाबांच्या मंदिरातून दरवर्षी गंगा पाझरत असते. म्हणून गंगा यावी, तिचे दर्शन घडावे म्हणून मला फार फार वाटत होते. माझे लक्ष सारखे तिकडे लागलेले होते. पण गंगा काही आली नाही...

माझे काका म्हणाले परमेश्वराचे साक्षात्कार घडीघडी घडत नसतात...पण मला ते पटले नाही. माझा हट्ट होता. गंगामाई आलीच पाहिजे. भक्त मंडळीना दर्शन घडलेच पाहिजे. मी राजूला म्हटले. राजू गंगा येऊ देहं ! मी तुला खाऊ देईन बिस्कीट, सहज बोलून गेले आणि मी माझ्या राजूशी सारखी काहीना काही दिवसभर बोलतच असते. मुलगाचना तो माझा.

आणि काय आश्चर्य २७ जून शुक्रवारी वटपौर्णिमेच्या दिवशी नेहमीप्रमाणे रात्रौ ८-३० ते ९-३० पर्यंत मी बाबांजवळ पुजेला बसले होते. पुजा झाल्यावर सहजच नमस्कार करता करता, गंगेच्या स्थानाकडे माझं लक्ष गेले. गंगामाई, पाझर लागली होती. डोळे माझे आनंदाने भरून आले. माझ्या राजूने माझी इच्छा पूर्ण केली. गंगेला बोलविले त्याने आणि खरंच आहे ते. एकनाथांच्या घरी असताना कावडीने पाणी भरायचाना तो, श्रीखंडयाच्यारूपाने गडी म्हणून. मग आता तर तो आपल्या आईकडेच आहे. काकांना म्हटले, काका, गंगामाई आली. राजूने आणली, आता त्याला बिस्कीट द्यायला पाहिजे-परंतु इतकेच की त्याच्या भक्त मंडळींचीसुद्धा इच्छा पूर्ण करायला हवी. त्यांना सुद्धा गंगेचे दर्शन घडले पाहिजे कारण ती मंडळी म्हणतात, ताई, गंगा आली. मग दर्शन घडायलाच हवे. म्हणून राजूला म्हटले राजू. आपल्या भक्तमंडळींना सर्वांनाच दर्शन घडव. त्याप्रमाणे गंगा येत आहे. काका म्हणाले कृष्णाला बिस्कीट केव्हा देणार. दे, मी आणतो. ते त्याला कृष्णच म्हणतात. मी म्हणाले एवढ्यात नको. गुरुवारी सर्वांना दर्शन होऊ दे मग शुक्रवारी देईन-पण त्याला की नाही खट्याळपणा करायच्या फार सवयी. पूर्वीपासूनच कृष्णच ना तो द्वारकेचा. लगेच त्याने आपल्या एका साई भक्ताला, त्यांचं सुद्धा भारी प्रेम त्याच्यावर. श्री अर्जुन पाटकर त्यांचे नाव त्यांना कळ लावलीच...त्यांनी अचानक राजूसाठी पारल्याची ग्लुको बिस्कीटाचा पुडा आणला. मी ते पाहिल्याबरोबर खजीलच झाले खरंच ! मी कोण देणारा त्याला बिस्कीट, करताकरविता त्याचा तोच धनी. मी राजूकडे हसत हसत पाहिले, त्याला बिस्कीटे दिली. फार आनंद वाटला मला. त्याच्या त्या करण्याचं कौतुक वाटले मला-त्याची कृष्णलीला अगाध आहे. गंगा येत आहे. आता ती गणपती येईपर्यंत अशीच पाझरत रहाणार धन्य ती गंगामाई आणि साईकृष्ण...नी साई राजू माझ्या सर्व भक्तमंडळीसह त्याला कोटीकोटी प्रणाम—

☆

# जया मनी जैसा भाव

★

—सौ. सुशिला य. शिंदे
१०८।३७७२ टिळकनगर,
चेंबूर, मुंबई ८९

● गेली ३० वर्षे मी श्रीसाईबाबांची भक्ती करते. त्यांच्या कृपेने माझा संसार ाचा चालला आहे. संसार म्हटला म्हणजे ऊनपाऊसाचा खेळ हा आलाच. त्या दोन नंबरच्या मुलाने अनेक ठिकाणी नोकरीचे अर्ज केले होते पण त्याला ाही नोकरीचे कॉल येत नव्हते त्यामुळे तो फार उदास असे. मी त्याची समजूत ात असे की असा धीर सोडू नकोस. बाबांच्या कृपेने तुला चांगलीच नोकरी ळणार. श्रद्धा आणि सबुरी हा बाबांचा संदेश विसरून जाऊ नकोस.

१७ जानेवारी ८० रोजी गुरुवार होता. त्यादिवशी माझा उपास होता. ळीच बाबांची पूजा वगैरे करून मी माझ्या नियमाप्रमाणे 'श्रीसाईसच्चरित' याय १५ वा व श्रीसाईनाथ स्तवनमंजरी यांचे वाचन झाल्यावर बाबांना कळवळून ळविले की बाबा माझ्या मुलाला चांगल्या कंपनीत लवकरात लवकर नोकरी मिळू जोपर्यंत माझ्या मुलाला नोकरी मिळत नाही तोपर्यंत मी दूध व दुधाचा कोणताच र्थ सेवन करणार नाही. जेव्हा माझा मुलगा कामावर प्रथम दिवस भरेल तेव्हाच तुमच्या प्रतिमेसमोर दुधाचा नैवेद्य दाखवून मगच मी दूध व दुधाचा पदार्थ ईन, व तुमच्या इच्छेप्रमाणे शिरडीला येऊन तुमच्या मूर्तीला दुधाची आंघोळ ईन असा नवस बोलून मी उठले आणि त्याच दिवशी संध्याकाळी माझ्या मुलाला जॉनसन ॲण्ड जॉनसन" या कंपनीचा तारेने कॉल आला. त्यात लिहिले ते २८ तारखेला कामावर या. तार वाचताना बाबांच्या प्रतिमेला हात जोडून ांगितले असेच भक्ताच्या हाकेला धावून या. बोलल्याप्रमाणे २८ जानेवारीला ागा प्रथम दिवस कामावर भरून घरी आल्यावर बाबांच्या प्रतिमेला दुधाचा द्य दाखवून मगच दूध सेवन केले. गुरुवार ता. ११ रोजी त्याला प्रमोशन लेटर बांच्या कृपेने मिळाले. अशी आहे माझी साईमाऊली भक्तांच्या हाकेला धावणारी!

●

# दीपदानाचा नवस बोलले नि बँकेत नोकरी लागली !

—कु. उज्ज्वला नाईक, बी. कॉम
११ हेलिमा मंझील, गुप्ते पथ डोंबिवली

● मी कु. उज्वला नाईक...१९७८ सालात मुंबई विद्यापीठाची बी. कॉम परीक्षा उत्तीर्ण झाले. येथवरचा प्रवास ही साईंचीच कृपा. वादळांवर मात करीत येथवर मजल गेली. नोकरीसाठी अर्ज करीतच होते. परीक्षा पास होतच होते. पण खरं सांगायचे तर यश येतच नव्हते...साईंवरचा विश्वास मात्र ढळत नव्हता. त्यांच्यासारखा पाठीराखा असताना अपयश येतंच कसे ? मनासारखी नोकरी कां मिळत नाहीं ? अशी केविलवाणी परिस्थिती मी किती दिवस सहन करणार ? आता आपल्याला वेड लागणार की काय ? जगाला वाटत होते पदवीधर असून बी. कॉम नोकरी कां नाही ? त्यामुळे घरचे वातावरणही चमत्कारिक झाले होते...सांसारिक अडचणी भेडसावीत होत्या. बाबांची तुटपुंजी पेन्शन नि बहिणीचा पगार यात भागणार कसे ? मी सर्वांवर भारभूत होणे बरे का ?

अशा मनःस्थितीत १९७८ नोव्हेंबरात शिर्डीला जाण्याचा योग आला. तिथे गेल्यावर बाबांच्या द्वारकामाईत मी आई समवेत गेले असता तिथल्या सुंदर दृश्याने माझे मन वेधून घेतले. दृश्य असे—बाबांचा कोणी एक भक्त द्वारकामाईत पण त्यांची रोषणाई करण्यात गर्क झाला होता. मनात विचार आला खचितच या गृहस्थांचा काहीतरी नवस असावा. तो सिध्दीस गेल्यामुळे ते ही दीप रोषणाई करीत असणार ! मग मीही बँकेतल्या नोकरीसाठी बाबांना असा दीप दानांचा नवस केला तर नोकरी मिळाली तर मी ही अशी दिव्यांची रोषणाई द्वारकामाईत करीन !

शिर्डीहून परतल्यावर १९७९ च्या फेब्रुवारींत बँक रिक्रूटमेंट बोर्डाची कारकून भरतीची जाहिरात वर्तमानपत्रात झळकली; पण अर्ज करायला मन तयार होईना. अर्ज कर करून वैताग आला होता. त्यात २० रुपये पोस्टल ऑर्डर जोडण्याची अट ! त्यामुळे या जाहिरातीकडे लक्ष द्यायला अजीबात तयार नव्हते; पण माझे थोरले मेव्हणे श्री. श्रीधर मुकुंद सावंत यानी अर्ज करायला, असा काही ससेमिरा लावला की पण अर्ज करावाच लागला. फॉर्म श्री. सावंत यांनीच आणला. पोस्टल ऑर्डर

ही त्यांनीच भरली. या मागची त्यांची प्रेरणाही साई समर्थांचीच असणार. मी तर हात पाय गाळलेच होते. सर्व सोपस्कर होऊन मी २५ फेब्रुवारीला परीक्षेस बसले. त्यात नित्याप्रमाणे उत्तीर्ण झाले. इंटरव्ह्यू ही ऑगस्ट १९७९ त पार पडला. तो ही फक्कड. बँकेत नोकरी मिळण्याची आशा दुणावली. पण कॉल येतच नव्हता. ५–६ महिने असेच गेले "गर्जिति न वर्षति"...इंटरव्ह्यू नंतर ५–६ महिन्यानी श्री. सावंत नंबर पहायला गेलें, पण लिस्टात माझा नंबरच नव्हता. एका दूरच्या नातलगाकडून कळले तेंव्हा तर माझे मनोरथ पूर्णपणे ढासळलें.

आता कसली बँकेतली नोकरी ?

मी तर सर्वांना सांगतच होते मला बँकेतच नोकरी मिळणार कारण माझा इंटरव्ह्यू तर झकास झाला होता. त्यावेळी मुलाखत घेणाऱ्या ऑफिसरांनी माझी प्रशंसाच केली नव्हती का ? त्यांच्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर दिलखुलास दिल्यावर आपल्याला यश येणार, शंभर टक्के येणार असे नव्हते का वाटले ? मग आता बोलावणे काही ? प्रत्येक गोष्ट साईचे नाव घेऊनच पार पाडली होती. ते परीक्षा नि कसोटी तरी किती घेत आहेत ! इंटरव्यूच्या वेळी कॉलेजचा नक्की ठावठिकाणच मिळेना तर कुलस्वामीनीचे मनोमन स्मरण करताच त्री प्रोफेसर रूपाने ती हजर होऊन कॉलेज दाखवले ... इंटरव्ह्यूला अगदी बरोबरच वेळेला हजर झाले नि आता विलंब का !

नोकरी मिळणार नाही हे मानायला मन तयार होईना कुचेष्टा होत होती मन प्रसंगोपात अश्रू ढाळीत होते पण ,, साईच्या श्रद्धासबुरीचा विसर पडतच नव्हता ··· एक दोघेजण म्हणालेही. छब्बूताई ! तुमच्या शिक्षणाचा काय उपयोग ? आमची पोरे नोकरीला लागली...तुम्ही तर बी. कॉम हीःहींःहीः मी त्यांना सांगायची माझे साई सरकार माझे शिक्षण फुकट घालवणार नाहीत पहातर खरे ! त्यांनी तर काळो खातून मला मार्ग दाखवलाय ...

अशा प्रकारे १ वर्ष गेले नोकरी मिळत नव्हती मीही साईवर चरफडायला लागले अद्वातद्वा बोलले तरी माझे ओढाळमन त्यांच्या चरणाशी धाव घेत होते. नवस सायास चालूच होते दर गुरुवारच्या पूजेचा संकल्पही कार्यवाहीत आणला, असे तीन गुरुवार गेले, वडीलांनी गुरुचरित्राचे वाचनही पुरे केले नि ...

काय आश्चर्य ! ध्यानी मनी, स्वप्नी नसताना बँक सिलेक्शन बोर्डाकडून माझी नेमणूक आंध्र बँकेत झाल्याचे अपॉईंटमेंट लेटर आले. ही साईची कृपा नाहीतर काय !

माझी नेमणूक नागपूरला झाली आहे, एक सप्टेंबरला मी तिथे हजर व्हायला रवाना झाले, ओठावर साईंचे नाव आहे, साईनाथ गुरु माझे आई... जयजय साईनाथ महाराजकी जय ! माझी नेमणूक लवकरच सोईस्कर जागी साईबाबा करणार असा मला विश्वास आहे नि लवकरच शिरडीस जाऊन मी दीपदानही करणार आहे.

★

# शिरडीचा योगच होता

—श्री. माधव गजानन गोरे
विनायक बाग, बालाजी मंदीर मार्ग,
कुर्ला ( पश्चिम ) मुंबई ४०००७०

▲

● १ जून १९८० रोजी मी जालन्याला बहिणीकडे गेलो होतो. ३ जूनला शिरडीला जाण्यासाठी जालना सोडले. दुपारी १२ वाजताची गाडी उशिरा म्हणजे दुपारी ४ वाजता आली व जालन्याहून दोन स्टेशन सुटल्यावर बदनापूर येथे इंजीन बिघडल्याने १॥ तास उभी होती. तेथून औरंगाबाद तेथे १० मिनीटाऐवजी ५० मिनीटे उभी राहीली व रात्री ९। वाजता रोटेगाव स्टेशन येथे ऊतरून एस. टी. गाठली. तिथे २०० माणसे व एक एस. टी. असा प्रकार होता. कसेबसे बसमध्ये शिरायला मिळाले. २० मिनीटांनी वैजापूरला पोहोचलो. तेव्हा घडयाळात रात्रीचे पावणेदहा वाजले होते. तेथे चौकशीकरता असे कळले की आता सकाळशिवाय शिरडीला बस नाही. मी नाराजच झालो. थोडयावेळाने एका बस ड्रायव्हरने सांगितले की तुम्ही येवला येथे जा व तेथून तुम्हाला पुष्कळ गाडया शिरडीला जायला मिळतील. रात्री ११ वा. येवल्याला जाणारी बस आली. तीत बसून येवला साडे-अकराला गाठले. तिथे चौकशी केली तेव्हा समजले १२ वा. शिरडी बस आहे. ती बस साडेबाराला आली व कोणतेही प्रवासी न घेता ( आत भरपूर जागा असताना ) तशीच निघून गेली. रात्रीचे साडेबारा वाजून गेले होते व आता दुसरीबस केव्हा येणार का माझा शिरडीचा योगच नाही का ! आणि ते सुद्धा येथून शिरडी अवघी

१४ मैलावर असताना ! अशी माझी घोर निराशा झाली. रात्री १ वाजता एक बस आली व कंडक्टरने सांगितले बसमध्ये बसायला जागा नाही. तुम्हाला उभे राहून जावे लागेल. मी त्याला सांगितले माझी टपावर बसण्याची तयारी आहे. परंतु मला तू आत प्रवेश दे. शेवटी आम्हाला बसमध्ये प्रवेश मिळाला व रात्री पावणेदोन वाजता शिरडी स्थानकाला जाऊन पोहोचलो. शिरडीस उतरल्यावर माझा माझ्यावर विश्वास बसेना की मी शिरडीत कसा आलो. ही केवळ बाबांचीच कृपा शिवाय त्यात अधिक महिमा. लगेच गुरूस्थानचे दर्शन घेऊन भक्तनिवासमध्ये गेलो व तेथे भाड्याची गादी घेऊन भक्तनिवासच्या पहिल्या मजल्यावरील गॅलरीत जाऊन पडलो. मी अंथरुणावर पडलो तेव्हा रात्री दोनचे टोले पडले. त्याचा अर्थ मी लावला "श्रद्धा व सबूरी" अशी आहे ही बाबांची किमया ॥ 卐

# कृपासागर श्रीबाबा

–सौ. सुनीता जोशी
वैभव, रिझर्व्ह बँक एम्प्लॉइज को-ऑप. हौसिंग सोसायटी,
गडकरी पथ डोंबिवली (पूर्व)

● आम्ही दरवर्षी एप्रिल-मे महिन्यात शिर्डीला जातो. या वर्षी ह्यांना एप्रिलमध्ये रजा मिळणे शक्य नव्हते म्हणून ह्यांनी मे महिन्यात शनिवार-रविवारला जोडून दोन दिवसांची रजा घ्यावयाची व आम्ही शिर्डीला जावयाचे असे ठरविले. परंतु आम्ही ज्या शनिवारी निघणार होतो त्याच शनिवारी आमच्याकडे पाहुणे येणार असल्याचे पत्र आल्याने आणि पाहुणे प्रथमच आमच्याकडे येत असल्यामुळे आम्हाला शिर्डीला जाण्याचा बेत रद्द करावा लागला. मे महिन्यात नाहीतरी शिर्डीला गर्दीच असते तेव्हा आपण सावकाशपणे मे महिना संपल्यानंतर जावे असे आम्ही ठरविले. नंतर आम्ही १९ जुलैच्या शनिवारी जाण्याचे पक्के केले परंतु दैवयोग वेगळाच होता. १५ जुलैपासून आमच्या लहान मुलाला टॉनसिलसचा त्रास सुरू होऊन खूप ताप येऊ लागला, आणि १९ जुलैचाही शिर्डीला जाण्याचा आमचा बेत

आम्हाला रद्द करावा लागला. हा बेत रद्द झाल्यामुळे आमची सर्वांचीच मने सुन्न झाली व श्रीबाबा आपल्यावर रागावले आहेत असे वाटून सर्वच बेचैन झाले.

त्यानंतरच्याच शनिवारी २६ जुलैपासून शिर्डीला गुरुपौर्णिमेचा उत्सव सुरू होणार होता. आपल्याला या उत्सवाला जाण्याचा योग आला तर किती बरे होईल असे वाटू लागले. परंतु या वर्षी आपले एवढे बेत रद्द झाले आहेत तेव्हा हे कसे जमणार असे वाटू लागले. गुरुवार दिनांक २४ जुलैला संध्याकाळी, हे उद्या शिर्डीला जावयाचे असे ठरवून आले व आम्हाला जाण्याची तयारी करण्यास सांगितली. सकाळच्या पनवेल-शिर्डी या एस. टी. ने जाण्याचे ठरले. सर्वांनी हा बेत तरी रद्द होऊ नये म्हणून श्रीबाबांची प्रार्थना केली. ठरल्याप्रमाणे सकाळी आम्ही निघालो. पनवेल-शिर्डी एस. टी रिकामी होती. आम्हाला प्रवासात काही त्रास झाला नाही. संध्याकाळी ४ वाजता आम्ही शिर्डीला पोहचलो. सर्वत्र उत्सवाची तयारी जोरात सुरू होती. सर्वत्र आनंदाचे वातावरण पसरले होते. आम्हाला संस्थानच्या खोल्यात जागा मिळाली नाही. परंतु मंदिराच्या शेजारच्याच गेस्टहाऊसमध्ये राहण्यास जागा मिळाली. शनिवारी अभिषेक व्यवस्थित झाला. रविवारी गुरुपौर्णिमेसारख्या महत्त्वाच्या दिवशी श्री बाबांचे दर्शन घेण्यास मिळाल्याने अगदी तृप्त झाल्यासारखे वाटले. बरेच दिवस आमची गुरुपौर्णिमेला शिर्डीला जाण्याची इच्छा होती परंतु त्या सुमारास तेथे प्रचंड गर्दी असणार व आपण मुलांबाळांसह गेलो तर त्रास होईल म्हणून आम्ही गुरुपौर्णिमेला शिर्डीला जाण्याचा बेत करीत नव्हतो. परंतु या वर्षी आम्ही ठरविलेले सर्व बेत रद्द झाले व आम्ही गुरुपौर्णिमेच्या महत्त्वाच्या उत्सवाला शिर्डीला दाखल झालो. आमचे सर्व कार्यक्रम व्यवस्थित पार पाडले. यावरून एकच खात्री पटली की शिर्डीला यावयाचे की नाही हे सर्व श्रीबाबांच्या आज्ञेवर अवलंबून आहे. आपली वेळ आली की आपण जेथे असू तेथून चिमणीप्रमाणे श्रीबाबा आपल्याला खेचून नेतात. आम्हाला गुरुपौर्णिमेसारख्या महत्त्वाच्या उत्सवाला शिर्डीत आणण्याचा बेत श्रीबाबांनी केला होता व तो आम्हाला दिसत नव्हता म्हणून आम्ही नाराज होत होतो.

ह्यावर्षी गुरुपौर्णिमेचा उत्सव शनिवार, रविवार आणि सोमवार असा होता. आम्ही रविवारी दुपारच्या एस. टीने परत येण्याचे ठरविले. मुलांची इच्छा सोमवार-पर्यंतचे सर्व कार्यक्रम बघून परतावे अशी होती. मुलांच्या मुखातून श्री बाबांनीच आम्हाला सोमवारपर्यंत राहण्याची आज्ञा केली होती परंतु ती अशी अव्हेरली व त्याचे प्रत्यंतर आम्हाला ताबडतोब आले. नासिक नंतर आमच्या एस. टी. ला

एका लॉरीने धडक दिली. आमच्या ड्रायव्हरने प्रसंगावधान राखून ब्रेक दाबले व मोठ्या अपघाताचे लहान अपघातात रुपांतर झाले. कोणी दगावले नाही. काहींना थोडे खरचटले. श्री बाबांच्या कृपेने आम्ही या अपघातातून वाचलो. आम्ही श्री बाबांची आज्ञा मानली नाही म्हणून त्यांनी आम्हाला अद्दल घडविल्यासारखे करून पुन्हा आपल्या दयाळूपणाने वाचविले की आम्हाला या प्रवासात त्रास होणार आहे ही कल्पना श्री बाबांना असल्यामुळे ते आमचे बेत पुढे ढकलत होते व शेवटी आमची इच्छा बघून आम्हाला शिरडीला नेवून अपघाताची वेळ येताच परत आम्हाला फुलासारखे झेलून संकट दूर केले. हे सर्व प्रश्न अनुत्तरीतच राहतील. श्री बाबांचे कृपाछत्र असताना आपण ह्या प्रश्नांचा विचारच कशाला करावयाचा ?

# बाबांच्या हाराची लांबी वाढली !

—प्रेषक श्री. सुरेश बाबूराव ठाकूर.
श्रीसाईबाबा-संस्थान शिर्डी वाचनालय,
शिरडी

श्रीसाईभक्त मधुकर साने, दि. २२।५।८० रोजी शिर्डी दर्शनास आले असता त्यांनी निवेदित केलेला साईभक्तीचा अगाध महिमा व त्याची त्यांना आलेली प्रचिती अशी आहे.

श्री. मधुकर साने यांचा घड्याळाचे स्टेनलेसस्टीलचे पट्टे बनवण्याचा व्यवसाय आहे. त्यांच्या कारखान्यात तीस पस्तीस लोक काम करतात. यांच्या घरात लहान थोरापासून साईबाबांची निःसीम भक्ती व दृढ श्रद्धा आहे. नित्यनियमाने बाबांची सकाळ संध्याकाळ तसबीरीची मूर्तीची पूजाअर्चा, आरती झाल्याशिवाय कुठल्याही कामास ते सुरवात करीत नाहीत. असेच नित्यनियमाप्रमाणे दि. १।५।८० रोजी नेहमीप्रमाणे सकाळी पुजाअर्चा करून बाबांच्या तसबीरीला एक फुलाचा हार त्यांनी घातला. तो गुरुवारचा दिवस होता. गुरुवार म्हणजे बाबांचा वार असे मानतात. त्याच दिवशी रात्री त्यांना स्वप्न पडले. स्वप्नात बाबांची तेजोमय मूर्ती आली, आणि त्यांनी आवाज दिला "अरे, झोपलास काय ? तू सकाळी हार घातला आहेस

ना, तो जरा उठून बघ." तदनंतर बाबा अदृश्य झाले व झोपेच्या तंद्रीतून ते जागे झाले; व पडलेल्या स्वप्नाबद्दल विचार करू लागले की सकाळी हार घालताना आपले काही चुकले तर नाही ना? आपल्या सेवेत काही खंड तर पडला नाही ना? आणि वेड्यासारखे उठून देवघरातील बाबांच्या तस्वीरीकडे त्यांनी धाव घेतली, व जाऊन बघतात तर बाबांच्या तस्वीरीला घातलेल्या फुलांच्या हाराची लांबी बरीच वाढलेली. बाबांच्या तस्वीरीस नमस्कार केला व पडलेल्या स्वप्नाबद्दल विचार करीत बाबांची क्षमा मागून झोपले. सकाळी उठून परत बघतात तर त्याच हाराची लांबी आणखीन वाढलेली त्यामुळे सकाळी, बाबांनी रात्री स्वप्नात सांगण्याचा अर्थ त्यांच्या लक्षात आला, व त्यांच्या उद्योगधंद्याला एक बढती मिळाली असे समजून तो हार तसाच ठेवला. परंतु दि. ५।५।८० रोजी त्यांना बाबांनी दृष्टांत देऊन सांगितले की "तू २१ दिवसांनी दर्शनास शिर्डीला ये. येताना तो हारही घेऊन ये. त्याप्रमाणे ते शिर्डीस दि. २१।५।८० रोजी आले. तो हार मंदिर प्रमुख श्री बागवे साहेब यांना दाखवला घडलेले वृत्त कथन केले. मग त्यांच्या सल्ल्याप्रमाणे बाबांच्या चरणावर हार वाहून बाबांची पुजा केली. तो दिवसही गुरुवारच होता. त्यांच्या सांगण्याप्रमाणे तो हार घरी नेऊन पुजेसाठी देवघरात ठेवला. बाबा वारंवार त्यांना अडीअडचणीच्या वेळी मार्ग दाखवतात व संकटनिवारण करतात. अशा थोर परमपूज्य, संत चुडामणी श्रीसाईनाथ महाराजांचे चरणी कोटी कोटी प्रणाम।

# श्रीसाई कृपेने हरवलेला भाऊ सापडला

—श्री. प्रसन्नकुमार खडकीकर
द्वारा श्री. अरुण ह. खडकीकर
घर क्र. २३।५।८३५-१
शालीबंडा हैद्राबाद

● संत श्रीसाईबाबांच्या दर्शनासाठी आम्ही सगळे म्हणजे मी माझे आई-वडील आणी माझे दोन भाऊ शिर्डीला गेलो व माझ्या बालबुद्धीला खुपच आनंद वाटला. तेथे गेल्या नंतर मला एक चांगला अनुभव आला. श्रीसाईकृपा एवढेच माझ्या बाल बुद्धीला वाटले तो आनंद मला बाबांच्या बद्दल भक्ती निर्माण करून गेला तो मी खाली दिला आहे.

त्याचे असे झाले की आम्ही सगळेजण पुणे नासिक त्र्यंबकेश्वर मार्गे शिर्डीला आलो. श्रीबाबांचे दर्शन घ्यावे शिर्डी पहावी असे, मला कळू लागल्यापासून वाटत

होतेच. पण वयाने लहान असल्याने मला एकटे जाणे शक्य नव्हते. योगायोगाने माझ्या दादांच्या मनात आले व मला खुपच आनंद वाटला. माझ्या शाळेत मी ही आनंदाची गोष्ट माझ्या मित्रांना अभिमानाने सांगितली व जाण्याचा दिवस केव्हा उजाडतो असे झाले. अशा प्रकारे आम्ही बाबांच्या शिर्डीत आलो. माझे दादा (वडील). रुमसाठी रांगेत उभे होते. ते पण साई भक्त आहेत. तोवर मी पण उभा राहून तेथील शोभा पहात होतो. आपण कोणत्या रस्त्याने आलो रुम कुठे मिळेल असे विचार मनात येत होते. तेथे मला निरनिराळे लोक दिसले मला माझ्या वयाची मुले दिसली त्यांच्याशी मैत्री करावी असे माझ्या मनात येऊ लागले. मंदीराच्या परिसरात खुपच चैतन्य दिसत होते. शेवटी माझ्या दादांना रुम मिळाली, व ती मंदीराच्या वरच्या गॅलरीतच मिळाली आम्ही आमचे सामान तिकडे घेऊन जात होतो. बरोबर आई आजी दोन भाऊ व माझा धाकटा काका बरोबर होता. रुमकडे जात असता माझा सर्वात धाकटा भाऊ चि. प्रवीण हा आमच्यातून अचानक सुटला आमचे लक्षच नव्हते. मंदीराची शोभा पाहता पाहता त्याच्याकडे लक्ष राहिले नाही. माझ्या हातात एक छोटी बॅग होती ती सांभाळत मी इकडे तिकडे पहात होतो. मी व सगळे जण रुम जवळ आलो व दादांनी 'प्रवीण कुठे आहे असे विचारले. ते ऐकून माझ्या हातातील बॅग एकदम निसटली. माझा धाकटा भाऊ, त्याच्यावर माझे खुप प्रेम आहे. तेव्हा मी दादांना सांगितले व आलेल्या रस्त्याने धावत गेलो पण कुठेच तो दिसेना. त्याचे वय फक्त पाच वर्षाचे माझ्या डोळ्यात आता मात्र पाणी येऊ लागले. आता पर्यंत आनंदी झालेले मन शंकेने व भितीने घाबरून गेले माझे दादा आई व काका पण त्याला पहात फिरतच होते. शेवटी मला राहवेना मी मनातल्या मनात साईबाबांना प्रार्थना केली अगदी मनोभावे करून केली "बाबा आम्ही हैद्राबादहून इतक्या दूर आलो आम्हाला समाधान लाभु दे माझा भाऊ मिळु दे" तसेच प्रत्यक्ष प्रार्थना केल्यावर बाबांचा आशीर्वाद मिळावा म्हणून डोळे मिटून उभा राहिलो. मंदीराच्या दिशेने श्रीबाबांचे दर्शन घेण्यासाठी धावलो मनात एक प्रकारची रुखरुख लागली होतीच तरी पण बाबांची कृपा थोर आहे असे माझे मन मला सांगू लागले अशा अनेक विचारात असता समोर पहातो तो माझा धाकटा भाऊ मंदीराच्या महाद्वारा जवळच्या ओट्यावर शांत बसला होता. मला पाहताच अण्णा म्हणून ओरडला त्याला मी झटकन जवळ घेतले व रुम कडे धावलो. आई-दादा पण शोधत पुन्हा रुम जवळ आले होते. त्यांना पण त्याला पाहून खुपच आनंद वाटला व मी बाबांकडे प्रार्थना केल्याचे सांगितले. फक्त श्रीबाबांच्या कृपेच्या आशीर्वादाने माझा भाऊ सापडला हे सत्य होते. आम्हा सगळ्यांनाच पुन्हा नवीन उमेद आली आम्ही शांत मनाने श्रीबाबांचे दर्शन घेतले व हैद्राबादला परत आलो. मी रोज शाळेत जाताना श्रीबाबांच्या फोटोला नमस्कार करून जातो. श्रीबाबांची लीला पाहताना मन भरून येते. संताचे दर्शन घेतल्याने खुपच आनंद वाटत असतो.

# उदी हेच औषध !

–कु. शोभना केशव मुळीक
ए ९।१९, बेस्टनगर,
गोरेगाव, (पश्चिम)
मुंबई नं. ४०००६२

'नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य
नित्य घ्या प्रचिती अनुभवे'

* बाबांच्या या वचनाची प्रचिती मला नुकतीच येऊन गेली. तसे साईनाथांनी अनेक वेळा आम्हाला सहाय्य केले आहे. पण हा अनुभव मी 'साईलीलेत'त छापीन, मला प्रचिती द्या असे सांगितल्याने मला हा अनुभव पाठवावा लागत आहे.

अलीकडेच मी तापाने अतिशय आजारी होते. ताप व उलट्या काही केल्या हटेनात, आणि त्यातच खोकला. त्यामुळे डॉक्टरनी स्क्रिनिंग करण्यास सांगितले. मी घाबरून गेले. कारण स्क्रिनिंगमध्ये दुसराच रोग आढळला तर! मी बाबांची अनेक प्रकारे आराधना केली, आणि स्क्रिनिंग रद्द होऊ दे असे म्हटले आणि त्या दयाळू महात्म्याने माझे म्हणणे ऐकले. मी बरी झाले आणि डॉक्टरने स्क्रिनींग करू नका असे सांगितले. परंतु नंतर आठ दिवस झाले नाही तर माझा ताप परत उलटला, आणि डॉक्टरांनी यावेळी स्क्रिनींग करावेच लागेल त्याशिवाय मी औषध देणार नाही असे सांगितले. माझी सर्व आशा संपली. कारण मी मूळात एकदम अशक्त. त्यामुळे माझ्याकडे बघणाऱ्यालासुद्धा मला वेगळीच भावना आहे असे वाटावे त्यामुळे मी मनातून घाबरून गेले. सर्व भार बाबांवर टाकून हॉस्पिटलमध्ये गेले. जातेवेळी मात्र बाबांची उदी अंगाला चोळून गेले व ओठावर बाबांचे नाव. रक्ताची तपासणी, लघवीची तपासणी व शेवटी स्क्रिनींग झाले. डॉक्टरांनी जो फोटो दाखविला त्यामध्ये फुप्फुसात काळया शाईने रेघोटया मारल्या होत्या. त्यामुळे मी अतिशय घाबरले. मी बाबांना अनेक प्रकारे आळवित म्हटले, 'तुम्ही वैद्याचेही वैद्य आहात. तुमच्या फुंकरीने रोग दूर नाहीसे होतात. मग आपल्या मुलीवरचे संकट तुम्ही दूर करणार नाही का? हा कफच असू देत. जर हा कफच असला तर मी आपल्या लीलेचा अनुभव 'साईलीले'त छापीन.' आणि तसेच झाले. डॉक्टरांनी रिपोर्ट पाहिल्यावर सांगितले की घाबरण्याचे कारण नाही. हा क्षय नाही. कफ छातीला चिकटलेला आहे व 'न्युमोनिया' झाला आहे. माझा जीव भांड्यात पडला, आणि औषधोपचार करून मी पंधरा दिवसातच बरी झाले. अशी ही सर्व माझ्या बाबांची लीला आहे. बाबा म्हणजे सर्जन आहेत. रोगावर बाबांचे नाव व उदी हेच मोठे औषध आहे.

# बाबांच्या भक्तांचा एकत्र येण्याचा योग

—सिस्टर आर. डी. मुदलियार
विना नर्सेस ब्युरो, मधु मॅनशन
सायन, ( पश्चिम ) मुंबई २२


* मी एक अलिकडेच घडलेली घटना देत आहे. बाबांच्या भक्तांचा त्यांच्यावर असलेल्या प्रेमामुळे एकाच वेळी एकत्र येण्याचा हा एक चमत्कार मी लिहित आहे. मी स्वतः लहानपणापासूनच साईभक्त आहे, व मी सध्या खाजगी नर्स म्हणून काम करीत आहे. माझा बाबांवर पुरेपूर विश्वास आहे. एकदा मला दादरला असलेल्या सुश्रूषा हॉस्पिटलमध्ये डयूटी मिळाली. पेशंट एक बाई होती.

खरोखरच त्या दिवशीचे ते दृष्य आठवले की मला अत्यंत वाईट वाटते. काय कंडिशन होती त्यावेळी पेशंटची. डॉक्टरांनी तपासले वगैरे व तिला 'इंटेसिव्ह केअर-मध्ये ठेवण्यात आले. तिला Infective Polyneuritis हा आजार झाला होता. त्यामुळे तिचे सर्व अंग एकदम दगडासारखे घट्ट होऊन एकदम आकडून गेले होते. तिला स्वतःला अजिबातच काहीच हालचाल करता येत नव्हते. म्हणजे साधा हात देखिल वर उचलून धरता येत नव्हता की मान इकडून तिकडे वळवता येत नव्हती. म्हणजे एकंदरीत सर्व शरीर अर्धांगवायू झाल्यासारखे झाले होते ती स्वतः एक थेंबभर पाणी सुद्धा पिऊ शकत नव्हती. तोंडात पाणी टाकले असता ठसका लागून ते पाणी बाहेर पडत असे. सलाईन, ऑक्सिजन, सक्शन सर्व काही चालू होते. तिच्या नाकात दोन दोन नळ्या घातलेल्या होत्या ( एक ऑक्सिजनसाठी व एक राईस ट्यूब फिडिंगसाठी ) सारखे होणाऱ्या सक्शन मशिनचा आवाज ऐकून व तिची एकंदरीत कंडिशन बघून पेशंटच्या नातेवाईकांनी हातच टेकले होते. ही आपल्या हातातून जाते की काय असे त्यांना वाटे व ते लोक मला विचारत की ही बरी होईल की नाही ! डॉक्टर पण म्हणत होते की हिला कदाचित जसलोकमध्ये ट्रान्सफर करावे लागेल ४–५ दिवसानंतर पेशंटला थोडे बरे वाटू लागल्याबरोबर तिने " माझी मुले कुठे आहेत " ? असे न विचारता साईबाबांचा फोटो कुठे आहे. असेच विचारले तिच्या मिस्टरांनी ताबडतोब सत्यसाईबाबा व शिरडीचे साईबाबा यांचा एकत्र असलेला छोटासा टेबलफोटो आणून दिला. माझी पेशंट पण साईभक्तच आहे हे मला कळल्यावर किती आनंद झाला म्हणून सांगू ! कर्मधर्मसंयोगाने आम्ही दोघी तर साई भक्त होतोच पण आश्चर्य म्हणजे नाईटची सिस्टर ( ती कानडी असूनहि ) फिजिओथेरॅपिस्ट आणि आर. एम. ओ. हे पण सर्वच जण साईभक्तच निघाले

हा एक प्रकारचा चमत्कारच नाही का? आणि एक छोटासा चमत्कार म्हणजे पेशंटची बहिण जेव्हा तिला बघावयास घरातून बाहेर पडणार तेवढ्यात पोष्टमनने तिच्या हातात श्रीसाईलीला हे मासिक दिले, व तिने ते घरी न ठेवता तसेच हॉस्पिटल मध्ये घेऊन आली, व म्हणाली बघ बाबाच आले आहेत तुला आशिर्वाद द्यायला. मी ते मासिक वाचून काढले. हळुहळु पेशंटची परिस्थिती सुधारत गेली. ट्रान्सफर करण्याची वेळपण टळून गेली होती. कारण स्वतः बाबाच डॉक्टरांच्या रूपाने येऊन औषधरूपी कृपाप्रसाद देऊन जात होते.

एकूण ३५ दिवस पेशंट हॉस्पिटमध्ये होती. पहिले थोडे दिवस सोडले तर बाकीच्या सर्व दिवसामध्ये आम्ही दोघी श्री साईस्तवन मंजरी दररोज वाचत असू. साईनाम स्मरण करत असू. सत्यसाईबाबा व शिरडीचे साईबाबा ह्यांचे भजन टेप-रेकॉर्डवर ऐकत असू. अशाप्रमाणे आम्ही दोघी दिवसभर साईसाईच करीत असू. खरे तर ह्या गोष्टी काय हॉस्पिटलमध्ये करावयाच्या असतात? पण आमची इच्छा बाबाकृपेनेच पूर्ण झाल्या. माझ्या पेशंटमुळे मला चार गोष्टी माहिती झाल्या. १) श्रीसत्य साईबाबा व शिरडीचे साईबाबा हे एकच आहेत. प्रथम ते मला मान्य नव्हते. पण अनेक साईलीला माझ्या वाचनात आल्यामुळे ते मला नंतर पटले. २) श्रीसाईलीला मासिकाबद्दल मला काहीच माहीत नव्हते ते मला माहीत झाले. ३) दादर येथे साई निकेतन आहे त्याची माहिती झाली. ४) श्री सत्यसाईबाबा हे मुंबईमध्ये अंधेरी येथे येतात.

"जया मनी जैसा भाव तया तैसा अनुभव" याचा प्रत्यय बाबांचे लाखो भक्त घेत आहेत. तर माझी पेशंट चांगली होऊन सुखरूप घरी गेली. अशाप्रमाणे श्री साई सर्व साईभक्तांना पावो ही साईचरणी प्रार्थना. अशा ह्या श्रीसाईस माझे शतकोटी प्रणाम!



# साईबाबा व किल्ल्याचा जुडगा

—श्री. रामचंद्र ( वसंत ) वि. कातकरणीकर
१६० तिलक पथ, इंदूर

● लहाणपणापासूनच श्री बाबांवर माझी श्रद्धा आहे. केव्हाही कोठेही जाताना श्री साईबाबांचे स्मरण व वंदन करणे अंगवळणी पडले आहे. याच विश्वास-पूर्ण कृतीमुळे श्रीसाईबाबांनी बिकट प्रसंगातून मला अलगद सोडविले. भारतीय स्टेट बँकेत मी अकौंटंट असतानाची गोष्ट अकौंटंट असल्यामुळे खजिन्याच्या किल्ल्या व इतर प्रमुख किल्ल्या माझे जवळच रहात असत. त्यावेळी मी इंदूरात रहात असून माझ्या बँकेची शाखा तेथून ५९ किलोमिटर अंतरावर होती. मी इंदूराहून रोजच येत जात असे. एक दिवस नित्याप्रमाणे कपडे घालून पैशाचे पाकीट, फौंटनपेन, गॉगल वगैरे वस्तू कपाटातून काढल्या आणि किल्ल्यांचा जुडगा घेण्यासाठी ठराविक जागी हात घातला पण काय किल्ल्यांचा जुडगाच तेथे नव्हता. क्षणभर पायाखालील जमीन सरकल्याचा भास झाला, हृदयाचा एक ठोका चुकला. मन सुन्न झाले. सर्व वस्तु तर जागेवर आहेत मग किल्ल्यांचा जुडगाच कसा नि कुठे गेला ते समजेना. समोरच बाहेरील खोलीत श्रीबाबांची तसबीर होती क्षणभरच डोळे तिकडे वळले अन् आभास झाला कि श्रीबाबा निर्धास्त रहाण्याचा हाताने संकेत देत आहेत. अन बाबांचे कृपेने एकदम आठवले की, काल संध्याकाळी खजिन्याचे दार उघडून दिले व चपराशी सामान ठेवित असताना तेथेच दाराशी लेजर मागऊन तपासू लागलो. चपराशी सामान ठेऊन दार लोटून निघून गेला व माझ्या सहकाऱ्याने (हेडकॅशिअर) स्वतःची किल्ली लाऊन कुलूप लावले व मला माझी किल्ली लावण्यास सांगून निघून गेला. मी लेजर तपासत असल्याने माझी किल्ली जुडग्यासह तशीच दाराच्या कुलु-पात राहिली अनावधानाने अगर श्रीसाईबाबांस प्रचिती दाखविण्याची होती म्हणून की का कुणास ठाऊक पण लेजर तपासून नेहमीसारखा मी घरी निघून आलो. पण सत्य परिस्थितीची जाणीव होताच अधिकच कापरे भरले. त्यात हेकेखोर व स्वतःस कायदेपंडित म्हणविणारे नवीनच रूजू झालेले शाखा प्रबंधक. दुसरे म्हणजे इतक्या लांब जायचे म्हणजे किमान सव्वा-दीड तास तरी लागणारच अन् काल-संध्याकाळ पासून तिजोरीच्या दारात अडकलेला किल्ल्यांचा जुडगा कुणासच कसा दिसणार नाही. किल्ल्या इतर कुणी काढून घेतल्यास अथवा प्रत्यक्ष शाखा प्रबंधकांनी काढून घेतल्यास निश्चितच ते मुख्य कार्यालयात कळविणार व मला रिव्हर्शन किंबहुना

एखाद वर्षाची वार्षिक वाढ बंद केली जाईल अशी धास्ती वाटू लागली. त्यात इतर लोकांत होणारी चर्चा व फजिती जीवघेणी वाटू लागली. पंख फुटावे व एकदम उडून क्षणार्धात बँकेत पोहोचावे असे वाटू लागले पण मानवी देहास हे कसे शक्य होईल..!

श्रीसाईबाबांचे तसबिरीसमोर एक मिनिटभरच उभा राहिलो, व अनन्यभावे प्रार्थना करून किल्ल्यांचा जुडगा कुणासही दिसू देऊ नको व मजवर कुठलीही विपदा येऊ देऊ नकोस अशी प्रार्थना केली व आजपासून पाच गुरुवारी उपवास करण्याचा संकल्प श्री दयाघन साईबाबांस बोलून दाखविला. धडधडत्या अंतःकरणाने परंतु पूर्ण विश्वासाने श्रीसाईस नमस्कार करून बाहेर पडलो. प्रथम स्कूटरनेच जावे असे वाटले पण सहकाऱ्याच्या सल्ल्यानुसार बसनेच निघालो. नेहमीचीच बस पण आज ती मुळी धावतच नाही असेच वाटत होते. प्रत्येक क्षण फार मोठामोठा भासत होता. शरीर बसमधे होते. तर मन मात्र बँकेत किल्ल्यांच्या शोधात भटकत होते. बसमधून उतरताच सर्व प्रथम खजिन्याचे द्वाराजवळ गेलो आणि काय आश्चर्य किल्ल्यांचा जुडगा जसाच्या तसाच कुलपात अडकलेला दिसला. पटकन् किल्ल्या काढून ताब्यात घेतल्या. ही अलौकिक माया म्हणजे श्रीसाईबाबांचीच कृती हा विश्वास दुणावला, कारण रात्री वा सकाळी, स्वच्छता करणारा अगर इतर कुणी शिपाई, कुणासच खजिन्याच्या अंगाच्या कुलुपात अडकलेला किल्ल्यांचा जुडगा दिसू नये ही किमया श्रीबाबाशिवाय कोण करून दाखवू शकेल. अनेकजण तेथून आले गेले परंतु कोणासही जुडगा दिसू नये ही माया त्या तेजोनिधीची. दुसरे आश्चर्य म्हणजे माझ्या स्कूटरच्या किल्ल्यांच्या जुडग्यास श्रीसाईबाबांचे चौकोनी लॉकेट होते ते त्याच दिवशी मी स्कूटर काढल्यानंतर नाहीसे झाले ते अद्याप कुठे सापडले नाही जे अनेक वर्षांपासून माझेजवळ होते. माझ्या सतत सान्निध्यात रहाणाऱ्या श्रीसाईबाबांनी पुढे होऊन किल्ल्यांचा ताबा घेतला व मला महान संकटातून वाचविले असेच नाही का ? 卐

# साईनाथ ! तेरे हजारो हाथ !

—श्री. सुधीर नरसीदास दोसी
मु. पो. गोवेले, व्हाया म्हसळी,
ता. माणगांव, जि. कुलाबा

● साधारण ८–१० वर्षांपूर्वीची गोष्ट; त्यावेळेस माझा मोठा भाऊ नंदकुमार हा १२–१३ वर्षाचा असेल. माझ्या घरचे किराणा मालाचेदुकान आहे. वडिलांच्या तब्येतीमुळे त्यांना नंदूभाईला महाडला दुकानाचे सामान आणायला पाठविले, महाडला माझे दोन नंबरचे मेहुणे त्याच्या मदतीला होतेच.

त्यावेळेस महाडवरून 'महाड-श्रीवर्धन' ही गाडी महाडहून सकाळी ६ वा. सुटत असे. त्यामुळे नंदूभाईला दुसऱ्या दिवशी सकाळच्या गाडीने यायला सांगितले होते. आमचे गाव एस. टी. रस्त्यापासून २-२॥ मैल आत असल्याने गडी सामान आणायला पाठविणार होतोच.

पण दुसऱ्या दिवशी काही कारणाने माझा भाऊ व मेहुणे हे झोपून राहिल्याने ६ वाजताची गाडी चुकली. मग तो ९ चे आंबेत गाडीने गोरेगावला व पुढे 'मुंबई-आदगाव' गाडीने गोवेल फाट्यावर आला. त्यावेळेस १२॥ वाजले होते. गडी श्रीवर्धन गाडीवर जाऊन भाई न आल्याने परत आला होता. त्यामुळे फाट्यावर चीट-पाखरू पण नव्हते. इकडे घरी माझे वडिलपण भाई न आल्यामुळे काळजी करीत साईनाईनामाचा जप करीत होते.

पण नशिबाने एक म्हातारा बाबा डोक्यावर फाटी घेऊन चालला होता. त्याच्यामागे एक कुत्रे देखील होते. तो जवळ आल्यावर भाईने त्याला 'सामान घेऊन गावापर्यंत येशील का?' असे विचारले. अर्थात गाव २-२॥ मैल आत आहे हे पण सांगितले. त्यावर त्या म्हाताऱ्या बाबाने 'मला काही खायला देशील तर येतो' असे उत्तर दिले. त्यावर होकार देऊन भाई त्याचे सोबत गावात येण्यास निघाला. त्याचवेळेस गावात वडिलांना कोणीतरी सांगितले की, तुमचा मुलगा सामान घेऊन फाट्यावर आला आहे म्हणून ते देखील तब्येतीची काळजी न करता फाट्यावर येण्यास निघाले, रस्त्यात दोघांचीही भेट झाली.

वडिलांनी म्हाताऱ्या बाबांची चौकशी केली; तेव्हा त्याने त्याचे नाव 'इस्माईल' असे सांगितले. पण तेवढ्यात त्याच्या कानाकडे लक्ष गेले आणि ते टोचलेले दिसले. ते दाखवून वडिल म्हणाले 'मुसलमान असून कान कसे टोचलेले?' त्यावर बाबाने काहीच उत्तर दिले नाही. तोपर्यंत बोलत-चालत गाव जवळ आलेच होते.

दुपारची वेळ झाल्याने घरात आईने चहा वगैरे ठेवला होताच. त्याला चहा-पोहे खायला दिले. सोबत पाणीही दिले. तो ते सर्व खात ओटीवर बसला होता. नंतर त्याने डोक्यावर घेण्यास एक पोते मागितले. ते आणायला वडिल घरात गेले. व थोड्या वेळाने पोते घेऊन बाहेर आले तो ओटीवर कुणीच नव्हते. कपबशी रिकामी पडली होती. इकडे तिकडे बघितल्यावर वडिल रस्त्यावर पुन्हा फाट्याकडे घाईने यायला निघाले. पण रस्त्यातील कोणालाच 'दाढीवाला बाबा' न दिसल्याने ते निराशेनेच परतले. त्यांना फार वाईट वाटले. मग त्यांनी ओळखले की, आमच्या

घरी प्रत्यक्ष साईबाबांनीच पायधूळ झाडली. खरोखर साईबाबांची लीला अगाध आहे.

माझ्या वडिलांना कर्करोग आहे. त्याला आज १० वर्षे झाली. तरीसुद्धा ते व्यवस्थित आहेत. अर्थात ही सर्व साईबाबांची कृपा !

अशीच कृपा बाबा नेहमी आमच्यावर व आपल्या भक्तांवर करो ही प्रभू-चरणी प्रार्थना. ★

# स्वप्नात दिसलेले साईबाबा

★★★★★★★★★

—श्री. फणींद्र सुमंत तळपदे
द्वारा श्रीकृष्ण ग. कोठारे,
साईमंझिल, १५१ लेडी जमशेटजी रोड,
माहिम, मुंबई ४०००१६

● माझा जन्म गुढीपाडव्याच्या दिवशी झाला. आज मी १६ वर्षांचा आहे. माझ्या आयुष्यात सुरुवातीला घडलेली पुढील एक घटना आहे.

माझे आजोबा श्री साईबाबांचे परम भक्त आहेत. साईबाबा हयात असतानाही ते पुष्कळवेळा शिरडीस गेले आहेत. त्यांनी त्यांचे प्रत्यक्ष दर्शन सुद्धा घेतले आहे व त्यांना श्रीसाईबाबांचे बरेचसे अनुभव आलेले आहेत. त्यातील काही साई-लीला मासिकातून प्रसिद्धही झालेले आहेत. त्यांच्या घरी श्रीसाईबाबांच्या फोटोला गुरुपौर्णिमा, दसरा, दिवाळी, होळी त्या दिवशी व दर गुरुवारी हार घालून, आरती, तीर्थप्रसाद वगैरे देऊन ते सण मनोभावाने साजरे करितात. आम्ही सुद्धा त्या प्रसंगी उपस्थित राहून त्या सोहळयात सहभागी होतो.

मी सुमारे ३, ४ वर्षांचा असताना मला घटसर्प झाला होता. त्या वेळेस आई बाळंत असल्याकारणाने तो संसर्गजन्य रोग लहान मुलाना होईल म्हणून डॉक्टरानी मला हॉस्पीटलमध्ये ठेवण्याचा सल्ला दिला. त्याप्रमाणे मला हॉस्पिटलमध्ये ठेवण्यात आले. माझी सुश्रुषा करण्याकरिता माझी आत्या माझ्याबरोबर हॉस्पिटलमध्ये राहिली होती. दोन चार दिवसानंतर मला जास्त ताप झाला व त्या तापाच्या ग्लानीत असताना स्वप्नात अकस्मात् माझ्या डोळयासमोर मामांच्या घरचा साईबाबांचा

फोटो आला. उत्सव समयी घालतात तसाच मोठा भरगच्च हार त्या फोटोला घातलेला होता, पण तो हार लाल गुलाबांचा होता. मला तेवढ्यात जाग आली. मी आत्यास विचारले की साईबाबांचा फोटो कोठे आहे व त्या फोटोला गुलाबाचा हार कोणी घातला. ह्या माझ्या प्रश्नाने आत्या गोंधळून गेली. तिला काही या प्रश्नाचा उमज पडला नाही. ती म्हणाली, कोठे आहे साईबाबांचा फोटो? आपण आहोत हॉस्पिटलमध्ये. आता रात्र झाली आहे. तू स्वप्न पाहिले असशील. आता स्वस्थ झोप. परंतु त्या उत्तराने माझे समाधान झाले नाही. मी तिला परत विचारले की आजोबांच्या म्हणजेच मामांच्या घरील श्रीसाईबाबांच्या फोटोला गुलाबाचा हार कोणी घातला. ती म्हणाली, उद्या तुझे बाबा आल्यावर त्यांना विचारू. तू आता स्वस्थ झोप. पण मला लगेच झोप लागली नाही. मनात त्या हाराबद्दल विचार सारखे चालूच होते, व बऱ्याच वेळानी मला झोप लागली. दुसऱ्या दिवशी माझे बाबा मला पहावयास हॉस्पिटलमध्ये आले, त्यावेळी मी त्यांना हाच प्रश्न विचारला, पण ते सुद्धा माझे समाधान करू शकले नाहीत. तुझे आजोबा आजी येथे आल्यावर आपण त्यांना विचारू असे सांगून त्यांनी माझे समाधान करण्याचा प्रयत्न केला. माझ्या आजोबा आजीला सुद्धा हा प्रश्न ऐकून आश्चर्य वाटले व त्यांनी सांगितले की, "तुला साईबाबांनी हॉस्पिटलमध्ये दर्शन दिले. तू आता नक्की बरा होशील."

मी मोठा झाल्यावर मला कळले की मला त्यावेळी पडलेल्या स्वप्नावर आमच्या घरी बरीच चर्चा झाली होती, परंतु ते स्वप्न म्हणजे शुभशकुन होता का दुःचिन्ह होते यावर सगळयांची वेगवेगळी मते पडली होती. माझ्या आईची साईबाबांवर नितांत श्रद्धा असूनसुद्धा ती देखील त्या स्वप्नाने कचरली होती, परंतु तिच्या वडिलांनी म्हणजे माझ्या आजोबांची ठाम समजूत होती की साईबाबांनी दिलेले दर्शन म्हणजे लवकर बरा होण्याचा आशीर्वाद होता व शिर्डीला जाऊन त्यांच्या समाधीचे दर्शन घेण्याचा आदेशच होता.

मी बरा झाल्यावर आम्ही सर्वजण शिर्डीला गेलो व साईबाबांच्या पाया पडून त्यांच्या समाधीवर डोके ठेवले. आम्ही सर्वांनी मिळून साईबाबांच्या मूर्तीला स्वप्नात पाहिल्या प्रमाणे लाल गुलाबाच्या फुलांनी भरगच्च असलेला हार घातला. अशा तऱ्हेने मला स्वप्नात दिसून साईबाबांनी त्यांच्या समाधीचे दर्शन घडवून आणले. त्यावेळेपासून दरवर्षी आम्ही सर्वजण, शिर्डीला जाऊन साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतो.

× × ×

# श्रीसाईगीत तुषार–५

☆ ☆ ☆

आजच्या जगात चमत्कारा शिवाय नमस्कार नाही. आणि तोच मार्ग श्रीसाईंना अनुसरावा लागला. सत्य जगाला दाखवण्यासाठी हाती भिक्षापात्र घेतले. रोज गावभर फिरून तेल गोळा करावयाचे आणि सायंकाळी द्वारकामाईत सारे दिवे पेटवून ध्यान मग्न व्हायचे. असा क्रम सतत चालू होता. अखेर साई परीक्षेची वेळ जवळ आली, व साऱ्या दुकानदारांनी तेल न देण्याचा ठाम निश्चय केला. परंतु त्या दिपावलीच्या शुभ दिनी श्रीसाईंना द्वारकामाईत अंधाराचे सामर्थ्य कसे सहन होणार त्यांनी क्षणाचा विलंब न करता पण त्या पाण्याने पेटविल्या आणि साऱ्या गावाला आपल्या प्रचंड अद्वितीय शक्तीचा साक्षात्कार दाखविला सारा गाव श्रीसाई चरणी नतमस्तक झाला.

साक्षीस साई ज्योत. साक्षीस गांव आला
तेला शिवाय पणत्या आज पेटविल्या ॥ धृ. ॥

रोज गांव फिरुनी
आणि हो तेल साई
मशिदीत आपुल्या हो
करी रोषणाई
रोज सांज होता क्रम हाच आचरीला ॥ १ ॥

नित्य येता दारी
साई करी पुकारी
सत्य दावण्यांस
झाला हो भिक्षेकरी
तेल रोज देवूनीया, गांव सारा थकला ॥ २ ॥

एक दिन सारे हो
भक्त झाले गोळा
तेल नाही द्यावयाचे
आज फकिराला
तेल नाही मिळता ध्यानी खेळ आला ॥ ३ ॥

सारे मिळूनीया
केली हो फजिति
विना प्रकाशाने हो
आज भासे धरती
द्वारकामाई मध्ये अंधार सारा झाला ॥ ४ ॥

सत्य दाविण्याची
ही वेळ जवळ आली
पाठी भरून पणती
हो प्रज्वलीत झाली
चरण सारे वंदिता, गांव सारा वदला ॥ ५ ॥

श्रीसाईगीत तुषार—६

● आणि दुसरा दिवस उगवला सूर्यनारायणांच्या प्रभेवर आरुढ होऊन श्रीसाईंची किर्ती गावोगाव पसरली, आणि शेकडो भाविकांच्या झुंडीच्या झुंडी शिर्डीला येऊ लागल्या कस्तूरीचा सुगंध झाकून रहात नाही. तो कधी तरी बाहेर येणार शेकडो दिन दुबळयांचा रक्षण कर्ता. अनाथांचा नाथ श्रीसाईनाथ भारावून गेले. निपुत्रिकांना पुत्र जहाले शेकडो भक्तांना श्रद्धास्थान लाभले,

जाळी निमगांवच्या नानासाहेबांच्या दोन भार्या तर कोपरगावच्या गोपाळरावांच्या तीन भार्या दोघांना पण पुत्र संतान नव्हते. दुःखी अंतःकरणाने साई चरणी लीन झाले आणि दोघांच्या घरी पाळणा हलला. पुत्र रत्नाचा लाभ झाला. त्यांची साईबाबावर नितांत श्रद्धा बसली. गोपाळरावांनी शनीचे मंदिर बांधले. मारुती मंदिराचा जिर्णोद्धार केला. साईंनी आपल्या सामर्थ्याचा प्रताप चालूच ठेवला. लोहाराचे मुल धुनीत हात घालून बाहेर काढले. ताजूद्दीनच्या दर्ग्याची आग विझविली अशा शेकडो चमत्कारांनी शिर्डीला क्षेत्राचे स्वरुप प्राप्त झाले, व श्रीसाईनाथाचा जयघोष चालू झाला.

साई लीलेने अजब जहाले तेज फाकले उभ्या जगा
साईबाबांनी दुःख हरवले, वेड लावले साऱ्या जगा
बोलो साईनाथ की जय रेऽऽऽऽऽऽ॥ धृ० ॥
शिर्डी क्षेत्राचे रुप बदलले
तीर्थ क्षेत्र हे नाव लाभले
गावोगावचे लोक धावले
दर्शन घेवून पावन झाले.
रोग्यांचे हे रोग पळाले, तेज फाकले उभ्या जगा ॥ १ ॥

नानासाहेबांचे भाग्य नासले
वर्षामागून वर्ष लोटले
लग्न दुसरे करूनी पाहिले
साई चरणी लीन झाले
निपुत्रिकांना पुत्र जहाले, तेज फाकले उभ्या जगा ।। २ ।।

बाबांनी हो धुनीत पाहिले
अग्नी नारायण क्रोध पावले
हाती घेवून पाणी धावले
नवल नंतर सारे कळले
ताजुद्दीनचे मंदिर विझविले, तेज फाकले उभ्या जगा ।। ३ ।।

जलद गतीने बाबा धावले
अग्नीमध्ये हात घातले
लोहाराचे मुल वाचले
हात दोन्ही पोळून गेले
असे सदोदित बाबा धावले, तेज फाकले उभ्या जगा ।। ४ ।।

कोपरगावचे भक्त पहिले
तीन लग्नें मुल न झाले
साई कृपेने भाग्य उजळले
मुल घरी हो खेळू लागले
शनिदेवाचे मंदिर बांधले, तेज फाकले उभ्या जगा ।। ५ ।।

श्रीसाईगीत तुषार—७

आंधळयाच्या उशाशी दिवा ठेवला. तरी त्याला त्याचा काय उपयोग तद्वतच प्रकार शिर्डीला घडला. श्री शंकराच्या भक्तीने भारावून गेलेल्या मेघाजीला साई ज्योतिचा प्रकाश कसा कळणार आंधळेपणाने तीन दिवस शिर्डीला राहिला. पण समर्थ साईंचे दर्शन घेणे सुद्धा वर्ज्य मानले. मित्रा सोबत आपल्या घरी जावयास निघाला दर्शन होवू नये म्हणून द्वारकामाईच्या बाहेर उभा राहिला. परंतु द्वारकामाई-तील त्या भोळया शंकराने आपल्या लाडक्या भक्ताला साक्षात चैतन्यमय स्वरुपात दर्शन दिले. साई शंकर हे भेद क्षणात सागराच्या लाटेप्रमाणे, नष्ट झाले. दोन्ही हाताने चरण घट्ट आवळले. नयनातील अश्रूंना मार्ग मोकळा झाला, आणि हा मेघाजी पुढे आपल्या आवडत्या श्री साईंच्या सहवासात राहिला साई चरणांचा दास झाला.

आला, आला, आला, आला, मेघाजी आला, हो मेघाजी आला. भोळेनाथ साई पाहून, शरण गेला.

चार हि शास्त्रे वेद पुराणे
पारंगत झाला, पारंगत झाला
भोलेनाथ सांबसदाशिव देव मानिला
नित्य पहाटे उठोनिया वंदी शंकराला
आयुष्याचे दिन संपले, देव नाही भेटला ॥ १ ॥

एके दिनी मित्र तयाला
साईभक्त भेटला, साई भक्त भेटला
शिर्डी जायाचे मनोगत सांगे तयाला
शिर्डी पहाण्यासाठी मी येतो सोबतीला
कधीहि नाही वंदणार साई फकिराला ॥ २ ॥

मित्रा सोबत मेघाजी हो
शिर्डीला आला, शिर्डीला आला
तिन दिवस धर्मशाळेत वेळ घालविला
घरी परतता मित्रा सोबत साईगृही आला
खाली मान घालून द्वारी उभा ठेला ॥ ३ ॥

खूप वेळ उभा राहून
कंटाळा आला, कंटाळा आला
म्हणून द्वारकामाई मध्ये पाहू लागला
साई सदाशिव भोळे शंकर दिसले हो त्याला
गर्वाने वागून आपण चुकलो देवाला ॥ ४ ॥

सप्त जन्मीचे पुण्य आले
आज फळाला, आज फळाला
साईरुपाने सांब सदाशिव भेटे हो त्याला
साई शंकर भेद सारे गेले लयाला ॥ ५ ॥

श्रीसाईगीत तुषार—८

श्री साईंचे सामर्थ्य इतके प्रबळ होते, की ते प्रत्येक जिवाशी एकरूप होत. मग तो प्राणी असो की मनुष्य. साईभक्तीने भारावून गेलेल्या एका स्त्रीने एक

नित्यक्रम चालू केला. चार भाकऱ्या कराव्या आणि दोन साईंना आणून द्यावा. एके दिवशी भर दुपारच्या मध्यान्हीच्या त्या प्रखर उन्हात भुकेने व्याकूळ होवून तडफडणाऱ्या श्वानाच्या क्षुधा शांतीसाठी त्या भाकऱ्या तिने दिल्या आणि उरलेल्या दोन भाकऱ्या अशाच एका डुकराला दिल्या व रिक्त हाताने साईंना हा प्रकार सांगावयास गेली. तोच साई मुखातून अमृतवाणी बाहेर आली. आज मी श्वानामुखी जेवलो. तू दिलेल्या सर्व भाकऱ्या मला मिळाल्या हा साई प्रत्येक प्राणिमात्रात एकरुप झालेला आहे. चराचरात व्यापला आहे.

साई जेवले, जेवले, श्वानामुखी जेवले
मुक्या जीवाशी, मनाशी, एकरुप झाले ॥ धृ० ॥

बहू प्रेमाने, प्रेमाने, आणि हो भाकरी
भर माध्यानी, माध्यानी दुपारच्या प्रहरी
नित्य करी हो करी हो साईची चाकरी
आणि भाकरी, भाकरी, रामाची शबरी ॥ १ ॥

चार भाकऱ्या, भाकऱ्या प्रेमाने हो बनविल्या
दोन स्वतःला, स्वतःला टोपली खाली ठेवल्या
दोन भाकऱ्या, भाकऱ्या घेवून जाई साईला
सूर्य तापला, तापला, दुपारच्या माध्याला ॥ २ ॥

भाकर पहाता, पहाता, श्वान पुढे धावला
शिघ्र भुकेने, भुकेने, व्याकुळ हो झाला
नेत्र सांगती, सांगती, भाकर दे गे मला
तिने हातचे, हातचे, श्वाना सारे दिले ॥ ३ ॥

भाकऱ्या स्वतःच्या, स्वतःच्या घेवून चालली साईला
आले डुक्कर, डुक्कर भाकऱ्या मागाया
तिने दिल्या हो, दिल्या हो, उदराग्नी शमवाया
रिक्त हाताने, हाताने, साई तिला भेटले ॥ ४ ॥

[illegible]माईत, माईत, साईशांत बैसले
[illegible]ता, पाहता साई सांगू लागले

मुक्या श्वानाला, डुकराला आज भोजन दिले
मला पावली, पावली, शबरीची बोरे ॥५॥

## डॉ. अण्णासाहेब गव्हाणकर यांच्या कोजागिरी पौर्णिमा उत्सव मंडळाचा ५० वा वर्धापनदिन

महाराष्ट्रातील थोर साईभक्त डॉ. केशव भगवंत उर्फ अण्णासाहेब गव्हाणकर कुर्ला, यांच्या कोजागिरी पौर्णिमा उत्सवमंडळाला यंदा ५० वर्षे पूर्ण झाली त्याबद्दल उत्सवाचा वर्धापनदिन व डॉ. गव्हाणकर यांचा भव्य सत्कार त्यांच्या भक्त, हितचिंतकांनी, चहात्यांनी शुक्रवार दि. २४-१०-८० रोजी शिर्डी येथे सायं. ४ वा. आयोजित केला होता. याप्रसंगी साकोरीच्या प. पू. गोदावरी माताजी अध्यक्ष या नात्याने उपस्थित होत्या. या प्रसंगी मा. श्री. क. हि. काकरे कोर्टरिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान शिरडी, श्री. सदानंद चेंदवणकर का. संपादक श्री साईलीला, श्री. प. पू. विजयबाबा, नागपूर; डॉ. शांताराम टिपणीस साकुरी, सती कन्याकुमारी देवीजी श्री. नानासाहेब रासने यांची डॉ. गव्हाणकर यांचा गौरव करणारी भाषणे झाली. संस्थानतर्फे श्री. काकरेसाहेबांनी डॉ. अण्णांना शाल व श्रीफल अर्पून त्यांना दिर्घायुरारोग्य चिंतिले. गेल्या ५० वर्षात डॉ. अण्णासाहेब गव्हाणकराना ज्यांनी ज्यांनी म्हणून सहकार्य दिले अशा संस्थानच्या कर्मचाऱ्यांचा व मंडळातील भक्त मंडळींचा डॉ. गव्हाणकरांनी प. पू. माताजींच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला. सत्काराला उत्तर देताना डॉ. चा कंठ अक्षरशः दाटून आला होता. शेवटी प. पू. माताजींनी शुभाशिर्वाद प्रदान केल्यावर हा समारंभ सायं. ७ वा. संपला. मंडळाचे कार्यवाह श्री. चंद्रकांत सामंत यांनी प्रस्ताविक व नंतर आभार प्रदर्शनाचे भाषण केले. समारंभ यशस्वी करण्यासाठी त्यांनी पराकाष्ठेची मेहनत घेतली होती, मुंबईहून दोन एस. टी. गाड्या भरून डॉ. गव्हाणकरांची भक्त मंडळी शिरडीस गेली होती व त्याचप्रमाणे ठाणे, नाशिक, पुणे, नागपूरहून पण आली होती. प. पू. माताजींच्या दर्शनासाठी लेंडीबागेतील या समारंभस्थानी भक्तांची चिक्कार गर्दी लोटली होती. उत्सवात गायन, वादन, किर्तन-प्रवचन इ. भरगच्च कार्यक्रमही झाले. सौ. पद्मजा सहस्रबुद्धे यांच्या प्रवचनाने तर उत्सवात चांगलीच रंगत आणली होती.

# शिरडी-वृत्त माहे ऑगस्ट सन १९८०

या महिन्यात श्रावण आल्यामुळे श्रींच्या दर्शनासाठी भाविक साईभक्तांची गर्दी बरीच होती. सत्यनारायण पुजाही बऱ्याच झाल्या कांही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली ती खालील प्रमाणे :

कीर्तन : १) संस्थान गवई काव्यातीर्थ श्री.ग.वि. जोशी शास्त्री यांची कीर्तने नेहमीप्रमाणे एकादशी व महत्वाचे दिवशी झाली. प्रवचन : ह. भ. प. बाबुराव रा. गुळखेडकर. उस्मानाबाद.

भजन, गायन, वादन वगैरे १) श्रीगुरुदेव भजनी मंडळ अमरावती. २) श्री. रामचंद्र न. कुलकर्णी- सांगली. ३) शिरडी महिला मंडळ. शिरडी.

श्री. बाबासाहेब मो. राजाध्यक्ष रत्नागिरी. ५) श्री. दत्तु शंकर बुमरे. खेडलजुगा. ६) ह.भ.प. दत्तात्रेय दा. रासने पुणे. ७) सौ. सुलभा र. जोशी मुंबई. ९) सौ. हिरा ल. जावळकर पुणे. १०) श्री. गोविंद तु. विखाते पुणे. ११) श्री. एस. शामसुंदर सिकंदराबाद. १२) श्री. बाळकृष्ण दा. बिडवे. पुणे. १३) श्री. के. विजय कुमार हैद्राबाद. १४) श्री. राजन य. वगळ मुंबई १५) श्री. प्रमोद विनायक तळपदे. ठाणे. १६) श्री. अरुण ह. खडकीकर हैद्राबाद. १७) श्री. दत्तगुरू भजन मंडळ मुंबई. १८) ह. भ. प. लक्ष्मणबुवा वाकचौरे शिरडी यांनी प्रवचन केले. १९) श्री. नारायण मोहनानी ॲण्ड पार्टी उल्हासनगर. २०)श्री भोलानाथ रा. समेळ मुंबई. २१) श्री भक्ती संगम मुंबई. २२)श्री. के.टी. टिकू. २३) श्रीमती शामा टिकू मुंबई. २४) कु. कृष्णा पंडीत मुंबई २५) श्री. शिवाजीराव कालेकर नासिक जादू व कसरतीचे प्रयोग. २६) श्री. जादूगार प्रिंस कोळपेवाडी. २७) श्री. यशवंत पु. रानडे कोपरगाव २८) कु. मनीरी श्रा. कर्वे पुणे. २९) श्री. नटवर्य बापूराव माने. पुणे यांनी एकपात्री नाटक केले. ३०) श्री. सुरेश श. कुलकर्णी. धुळे.

हवापाणी—शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही. मधून मधून थोड थोडा पाऊस पडत आहे. त्यामुळे हवा थंड आहे.

स्वराज्य प्राप्तीदिन:—१५ ऑगस्ट रोजी श्रीसाईबाबा संस्थान शिर्डीतर्फे रिसीव्हर मा. श्री. क. हि. काकरे साहेब यांचे शुभ हस्ते ध्वज वंदन कार्यक्रम

श्रीसाईबाबांचे मंदिरावरील कळसाजवळ झाला. संस्थान कर्मचारी, पोलीस' होमगार्ड पथक, सन्माननीय पाहुणे, प्रतिष्ठीत ग्रामस्थ, शिक्षकवर्ग, विद्यार्थी, विद्यार्थिनी, साईनाथ हायस्कूल बॅण्डपथक उपस्थित होते. त्यांना चहापान देणेत आले व मुलांना खाऊ वाटण्यात आला.

"साईप्रसाद" नवीन भोजनगृह इमारतीचे उद्घाटन :—

सोमवार दि. २५-८-८० रोजी सकाळी १० वा. "साईप्रसाद" इमारतीचे उद्घाटन मा. जस्टीम नेहरुदभाई कांतीलाल पारेख, न्यायाधीश हायकोर्ट, मुंबई यांचे शुभ हस्ते झाले. या शुभप्रसंगी समारंभाचे अध्यक्षस्थान मा. श्री. का. सी. पाठक (माजी कोर्टरिसीव्हर श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी) यांनी भूषविले होते.

मा. श्री. क. हि. काकरे कोर्ट रिसीव्हर श्रीसाईबाबा संस्थान शिरडी यांनी साईप्रसाद इमारतीचा अहवाल वाचन व प्रास्ताविक भाषण केल्यावर, मुख्य पाहुण्याचे हस्ते संबंधितांचा सत्कार श्रीफळ व भेट वस्तु देऊन करण्यात आला.

मुख्य पाहुण्याचे भाषण, आभार प्रदर्शन वगैरे कार्यक्रम झाल्यावर पाहुणे-मंडळींनी साईभक्तासमवेत नवीन भोजनगृहात भोजन प्रसाद घेतला व कार्यक्रम समाप्त झाला.

# शिरडी-वृत्त माहे सप्टेंबर सन १९८०

या महिन्यात श्रींच्या दर्शनासाठी भक्तांची गर्दी नेहमीप्रमाणे होती. रविवार, गुरुवार व सुटीचे दिवशी बरीच गर्दी होती.

काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे:—

कीर्तन:— १) संस्थान गवई काव्यतीर्थ श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांची कीर्तने नेहमीप्रमाणे एकादशी व महत्वाचे दिवशी झाली.
२) ह. भ. प. कमलाकर महाराज चोपडेकर, अमळनेर यांचे कीर्तन
३) ह. भ. प. पार्वती सखाराम सांगडे, बुलढाणा यांचे कीर्तन.

प्रवचन:— १) प. पू. ॐप्रकाश महाराज हरिद्वार यांचे प्रवचन झाले.

भजन गायन गायन वादन वगैरे १) सौ. अरुणा प्र. साळवी, मुंबई २) श्री. प्रकाश साळवी, मुंबई ३) श्रीमती जया नटराजन, आंध्र प्रदेश ४) श्रीमती पार्वती महादेवन, आ. प्रदेश ५) श्री. रमेश द. वैद्य, मुंबई ६) श्री. टिपटाप गणेश

मेळा, वैजापूर ७) अलंकार ऑर्केस्ट्रा, श्री. विजयकुमार आठवले व पार्टी मनमाड, ८) श्री. शिवाजीराव कुरुंदकर, परभणी ९) सौ. मधुबाला चावला, मुंबई १०) ह. भ. प. लक्ष्मणबुवा वाक्चौरे, शिरडी ११) श्री. गौतम प. चुरी, ठाणे १२) श्री. आर. एन. गुलानी, पुणे १३) राजा थिएटर्स, पुणे–श्री. सुरेश मु. कोकिळ व पार्टी १४) श्री. बाबुराव गो. चव्हाण, मुंबई १५) श्री. विजय ना. इंदूरकर, मुंबई १६) सौ. वैशाली आठवले, मनमाड १७) श्री. विजयकुमार धोपावकर १८) सौ. चंदा म. कालेंकर १९) श्री. मनोज शि. कालेंकर २०) श्री. गोपाळ गिरधर गुरव २१) श्री. द्रविंद्रसिंग ब. ग्रोवर २२) सतिश पी. चंदनशीव २३) श्री. मधुकर भवार २४) श्री. सुधाकर दिवेकर २५) श्री. शंकरन् एम. द्रविड २६) श्री. सुरेश गिरधर २७) श्री. सोमनाथ गुरव २८) श्री. उत्तम भवार २९) श्री. एम. एस. पगारे ३०) श्री. चंद्रशेखर व साळुंके, मनमाड ३१) सौ. शैलजा वैद्य, पुणे ३२) श्री. मोहन वैद्य ३३) श्री. सुभाष शिरसाट ३४) श्री. करीमखान ३५) श्री. विकास पेटकर ३६) श्री. प्रतापराव मालेगावकर, पुणे.

हवापाणी–शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.


# स्वामी कला केन्द्र

**लग्न आदि मंगल कार्यात मंगल वाद्य शहनाई, सनई,**

परदेशात जाऊन आलेली एकमेव ढोलकी शहनाई पार्टीची (जुगलबंदी)
आमचा खास कार्यक्रम
(दिल्ली दरबार शहनाई पार्टी शाखेचा कार्यक्रम)

—श्री आप्पा सामंत
खांडके बिल्डींग,
११/२० एन्. सी. केळकर रोड,
दादर, मुंबई नं. ४०००२८

# उदी–प्रसाद पाठविण्याची नवी पद्धत

श्री साईबाबा संस्थानला देणगी पाठविणारांना दिनांक ३१–१२ ७८ पूर्वी कापडी पिशवीत उदी-प्रसाद व देणगी पावती टाकून त्यांस पत्ता लिहीलेले लेबल लावून पोस्टाने पाठविण्याची पद्धत होती. परंतु या पद्धतीत लेबल तुटून, प्रसाद व पावती भक्तांपर्यंत न पोहचता मध्येच गहाळ होत असल्याच्या अनेक तक्रारी आल्यावरून उदी-प्रसाद पाठविण्याचे बाबतीत सुधारणा करून दि. १–१–७९ पासून पाकिटात प्लॅस्टीक पिशवीत उदी व प्रसाद टाकून तो भक्तांना पाठविला जातो. मनिऑार्डर द्वारा रक्कम पाठविणारांना मनिऑार्डरची पोचपावती पोस्टाद्वारा मिळत असल्याने संस्थानची वेगळी देणगी पावती पाठविण्याचे बंद केलेले आहे व सदरची रक्कम इकडे हिशेबात घेतलेबद्दलचा नंबर मनिऑार्डरचे पावतीवर व उदी-प्रसादाचे पाकिटावर स्टॅम्पींग मशिनने दिला जातो व भक्तांच्या इच्छेप्रमाणे रक्कम ज्या त्या कारणासाठीं जमा करण्याची दक्षता घेतली जाते.

साईभक्त याबाबत सहकार्य करतील अशी आशा आहे.

**क. हि. काकरे**
कोर्ट रिसीव्हर,
श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी.

# श्रीसाईबाबा संस्थान शिरडीची प्रकाशने

## श्रीसाईबाबा संस्थान शिरडी यांच्या प्रकाशनांच्या किंमती

| | | रु. पैसे |
|---|---|---|
| (१) | श्रीसाई सच्चरित्र, (मराठी) | २२–०० |
| (२) | श्रीसाई सच्चरित्र, (इंग्रजी) | १२–५० |
| (३) | श्रीसाई सच्चरित्र, (गुजराती) (छापत आहे) | १२–५० |
| (४) | श्रीसाई सच्चरित्र, (हिन्दी) | १२–०० |
| (५) | श्रीसाई सच्चरित्र, (कानडी) | ८–०० |
| (६) | श्रीसाई सच्चरित्र, (सिंधी) | १२–०० |
| (७) | गुजराती पोथी (शरणानंद) | ५–५० |
| (८) | श्रीसाईनाथ स्तवनमंजिरी व सुमनांजलि, (मराठी) | ०–३० |
| (९) | श्रीसाईनाथ स्तवनमंजिरी व सुमनांजलि, (गुजराती) | – |
| (१०) | मराठी ब्रोचर | ०–५० |
| (११) | सगुणोपासना, (मराठी) | ०–५० |
| (१२) | सगुणोपासना, (गुजराती) | ०–५० |
| (१३) | किर्तन पंचक | ०–५० |
| (१४) | साईलीलामृत, (मराठी) | ६–०० |
| (१५) | साईलीलामृत (हिन्दी) | ५–५० |
| (१६) | साईलीलामृत (गुजराती) | ४–२५ |
| (१७) | सचित्र साईबाबा, (चित्रमय संग्रह) | २–७५ |
| (१८) | शिर्डी दर्शन, (६६ चित्रांचा संग्रह) | ४–५० |
| (१९) | मुलांचे साईबाबा, (मराठी) | १–२५ |
| (२०) | मुलांचे साईबाबा, (गुजराथी) | १–०० |
| (२१) | चिल्ड्रेन्स साईबाबा, (इंग्रजी) | १–७५ |
| (२२) | मुलांचे साईबाबा, (तेलगु) | १–५० |
| (२३) | बच्चोंके साईबाबा, (हिंदी) सदानंद चेंदवणकर | १–७५ |
| (२४) | साई किर्तनमाला, (मराठी) | ०–७५ |
| (२५) | साई दी सुपरमन, ले. स्वामी साई शरणानंद, (इंग्रजी) | ५–२५ |
| (२६) | श्रीसाई रूद्राध्याय, (मराठी) | ०–६० |
| (२७) | गाईड टु शिर्डी (मराठी) | १–०० |
| (२८) | गाईड टु शिर्डी, (इंग्रजी) | १–०० |
| (२९) | गाईड टु शिर्डी (गुजराती) | १–५० |
| (३०) | श्रीसाईलीला, अधिकृत मासिक मुखपत्र, (मराठी व इंग्रजी) | |
| | वार्षिक वर्गणी, | १०–०० |
| | (व्ही. पी. पद्धत नाही.) प्रत्येक प्रत | १–०० |

# श्रीसाईलीला

## लेखक—कवी वर्गणीदारांना महत्वाच्या सूचना

१) श्रीसाईलीलेकडे पाठवावयाचे सारे लेख, कविता, चित्रे इ. साहित्य संपादक श्रीसाईलीला, ' साईनिकेतन' ८०४ बी. डॉ. आंबेडकर मार्ग, दादर मुंबई ४०००१४ याच पत्यावर पाठवावे. वर्गणीदारांनी पण आपली वार्षिक वर्गणी रुपये दहा याच पत्यावर पाठवावी; किंवा स्वतः येऊन भरावी व रितसर पोचपावती घ्यावी व ती नोंदीसाठी म्हणून जपून ठेवावी ही विनंती.

२) लेखक-कवींनी लिखाण पाठविताना ते कागदाच्या एकाच बाजूने भरपूर समास सोडून, सुवाच्च अक्षरात नवीन शुद्धलेखन पद्धतीचे नियमास अनुसरून लिहून पाठवावे. लिखाण कागदाच्या दोन्ही बाजूस लिहून किंवा इनलँड लेटर किंवा पोस्टकार्डावर लिहून अजिबात पाठवू नये. ते स्वीकृत केले जाणार नाही.

३) श्रीसाईलीलेकडे लेखन पाठविताना श्रीसाईबाबा हाच प्रमुख विषय असावा. अन्य संतवाङ्मय, चरित्रे, भक्तीभाव, अध्यात्म, श्रीसाईभक्त, श्रीसाई मंदिरे इ. विषयांवरही साहित्य श्रीसाईलीलेकडे पाठविले तरी चालेल.

४) लेखाची पोच लेखकास त्वरीत हवी असल्यास लेखासोबत १५ पैशाचे तिकीट किंवा कार्ड सोबत जोडावे म्हणजे पोच रितसर पाठविली जाईल. पाठविलेल्या साहित्याचा निर्णय सुमारे महिन्याभरात कळविला जाईल. नापसंत साहित्य परत पाठविले जाईल.

५) कवींनी निदान दोन वर्षेतरी कविता अजिबात पाठवू नयेत.

६) पोस्टाने पाठवावयाचे सर्व अंक दरमहा एक तारखेस दादर मुख्य कचेरीतून योग्य त्या नोंदी घेऊन रवाना केले जातातच. उशिरात उशिरा म्हणजे सुमारे ८ तारखेपर्यंत ते देशभरच्या वर्गणीदाराना मिळावेत. अंक न मिळाल्याची तक्रार नजिकच्या डाकघरी करावी व मगच आम्हास लिहावे. अंक शिल्लक असल्यास पुन्हा पाठविला जाईल परंतु अशी शक्यता कमीच असते.

# श्री साईलीला मासिक जाहिरात दर

कागदाच्या वाढत्या किंमती विचारात घेऊन साईलीला मासिकातील जाहिरातीचे दर खालील प्रमाणे वाढविण्यात येत असून सदरचे दर दि. १-१-१९८१ पासून अंमलात येतील.

| | पूर्वीचे दर रु. | सुधारीत दर रु. |
|---|---|---|
| १) मलपृष्ठ नं. ४. | १०० | ३०० |
| २) मलपृष्ठ नं. ३ व २. | १०० | २०० |
| ३) आंतील मजकुराचे पूर्ण पान | ७५ | १०० |
| ४) आंतील मजकुराचे अर्धे पान | ४० | ६० |
| ५) आंतील मजकुराचे $\frac{१}{४}$ पान | — | ३५ |

कळावे.

(क. हि. काकरे)
कोर्ट रिसीव्हर,
श्री साईबाबा संस्थान, शिरडी.